नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ६८ * * नागपूर * | शुक्रवार, दिनांक ६ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## एका दिवसात १०० पेक्षा अधिक कोविड रुग्ण

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
देशात कोरोना रुग्णांची संख्या सतत वाढत आहे. बुधवारी १५ राज्यांत ५६४ रुग्ण आढळले, त्यापैकी ४३७ रुग्ण फक्त ४ राज्यांमधील आहेत. केरळमध्ये सर्वाधिक ११४, कर्नाटकमध्ये ११२, पश्चिम बंगालमध्ये १०६ आणि दिल्लीमध्ये १०५ रुग्ण आढळले आहेत. अशाप्रकारे, देशातील सक्रिय रुग्णांची संख्या ४८६६ वर पोहोचली आहे.

महाराष्ट्रात तीन आणि दिल्ली आणि कर्नाटकात प्रत्येकी दोन जणांचा मृत्यू झाला. यासह, देशात कोरोनामुळे मृतांचा आकडा ५१ वर पोहोचला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने गुरुवारी देशभरातील राज्यांमधील निवडक रुग्णालयांमध्ये मॉक ड्रिल केले आहे.

अग्राग्रलेख
## खरीखरी..

## उद्धव-राज' करणार काय

शिवसेनेचे कोणे एके काळी सर्वेसर्वा असलेले उद्धव ठाकरे आणि ते सर्वेसर्वा बनण्यासाठी बाळासाहेब यांनी दिलेल्या आदेशाला प्रतिसाद देऊन शिवसैनिकांना हर्षवणारे दिवस मुंबईच्या खड्ड्यामध्ये जाऊ नये. असे बाळासाहेबांच्या तमाम शिवसैनिकांना आणि तेव्हा शिवसैनिक असलेल्या आताच्या मनसैनिकांना वाटते. उद्धव ठाकरे गादीवर बसले. त्यावेळी राज साहेब यांनीही त्यांना पाठिंबा दिला होता. त्यानंतर 'दोनो ठाकरे भाई भाई, तनसे और मनसे भी अलग हुए' सुरुवातीचा काही काळ सोडला. तर उद्धव ठाकरे यांची कमान वरचवर चढत गेली आणि राज ठाकरे साहेबांची पायरी उतरती राहिली. खरे तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा जन्म झाल्यावर तेरा आमदार निवडून आले होते. अगदी सुरुवातीच्या काळात एवढे देदीप्यमान यश महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मिळवले. विशेष म्हणजे त्यातील एक आमदार तर सुवर्णमंडित होते. त्यासोबतच नाशिक महानगरपालिकेची सत्ता हाती आली होती. पण त्यानंतर काय झाले किंवा काय होत आहे. हे महाराष्ट्रातील तमाम शिवसैनिकांना दिसत आहे. लोकसभा उद्धव ठाकरे यांनी क्रमांक एकने जिंकली. त्यावेळी राज साहेबांनी मोदीजींना मुदित अंतकरणाने अगदी निरपेक्ष बिनशर्त पाठिंबा दिला. त्यावेळी महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा झेंडा चांगलाच फडकला. मात्र महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी सर्वजण सहाय्यक उदार अंतःकरणाच्या शिंदे यांच्या शिवसेनेने ठाकरे परिवाराची शिवसेना अलगद आपल्या झोळीत टाकून घेतली. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची जी भकास स्थिती झाली. ती अत्यंत विदारक होती. भारतीय जनता पक्षाने केवळ विरोधी पक्षच नाही. तर आपल्या सहकारी पक्षांनाही जबरदस्त धक्का दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी रणनीती आखली. त्या नंतर महाराष्ट्रातील सर्वच पक्षांची बोलती बंद झाली. मनसेची ज्योत पेटलीच नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची व्याघ्र डरकाळी अजिबात घुमलीच नाही. काँग्रेसची पुंगी पोकळ निघाली. शरद पवारांना सूर गवसला नाही. मात्र, तिकडे शिंदेशाही आणि पवारशाही यांना बऱ्यापैकी यश मिळाले. हे सर्व सोपस्कार पार पडले, त्याचवेळी अनेक अपक्षांचा पाठिंबा मिळाल्यामुळे एकटा भारतीय जनता पक्षच सत्ताधीश होऊ शकला असता. पण शिंदे साहेबांचा वैभवी विजय आणि छोट्या पवार साहेबांच्या विजयाचा अर्थ अजून तरी कोणालाच समजलेला नाही. लोकसभा झाली, विधानसभा झाली आणि आता महाराष्ट्रातील पालिका आणि महानगरपालिका आलेली आहे. भारतीय जनता पक्षाच्या वज्रप्रहार मुष्टीचा मुकाबला करण्यासाठी कुठेतरी नवे समीकरण बनवणे गरजेचे होते. मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरात तरी आज दोन्ही ठाकरे बंधूंना निश्चितच मानणारे प्रचंड शिवसैनिक किंवा मनसैनिक आहेत. शिवसैनिक आणि मनसैनिक एकत्र आले. तरी आमचे काही बिघडत नाही, असे भारतीय जनता पक्षाकडून सांगितले जात असले. तरी या दोन पक्षांच्या एकत्रिकरणानंतर काय होईल, हे सांगता येत नाही. हे दोन ठाकरे एकत्र येऊ नयेत. म्हणून बंद दाराच्या आड बरीच खलबते सुरू आहेत, असे समजते. पण आता निदान मुंबई महापालिका आणि इतर काही महानगरपालिका आपल्या ताब्यात घेण्यासाठी सर्व मतभेद विसरून हे दोन बंधू एकत्र यावेत. म्हणून अनेकांचे प्रयत्न सुरू आहेत. याच महिन्यात 1966 साली शिवसेनेची स्थापना झाली होती. ती बहुधा याच महिन्यात आलेल्या आणीबाणीचा मुकाबला करण्यासाठी होती. ठाकरे बंधूंचा वाणीविलास कितपत प्रभावी ठरतो. हेच आता शिवसैनिक आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह संपूर्ण महाराष्ट्राला बघावयाचे आहे. जय भवानी! जय शिवराय!! जय महाराष्ट्र!!!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

प्रतिक्षा संपली

# समृद्धी पूर्णत्वास!

### फडणवीस यांच्या हस्ते इगतपुरी ते आमणे पर्यंतच्या ७६ किमी लांबीच्या टप्प्याचे लोकार्पण



■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. ५ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकमधील इगतपुरी ते ठाण्यातील आमणे पर्यंतच्या ७६ किमी लांबीच्या समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे उद्घाटन आज झाले.

यामुळे एका अर्थाने मागील वेळी मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी पाहिलेले स्वप्न आता पूर्ण झाले आहे. यामुळे नागपूर ते मुंबई मधील अंतर कमी झाले असून वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकास गाथेतील एक मुकुटमणी, 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गा'चा अंतिम टप्पा (इगतपुरी ते आमणे -७६ किमी) सज्ज झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अंतिम टप्प्याचे भव्य लोकार्पण झाले. या लोकर्पणानंतर संपूर्ण ७०१ किमी लांबीचा समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला होऊन नागपूर ते मुंबई प्रवास फक्त ८ तासांत पूर्ण करता येणार आहे.

**स्टेअरिंग शिंदेंच्या हाती**

मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत या समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर या मार्गावरील बोगद्यातून या तिन्ही नेत्यांनी प्रवास केला. विशेष म्हणजे या वेळी फडणवीस यांची गाडी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चालवली. मागील वेळी झालेल्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांची गाडी देवेंद्र फडणवीस यांनी चालवली होती, हे विशेष.

मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी एकाच गाडीत प्रवास केला असला तरी उपमुख्यमंत्री अजित पवार मात्र वेगळ्या गाडीतून या मार्गावरून जाताना दिसले. त्यामुळे याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या होत्या. सरकार म्हणून आम्ही एकत्र काम करत आहोत. अजित पवार हे वेगळ्या गाडीत बसले होते. त्यात चर्चा करण्यासाठी काहीही नसल्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे.

## बंगळुरू चेंगराचेंगरी तिघांविरुद्ध एफआयआर



■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ५ :
चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक पोलिसांनी गुरुवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी), डीएनए इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी आणि कर्नाटक क्रिकेट असोसिएशनविरुद्ध एफआयआर दाखल केला. त्यांच्यावर विजयी परेड दरम्यान गुन्हेगारी निष्काळजीपणाचा आरोप आहे. जबाबदार एजन्सींच्या अनागोंदी आणि निष्काळजीपणामुळे चेंगराचेंगरी झाल्याचे एफआयआरमध्ये म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

दुसरीकडे, या प्रकरणाची सुनावणी उच्च न्यायालयात झाली. कार्यवाहक मुख्य न्यायाधीश व्ही. कामेश्वर राव आणि न्यायमूर्ती सीएम जोशी यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला अपघाताचा स्थिती अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. आता पुढील सुनावणी १० जून रोजी होईल.

त्याच वेळी, याचिकाकर्त्यांच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, 'आरसीबी खेळाडूंना सन्मानित करण्याचा निर्णय कोणी घेतला आहे, हे राज्य सरकारने सांगावे.' देशासाठी न खेळणाऱ्या खेळाडूंचा सन्मान करण्याची काय सक्ती होती? ४ मे रोजी, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पहिल्यांदा आयपीएलचे विजेतेपद जिंकल्यानंतर बंगळुरूमध्ये विजयी परेड आयोजित केली. प्रथम, राज्य सरकारने विधानसभा परिसरात सर्व खेळाडूंचा सन्मान केला. हा कार्यक्रम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झाला. याआधीही स्टेडियमबाहेर जमलेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला होता. ३३ जण जखमी आहेत. मृत सर्व ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे होते.

## १ कोटींचे बक्षीस असलेला नक्षली चकमकीत ठार झाल्याचा दावा

■ वृत्तसंस्था, बिजापूर, दि. ५ :
छत्तीसगडमधील बिजापूर येथील राष्ट्रीय उद्यान परिसरात नक्षलवाद्यांशी चकमक सुरू आहे. केंद्रीय समिती सदस्य सुधाकर उर्फ नर सिंहचलम या चकमकीत ठार झाल्याचे वृत्त आहे. तो तेलंगणा, छत्तीसगड आणि महाराष्ट्रात वॉन्टेड होता. सुधाकरवर १ कोटीचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.



गुरुवारी सकाळपासून पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये गोळीबार सुरू आहे. राष्ट्रीय उद्यान परिसरात माओवाद्यांच्या मोठ्या संख्येने उपस्थिती असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दल बाहेर पडल्याचे सांगण्यात येत आहे.

बस्तरचे आयजी पी. सुंदरराज यांनी चकमकीची पुष्टी केली आहे. सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकात डीआरजी, एसटीएफ आणि कोब्रा सैनिकांचा समावेश आहे.

जेव्हा पथक शोधासाठी बाहेर पडले, तेव्हा दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी सैनिकांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल सैनिकांनीही गोळीबार केला. चकमकीनंतर संपूर्ण परिसरात सैनिकांकडून शोध मोहीम सुरू आहे.

विजापूरचे एसपी जितेंद्र कुमार यादव, डीआयजी कमलोचन कश्यप आणि एएसपी मयंक गुर्जर या चकमकीवर लक्ष ठेवून आहेत. २१ मे रोजी, एका चकमकीत नक्षलवादी नेता बसवा राजू देखील मारला गेला होता.

## कार घरात शिरली, ५ ठार

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. ५ :
जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील नामपूर येथील भदाण कुटुंबीयांच्या कारचा बुधवारी रात्री सुमारे १० वाजता भीषण अपघात झाला.



नातेवाईकाच्या लग्नसमारंभातून परतत असताना, नाशिक-कळवण रस्त्यावरील कोल्हापूर फाट्याजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार एका बंगल्यावर जाऊन आदळली. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मृतांमध्ये शैला वसंत भदाण (६२), त्यांची जाऊ सरला भालचंद्र भदाण (५०), चालक खालिक मेहमूद पठाण (५०, रा. नामपूर), माधवी मेतकर (३२) आणि त्यांची मुलगी त्रिवेणी मेतकर (४, रा. देवळा) यांचा समावेश आहे. भालचंद्र भदाण (५२, रा. नामपूर) आणि उत्कर्ष मेतकर (१२, रा. देवळा) हे गंभीर जखमी झालेत.

सटाणा येथून नाशिककडे जात असताना, कोल्हापूर फाट्याजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार एका बंगल्यावर जाऊन आदळली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी आणि स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## देशाच्या हितासाठी काम करणे पक्षविरोधी नाही : थरूर



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
भारत सरकारच्या शिष्टमंडळाचा भाग म्हणून अमेरिका दौऱ्यावर असलेले काँग्रेस नेते शशी थरूर यांनी गुरुवारी पक्षविरोधी वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, जे लोक राष्ट्रीय हितासाठी काम करणे पक्षविरोधी कृती मानतात, त्यांनी स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे.

काँग्रेस सोडण्याच्या अटकळीच्या प्रश्नावर थरूर यांनी हे उत्तर दिले. ते म्हणाले, जेव्हा तुम्ही देशाची सेवा करत असता तेव्हा अशा गोष्टींबद्दल जास्त काळजी करू नये. भारताच्या सीमेबाहेर जाताच आमचे राजकीय मतभेद संपतात. सीमा ओलांडताच, आम्ही प्रथम भारतीय आहोत.

थरूर सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत, जिथे ते ऑपरेशन सिंदूरवर बहुपक्षीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करत आहेत. काँग्रेस नेते उदित राज यांनी सरकारच्या समर्थनार्थ बोलल्याबद्दल थरूर यांना भाजपचे सुपर प्रवक्ता म्हटले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत-पाकिस्तानमधील मध्यस्थीच्या विधानावर थरूर म्हणाले- मी येथे कोणत्याही वादाला खतपाणी घालण्यासाठी आलो नाही. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा आदर केला जातो. त्यांनी पाकिस्तानला काय म्हटले हे आम्हाला माहिती नाही, परंतु आम्हाला कोणाच्याही सल्ल्याची गरज नव्हती.

## सुनीताच्या मोबाईलमध्ये संशयास्पद ॲप्स

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
नागपूरच्या संत कबीरनगर भागातील सुनीता जामगडे यांच्या मोबाईलमध्ये दोन संशयास्पद ॲप्स आणि चॅटिंग आढळल्याने प्रकरणात नवीन वळण आले आहे. सुनीता ४ मे रोजी १२ वर्षीय मुलासोबत पंजाबला जात असल्याचे सांगून घराबाहेर पडल्या होत्या. १४ मे रोजी कारगिलच्या नियंत्रण रेषेजवळील हंडरमन गावातून त्या बेपत्ता झाल्या.

नियंत्रण रेषा ओलांडल्यानंतर पाकिस्तानी रेंजर्सने त्यांना अटक केली. पाकिस्तानी रेंजर्सने त्यांचा मोबाईल जप्त केला. नऊ दिवसांच्या चौकशीनंतर त्यांना बीएसएफच्या स्वाधीन करण्यात आले. झोन-५ चे पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांच्या म्हणण्यानुसार, मोबाईलच्या प्राथमिक तपासणीत संशयास्पद ॲप्स आणि चॅटिंग आढळले आहे. या ॲप्सचा उद्देश आणि वापर स्पष्ट करण्यासाठी फॉरेन्सिक तपासणी करण्यात येणार आहे.



## चर्चगेट रेल्वे स्थानकात आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
मुंबईच्या चर्चगेट स्थानकाला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. येथील केकच्या दुकानाला आग लागली. या घटनेमुळे स्थानकावर सर्वत्र मोठ्या प्रमाणात धूर पसरला आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू होता.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे समजते. चर्चगेट स्टेशन हे वर्दळीचे स्थानक असून मोठ्या प्रमाणात गर्दी असते. अशा ठिकाणी आग लागल्याने एकच खळबळ उडाली. परंतु अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थाळ गाठून शर्थीचे प्रयत्न करीत आगीला आटोक्यात आणले.

# राज्यातील ९०३ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द

### फडणवीस सरकारचा धाडसी निर्णय : ३ वर्षांपासून रखडली होती अंमलबजावणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
राज्याच्या तिजोरीवर माझी लाडकी बहीण योजनेचा ताण पडत असल्याच्या बातम्या चर्चेत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्यभरातील ९०३ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे.

या योजनांची मागील ३ वर्षांपासून वेगवेगळ्या कारणांमुळे अंमलबजावणी होत नव्हती. परिणामी, सरकारने या योजनाच गुंडाळण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

राज्यातील ९०३ विकास योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली आहे. भूसंपादनाच्या अडचणी, स्थानिकांचा विरोध तथा ठेकेदारांकडून मिळणारे असहकार्य यामुळे या योजनांवरील अंमलबजावणी रखडली होती. त्यामुळे सरकारने या योजनांना वाढीव मुदत देण्यापेक्षा थेट त्यांची प्रशासकीय मान्यताच रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. लघुपाटबंधारे योजना, कोअर पाझर बंधारे, पाझर तलाव, साठवण तलाव दुरुस्ती आदी योजनांचा यात समावेश आहे.

**अर्धवट योजनांमुळे निधी अडकून पडतो**

रद्द करण्यात आलेल्या सर्व योजना मागील ३ वर्षांपासून रखडल्या होत्या. शासनाच्या या निर्णयामुळे निधीचा गैरवापर टाळण्यास मदत होईल. विशेषतः नव्या योजनांचा मार्गही यामुळे मोकळा होईल. राज्य सरकार विकासासाठी प्रयत्नशील आहे. पण अर्धवट राहिलेल्या योजनांमुळे निधी अडकून पडतो. तसेच त्याचा कोणताही लाभ जनतेपर्यंत पोहोचत नाही.

त्यामुळे अशा अडगळीत पडलेल्या योजना रद्द करून नव्याने कार्यक्षम योजना राबवण्याचा सरकारचा निर्णय अत्यंत धाडसी असल्याचे मानले जात आहे. आता सरकार या निर्णयाचा जिल्हा व तालुका पातळीवर काय परिणाम पडेल? याची चाचपणी करत आहे.

**लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर ताण**

राज्यात गत काही महिन्यांपासून लाडकी बहीण योजनेचा तान सरकारी तिजोरीवर पडण्याची चर्चा सुरू आहे. या योजनेसाठी विविध खात्यांचा निधी वळवला जात आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने ९०३ योजना गुंडाळण्याचा निर्णय घेतल्यामुळे यामागे लाडकी बहीण योजनेचे कारण आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच लाडकी बहीण योजनेसाठी कोणत्याही योजनांचा निधी वळवला जात नसल्याचा दावा केला जात आहे. लाडकी बहीण योजनेसाठी निधी वळल्याचा आरोप अतिशय चुकीचा व खोटा आहे. अर्थसंकल्पाची पद्धती ज्यांना कळत नाही, तेच अशाप्रकारे आरोप करतात, असेही सीएम फडणवीस म्हणाले होते.

## डीपीडीसी बैठकीत राडा

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ५ :
अकोला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीदरम्यान मोठा राडा झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी भाजपचे आमदार रणधीर सावरकर आणि शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. या वादानंतर बैठकीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

बैठकीनंतर दोन्ही लोकप्रतिनिधींचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले. जिल्ह्याच्या डीपीडीसीच्या बैठकीतच राडा झाल्याने या घटनेची सध्या जोरदार चर्चा होत आहे. अकोला जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडत होती.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री आकाश फुंडकर हे होते. यावेळी चर्चेदरम्यान दलित वस्ती सुधार योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रश्न उपस्थित करताना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख बोलत होते. दरम्यान, भाजपचे आमदार रणधीर सावरकर मध्येच बोलले. यावरून दोन्ही आमदारांमध्ये वाद निर्माण होऊन शाब्दिक चकमक झाली.

आमदार रणधीर सावकर आणि आमदार नितीन देशमुख यांच्यात बाचाबाची झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर दोघांचे कार्यकर्ते आमने-सामने आले. यावेळी दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते एकमेकांवर धावून गेले. दोन्ही गटाकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## समृद्धीतून मलिदा खाल्ला

### काँग्रेसचे आरोप, श्वेतपत्रिका काढण्याची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या बगलबच्च्यांनी समृद्धी महामार्गाच्या कामात मोठा मलिदा खाल्ल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

या प्रकल्पात एक-दोन नव्हे तर तब्बल १५ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. या भ्रष्टाचाराच्या पैशांतून ५० खोके एकदम ओकेचा कार्यक्रम राबवण्यात आला म्हणजे शिवसेना फोडण्यात आली, असे ते म्हणालेत. या प्रकरणी त्यांनी सरकारकडे श्वेतपत्रिका जारी करण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या प्रकल्पाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली आहे. ते म्हणाले, समृद्धी महामार्गाच्या उद्घाटनाच्या कोनशिलेचे अनावरण करतानाच या सरकारने या प्रकल्पाची श्वेतपत्रिका सादर केली अधिक बरे होईल.

याचे कारण असे की, यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. हा प्रकल्प सुरूवातीला ५५ हजार कोटींचा होता. पण शेवटी तो ७० हजार कोटींचा झाला. भाईंदरच्या बोगद्यात ३ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे सुप्रीम कोर्टात सिद्ध झाले. त्यामुळे श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाली तर समृद्धी महामार्गातही १५ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे समोर आल्याशिवाय राहणार नाही.

समृद्धी महामार्गाच्याच पैशांतून ५० खोके एकदम ओकेचा कार्यक्रमही राबवण्यात आला आहे. एकंदरीत हे एक कटबोळ आहे. या कटबोळाने समृद्धी महामार्गापेक्षा मोठा भ्रष्टाचाराचा महामार्ग यांनी उघडा केला. हा समृद्धीचा नव्हे तर भ्रष्टाचाराचा महामार्ग किंवा धंदा आहे. आता त्याचा पदार्फाश करण्याची वेळ आल्याचे सपकाळ म्हणाले.

## कुर्बानीला विरोध करणाऱ्यांवर कारवाई करा : आझमी



**मुंबई :** मुस्लीम धर्मियांचा बकरी ईद सण काही दिवसांवर आला असून बजरंग दलाचे कार्यकर्ते मुस्लीम इलाख्यात फिरुन कुर्बानी करु देणार नसल्याचे जाहीर सांगत आहेत. हत्यारांच्या जोरावर दहशत माजवणाऱ्या या समाजविघातक घटकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार व प्रदेशाध्यक्ष अबु आझमी यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस महासंचालक संजय वर्मा यांना आमदार आझमी यांनी बुधवारी यासंदर्भात निवेदन दिले आहे. नांदेड जिल्ह्यातील धमार्बाद येथे बजरंग दलाने कुबार्नीला विरोध चालवला आहे. ७ जून रोजी बकरी ईद आहे. या दिवशी बकऱ्याची कुर्बानी देण्याची मुस्लीम धर्मियांची प्रथा आहे. राज्यात गोवंशाच्या हत्येस बंदी आहे. मात्र बकऱ्याच्या कुर्बानीला विरोध करणे बेकायदा असून दहशत माजवणाऱ्या या प्रवृत्तींना अटकाव करावा. बकरी ईद सण दोन दिवसांवर आला आहे. समाजविघातक घटक राज्यातील कायदा व सुव्यस्था बिघडवण्याच्या प्रयत्नात आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्यात चोख बंदोबस्त ठेवावा, अशी मागणी आमदार आझमी यांनी केली आहे.

## वाटोळे करणाऱ्याच्या हाती मुंबई मनपा जाणार नाही



**मुंबई :** शिवसेना- भाजपच्या ताब्यात राहील आणि आमचा भगवा तिथे फडकेल, असे शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले आहे. तर मुंबईचे वाटोळे करणाऱ्याच्या हाती आता मुंबई राहणार नाही. उबाठावाल्याचे आपली मुंबई आता गुजरातमध्ये जाणार महाराष्ट्रापासून तुटणार हे वाक्य अजून बाकी असल्याचा टोलाही त्यांनी लगावला आहे. भाजप शिंदिसेनेत मुंबई मनपात मोठा भाऊ कोण, अशी चर्चा सुरू झाली आहे. याबाबत शिरसाट म्हणाले की, निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष सव्हेर्चा अहवाल आणतात. विधानसभेला ८० टक्के सर्व्हे चुकीचे निघाले. त्यामुळे मुंबई महापालिकेत कोण छोटा भाऊ आणि कोण मोठा भाऊ अजून ठरलेले नाही.

संजय शिरसाट म्हणाले की, येत्या सोमवारपासून जे काही मोठे कार्यकर्ते आहेत, अनेक चांगले पदाधिकारी हे उबाठाच्या कार्यपद्धतील कंटाळले आहेत तिथे त्यांना विचारले जात नाही, असे अनेकि लोक आहेत ते शिवसेनेमध्ये प्रवेश करत आहेत. आमचे टायगर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हे प्रवेश सुरू आहेत. आमची ही प्रकिया जोमात सुरू होणार आहे.

## सर्व आरोप धादांत खोटे



**पुणे :** शशांक हगवणेचे मामा आयपीएस अधिकारी डॉ. जालिंदर सुपेकर यांच्याव आरोपांची मालिक सुरूच आहे. जालिंदर सुपेकर यांनी विशेष महानिरीक्षक (कारागृह) या पदावर कार्यरत असताना अमरावतीत कारागृहातील कैद्याकडे ५५० कोटी रुपये मागितल्याचा आरोप कैद्याच्या वकिलांकडून करण्यात आला आहे. या आरोपावर सुपेकर यांनी प्रतिक्रिया दिली असून सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आरोप केवळ आणि केवळ आमच्या बदनामीसाठी केले जात असल्याचे सुपेकर म्हणाले.

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर चर्चेत आलेले वरीष्ठ पोलिस अधिकारी जालिंदर सुपेकर यांच्या भ्रष्टाचार आणि पैसे हडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. जालिंदर सुपेकर यांनी अमरावती तुरूंगात असलेल्या कैद्यांकडून जामीन मिळवून देण्याच्या मोबदल्यात ५५० कोटी रुपये मागितल्याचा आरोप ॲड. निवृत्ती कराड यांनी केला आहे. गायकवाड यांचे बँक लॉकर्समधील सोने आणि रोख रक्कम जप्त करताना सुपेकर आणि पुण्याचे तत्कालीन पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी १०० ते १५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप देखील ॲड. कराड यांनी केला आहे. या सर्व आरोपांवर जालिंदर सुपेकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

कारागृह वरिष्ठ अधिकारी म्हणून राज्यातील विविध ठिकाणच्या जेलला भेट देऊन आढावा घेणे जबाबदारी असते. अशीच भेट आम्ही अमरावती जेलला दिली होती. कोणत्याही बंदीवानांनी आम्हाला ओळखणे, त्यांच्याशी बोलणे संविधानिक नाही. मात्र, तरीही अमुक-तमूक आरोपीला भेटलो, बोललो, पैशांची मागणी केली, असे निरर्थक आरोप केले जात असल्याचे ते म्हणाले.

### जलसंधारणाच्या नव्या युगाची सुरुवात : संजय राठोड यांची मोठी घोषणा

# १२६७ रखडलेली कामे रद्द

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
राज्यातील जलसंधारण कामकाज अधिक प्रभावी, पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुधारित बृहत आराखडा तयार केला जाणार असून त्यासाठी पुणे येथे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले जाणार आहे, अशी घोषणा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज केली. याचबरोबर सन २००० पासून रखडलेली १२६७ कामे रद्द करण्याचा निर्णायक निर्णयही यावेळी घेण्यात आला.

मंत्रालयात झालेल्या विभागीय आढावा बैठकीत राठोड यांनी जलतज्ज्ञ, अभियंते आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा निर्णय घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, ह्लजलसंधारण विभाग हा ग्रामीण भागाचा कणा आहे आणि तांत्रिक नवकल्पनांचा वापर करून आपण या विभागाला अधिक सक्षम बनवणार आहोत.

**बृहतर आराखड्यासाठी २ दिवसांची कार्यशाळा**

पुण्यात होणाऱ्या कार्यशाळेत जलतज्ज्ञ, तांत्रिक अधिकारी, योजनाकार सहभागी होणार असून, जलसंधारणातील संपूर्ण कामांचा आढावा घेत सुधारित आराखडा तयार करण्यात येणार आहे. या कार्यशाळेत विभागातर्फे भविष्यातील योजना, तांत्रिक सुधारणा, आर्थिक नियोजन आदी बाबींचा समावेश असणार आहे.



संजय राठोड यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या आणि अपूर्ण प्रकल्पांमुळे विभागावर मोठे आर्थिक दायित्व निर्माण झाले होते. त्यामुळेच ८७२ प्रकल्प जलसंधारण विभागाचे तर ३९५ महामंडळाचे असे एकूण १२६७ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. यामुळे विभागाची आर्थिक जबाबदारी लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

राज्यातील जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार आदी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हानिहाय व राज्यस्तरावरील माहिती पुस्तिका प्रकाशित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यामध्ये यशोगाथा, सद्यस्थिती व प्रगतीपथावरील प्रकल्पांची माहिती असेल. पावसाअभावी भागात मामा तलाव, अमृत सरोवर, व झरे यांचे बळकटीकरण हे प्राधान्यक्रमात असतील. प्रत्येक विभागात पायलट प्रकल्प म्हणून पाच झऱ्यांची तपासणी होणार असून त्यासाठी स्थानिक पातळीवर पाहणी करण्याचे आदेशही देण्यात आले.

जलसंधारण अधिकाऱ्यांऐवजी जलसंधारण अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता अशी पदनामावली निश्चित करण्याचा प्रस्तावही तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

या सर्व निर्णयांमुळे जलसंधारण विभागात कार्यक्षमता, पारदर्शकता आणि गती निर्माण होणार असल्याचे स्पष्ट करत मंत्री संजय राठोड यांनी राज्यभरातील सर्व कामांची स्वतः प्रत्येक जिल्ह्यात जावून पाहणी करण्याची तयारी दर्शवली आहे. यावेळी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## इच्छा असेल तर त्यांनी एकमेकांना फोन करावा..



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे गट एकत्र येण्याची चर्चा सुरु आहे. या बाबत मनसे नेते अमित ठाकरे यांनी थेट उद्धव ठाकरे यांना सल्ला दिला आहे. त्यांना युती करायची असेल तर उद्धव ठाकरेंनी फोन करावा. मीडियात किंवा वृत्तपत्रात बोलून युती होत नसल्याचे अमित ठाकरे यांनी म्हटले आहे.

या संदर्भात पत्रकारांशी बोलताना अमित ठाकरे यांनी त्यांच्या बाजूने भूमिका स्पष्ट केली आहे. सध्या मीडियात दोन भाऊ - दोन भाऊ असे बोलले जात आहे. मात्र, यात युतीसंदर्भात त्या दोन भावांनी बोलायला हवे. खालील नेत्यांपैकी कोणी कितीही बोलून काही उपयोग होणार नाही. मी २०१६ -१७ किंवा कोविड काळात देखील हे बघितले आहे. त्यावेळी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना पहिला फोन केला होता. कोरोना हे भयंकर संकट आहे. कोणतेही सरकार असो आपण त्यांची साथ द्यायला हवी, असे राज ठाकरे यांनी म्हटले होते. मात्र, आता केवळ वर्तमानपत्रात बोलून अशा युती नसल्याचे अमित ठाकरे यांनी म्हटले आहे.

वृत्तपत्रातून किंवा माध्यमांतून कोणत्याही दोन पक्षांमध्ये युती होत नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र तथा मनसे नेते अमित ठाकरे यांनी या बाबत आपली भूमिका स्पष्ट केली. या दोघांनी एकत्र येण्यास आमची काहीही हरकत नाही. दोघ भाऊ एकत्र येण्यात मला काहीही इशू नाही. मात्र त्या दोन भावांनी बोलला पाहिजे, असे देखील अमित ठाकरे यांनी म्हटले आहे.

## आदित्य ठाकरेची मनसेला साद

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**



उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या आधी एकत्र येणार असल्याची चर्चा जोर धरत आहे. स्वतः उद्धव ठाकरे, संजय राऊत यांच्यासह आता आदित्य ठाकरे यांनी देखील याबाबत मनसेला साद घातली आहे. त्यामुळे आता याबाबत मनसेच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मात्र, मनसे अजूनही सावध भूमिकेत आहेत. याबाबत सावधतेने आणि हळूहळू पावले टाकण्याचे मनसेचे प्रयत्न दिसून येत आहे. त्यातच या युती बाबत मनसे देखील सकारात्मक असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील युती बाबत आम्हाला देखील माध्यमांमधूनच कळत आहे. तसा युतीचा कोणताही प्रस्ताव शिवसेनेकडून आमच्याकडे आलेला नसल्याचे मनसेचे नेते यशवंत किल्लेदार यांनी म्हटले आहे. तसा प्रस्ताव आला तर त्यावर राज ठाकरे भूमिका घेतील. मात्र माध्यमातून असे प्रस्ताव येत नसतात. या आधी आमचे हात पोळलेले आहेत. त्यामुळे 'हात पोळल्यानंतर ताक सुद्धा फुंकुन' प्यावे असे म्हणतात. त्यातलाच हा एक भाग आहे. त्यामुळेच आम्ही सावध भूमिका घेत असल्याचे किल्लेदार यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या सूचक वक्तव्यानंतर उद्धव सेना व मनसेतील संभाव्य युतीच्या चर्चांनी आणखीनच जोर धरला आहे.

खासदार संजय राऊतही दोन बंधू एकत्र येतील, असे संकेत देत आहेत. या पार्श्वभूमीवर आता उद्धव ठाकरे यांचे पुत्र व युवा नेते आदित्य ठाकरे यांनीही मनसेला सोबत येण्याची साद घातली आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी आम्ही कोणत्याही पक्षाबरोबर एकत्र येण्यास तयार आहोत. म्हणूनच आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला साद दिली असल्याचे आदित्य ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले.

आदित्य ठाकरे म्हणाले की, मराठी माणूस व महाराष्ट्राच्या हितासाठी जो कोणी आमच्याबरोबर यायला तयार असेल आम्ही त्यांना बरोबर घेऊन महाराष्ट्र हितासाठी लढत राहू. काल परवा आमचे नेते दीपेश म्हात्रे व मनसेचे नेते राजू पाटील यांनी एकत्र येऊन आंदोलन केले. हे त्याचेच उदाहरण आहे. मात्र, महाराष्ट्राचे हित म्हणजे नेमके काय, हे आदित्य यांनी सांगितले नाही. यापूर्वी आमदार अनिल परब, अंबादास दानवे, सुनील प्रभू यांनीही युती बाबत अनुकूलता दर्शवली आहे. दुसरीकडे, मनसेच्या दुसऱ्या फळीतील काही नेते या युती बाबत फारसे उत्साही दिसत नाहीत.

## आपल्यासोबतच राहणार कोरोना

### आरोग्यमंत्र्यांच्या सूचना

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**
राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गुरुवारी महाराष्ट्रात १०५ नवीन रुग्णांची नोंद झाली असून ३ नवीन बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यासोबतच राज्यातील सक्रिय कोविडबाधित रुग्णांची संख्या ५२६ वर पोहोचली आहे.

वाढत्या कोविड रुग्णांच्या पार्श्वभूमीवर राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. कोरोना आपल्यासोबतच राहणार, लोकांना पॅनिक होऊ देऊ नका, अशा सूचना आरोग्यमंत्र्यांनी केल्या आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक सक्रिय रुग्णसंख्या असलेला जिल्हा पुणे आहे, याठिकाणी ४१ सक्रिय रुग्ण आहेत. त्यानंतर मुंबई (३२), ठाणे (१५), नवी मुंबई (९), सातारा (५) आणि नाशिक, संभाजीनगर आणि नागपूर येथे प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे.

आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी वाढत्या कोरोना रुग्णसंखेवर प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. पुन्हा एकदा कोरोना रुग्णसंखेत वाढ होत असली तरी जनतेने घाबरून जाऊ नये असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या आधी देखील सांगितला आहे, कोरोना वाढला तरी काळजीची गरज नाही. कोरोना आपल्या सोबतच राहणार आहे. आता आपली प्रतिकारशक्ती ही वाढली आहे.

## ट्रॅव्हल्स उलटली, 30 जखमी

■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ५ :**
सोलापूर - पुणे महामार्गावर आढेगाव शिवारात बस चालकाला झोप लागल्यामुळे एक खासगी बस खड्यात उलटली. गुरुवारी पहाटे ४ च्या सुमारास हा मोठा अपघात झाला. या अपघातात पुणे व मराठवाड्यातील तब्बल ३० प्रवाशी जखमी झालेत. त्यापैकी २० जण गंभीर जखमी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अपघातग्रस्त बस (एमएच ४८ के १९१८) ही बुधवारी रात्री उशिरा लातूरच्या शिरपूर येथून पुण्याच्या दिशेने निघाली होती. सोलापूर पुणे महामार्गावरील आढेगाव शिवारात ती भरधाव वेगात खड्डयात उलटली. यावेळी मोठा आवाज झाला.



हा आवाज ऐकूण आसपासच्या लोकांनी व इतर वाहनचालकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ जखमींना रुग्णालयात पोहोचवले. माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस ही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## भाजप एकनाथ शिंदेंचा पक्ष फोडण्याच्या प्रयत्नात..

### संजय राऊत यांचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**
भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या काळात अराजक माजवले जात आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या अराजकाचा इशारा दिला होता, त्याची सुरूवात मोदी - शहांच्या काळात झाली आहे, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी गुरूवारी केला.

भाजप एकनाथ शिंदेंचा पक्ष फोडण्याच्या प्रयत्नांत असल्याचे नमूद करत राऊत यांनी यावेळी शिंदेंचे ६ खासदार भाजपत, तर २२ आमदार अजित पवार गटाच्या वाटेवर असल्याचाही दावा केला.

संजय राऊत यांनी गुरूवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी एकनाथ शिंदे, सुधाकर बडगुजर यांच्यावरील कारवाई, मुंबईवरील अदानींचे कथित आक्रमण तथा राज व उद्धव ठाकरे यांची संभाव्य युती आदी विविध मुद्यांवर प्रकाश टाकला.

ते म्हणाले, पैशाच्या जोरावर माणसांना पक्षांतर करण्यास भाग पाडणे, याला कुणीही आऊटगोइंग किंवा इनकमिंग सारख्या शब्दांची उपमा देऊ नये. मी मागेही म्हणालो. आमच्याकडे ईडी व सीबीआयवाले केवळ २ तास आले, तर या राज्याच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांपासून संपूर्ण भाजपमधून ९० टक्के आऊटगोइंग होईल. पण त्याला तुम्ही वैचारिक पक्षांतर म्हणू शकत नाही. कुणी तसे म्हणत असेल तर ते पूर्णतः चुकीचे आहे. कुणाला जायचे आणि कुणाला थांबायचे हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न असतो. पण पक्षात राहून तुम्ही पक्षाविरोधात कारवाया कराल, तर तुमच्यावर कारवाई केली जाईल. उद्धव बाळासाहेब ठाकरे हे ज्या शिवसेनेचे प्रमुख आहेत आणि जो बाळासाहेबांचा पक्ष आहे, तो पक्ष कोणत्याही प्रकारचा दबाव व ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही.

## आयटी अभियंता तरुणीची २१ व्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :**
पुण्यातील हिंजवडी भागात आयटी क्षेत्रात कार्यरत एका २५ वर्षीय तरुणीने २१ व्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली. माझी जगायची इच्छा संपली आहे, अशी चिठ्ठी लिहून या तरुणीने आपले आयुष्य संपवले.

अभिलाषा भाऊसाहेब कोथंबिरे (२५) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. ती आयटी अभियंता म्हणून हिंजवडी आयटी पार्कमधील एका खासगी कंपनीत कार्यरत होती. तिची एक मैत्रीण द क्राऊन ग्रीन सोसायटीमध्ये राहत होती. पहाटे अभिलाषा दुचाकीवरून द क्राऊन ग्रीन या सोसायटीत आली. लिफ्टने ती थेट २१ व्या मजल्यावर गेली. पहाटे सुमारे ४.४५ च्या सुमारास तिने उडी मारून जीवन संपवले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पाठवण्यात आला असून, तपास सुरू आहे.

## लाडक्या बहिणींना मे महिन्याचे १५०० रूपये मिळण्यास सुरूवात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेंतर्गत मे महिन्याचा हप्ता वितरणास सुरूवात केली आहे. राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी स्वतः ही माहिती दिली आहे. त्यामुळे महिलांना योजनेचा ११ वा हप्ता केव्हा मिळणार? हा प्रश्न निकाली निघाला आहे.

महायुती सरकारने गतवर्षी जुलै महिन्यात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. तेव्हापासून आतापर्यंत महिलांना १० हप्ते मिळालेत. पण मे महिना संपला तरी अद्याप महिलांना ११ वा हप्ता मिळाला नव्हता. पण आता हा हप्ता जमा होण्यास सुरुवात झाली आहे. लाभार्थी महिलांना तसे मेसेज मिळण्यास सुरूवात झाली आहे.

राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी बुधवारी रात्रीच एका पोस्टद्वारे मे महिन्याचा हप्ता वितरित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले होते.

त्या म्हणाल्या होत्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना मे महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात आली आहे. योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार लिंक्ड बँक खात्यात उद्यापासून हा सन्मान निधी जमा होणार आहे.

महायुती सरकारचा दृढ निश्चय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा दृढ विश्वास या बळावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची दमदार वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहणार हा मला विश्वास आहे, असे त्या म्हणाल्या.

**आधार कार्ड लिंक असलेल्या खात्यांत जमा होणार पैसे**

अदिती तटकरे यांच्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेचा निधी आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात जमा होत आहेत. त्यामुळे एखाद्या लाभार्थी महिलेला पैसे जमा झाल्याचा मेसेज आपला नसेल तर त्यांनी बँकेत जाणून आपल्या खात्याची स्थिती जाणून घ्यावी.

संबंधित बँकेचे ॲप असेल तर त्यातही त्यांना हा निधी जमा झाला किंवा नाही हे पाहता येईल. तूर्त या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या लाखांत असल्यामुळे सर्वांच्या खात्यात पैसे जमा होण्यास ३-४ दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे आज तुमच्या पैसे आले नसतील तर तुम्हाला पुढील एक-दोन दिवस वाट पहावी लागेल.

# कामगारांच्या न्यायासाठी मंत्री थेट जनता दरबारात!

### ॲड. आकाश फुंडकर यांनी ऐकल्या तक्रारी, तातडीने तोडगा काढण्याची ग्वाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित केलेल्या जनता दरबारात थेट जनतेच्या आणि कामगार संघटनांच्या तक्रारी ऐकून घेतल्या.

राज्यभरातून आलेल्या कामगार संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने या दरबारात सहभागी झाले. या संवादादरम्यान कामगारांनी मांडलेल्या समस्या समजून घेत तातडीने बैठका घेऊन निराकरण करण्याचे आश्वासन मंत्री फुंडकर यांनी दिले.

या जनता दरबारात कामगार कायद्यांशी संबंधित अनेक विषयांवरही सविस्तर चर्चा झाली. विविध क्षेत्रातील कामगारांसमोर उभ्या असलेल्या अडचणी, पेन्शन, वेतन, स्थायीकरण, कामगार सुरक्षा यांसारख्या विषयांवर मंत्री फुंडकर यांनी सजगपणे चर्चा केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या कार्यवाहीचे निर्देश दिले.



सामान्य कामगारांपासून ते संघटनांच्या प्रतिनिधींना न्याय मिळवून देणे हे माझे प्राधान्य आहे. सरकारी यंत्रणांनी संवेदनशीलतेने काम करणे गरजेचे आहे, असे फुंडकर म्हणाले. जनता दरबार हा संवादाचा सेतू आहे आणि हा उपक्रम नियमितपणे राबवला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमासाठी प्रेरणा आणि पाठींबा दिल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांचे कामगार मंत्री फुंडकर यांनी आभार मानले. जनता दरबाराचे आयोजन प्रभावीपणे पार पाडल्याबद्दल भाजप प्रदेश समन्वयक सुधीर देऊळगावकर यांचेही त्यांनी उल्लेख केला.

# मनीष शेंद्रे खूनप्रकरणी आरोपींना अटक

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ५ :



शहरातील चांदणी चौकात मंगळवारी सायंकाळी धारदार शस्त्राने वार करीत मनिष शेंद्रेची हत्या करण्यात आली. या खुनातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने मध्यरात्री बेड्या ठोकल्या. यामध्ये पाच आरोपींसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. खुनाच्या घटनेनंतर मृताच्या नातेवाइकांनी शहर पोलिस ठाणे तसेच एलआयसी चौकात जमाव केला होता. त्यामुळे बराच वेळा तणाव निर्माण झाला होता.

प्राप्त माहितीनुसार, कळंब चौकात एक वर्षा अगोदर शादाब खान याची गोळी झाडून हत्या झाली होती. या हत्येतील आरोपी मृत मनिष सागर शेंद्रे (वय २७) रा. सेजल रेसिडंन्सी, अंबिका नगर, यवतमाळ हा कारागृहात शिक्षा भोगत होता. अशात ११ एप्रिल रोजी तो जामीनावर बाहेर आला होता. तेव्हापासूनच आरोपी मनिष शेंद्रे याच्यावर पाळत ठेवून होते. त्या ठिकाणी मोहसीन खान अयुब खान (वय ३२) वर्ष रा. ताजबाग नगर, फैजान खान उर्फ साहिल मेहमूद (वय २१) वर्ष, रा. तायडे नगर, दानीश उर्फ सबा सलीम अहमद (वय २१) वर्ष रा. कुंभारपुरा, सोहेल खान युसूफ खान (वय २३) वर्ष, रा. तायडे नगर, शेख काशीफ शेख फरीद (वय १९) वर्ष, रा. डोर्ली रोड तसेच एक विधीसंघर्षग्रस्त बालक दबा धरून होते. त्यावेळी आरोपींनी मनिष शेंद्रे याला अडवून धारदार शस्त्राने हल्ला करून ठार मारून घटनास्थळावरून पळ काढला.

पोलिसांनी लगेच हिंगणघाट रोडवरील पेट्रोल पंपालगतच्या ढाब्यावरून तीन आरोपींसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. ही कारवाई गजानन राजमल्लू, सैय्यद साजिद, रूपेश पाली, योगेश डगवार, प्रशांत हेडाऊ, आकाश सूर्यवंशी, देवेंद्र होले, राम पोपळघट, महेश वाकोडे, धनंजय श्रीरामे, सुनील मेश्राम यांनी पार पाडली.

नागपूरच्या दिशेने आरोपींनी काढला पळ घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांचे वेगवेगळे पथके आरोपींच्या शोधार्थ रवाना करण्यात आले होते. सुरवातीला कळंब गाठून सोहेल खान युसूफ खान आणि शेख काशीफ शेख फरीद याला ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केली असता, उर्वरित आरोपी नागपूरच्या दिशेने पळून गेल्याची माहिती प्राप्त झाली.

## काळ्या बाजारात जाणारा रेशनच्या तांदळाचा ट्रक पकडला

■ महासागर प्रतिनिधी, दारव्हा, दि. ५ :

शासनातर्फे रेशनच्या दुकानात वितरित करणारा तांदळाची अवैधरीत्या वाहतूक करताना उपविभागीय पोलिस अधिकाऱ्याच्या पथकाने शहरातील आर्णी मार्गावरील पेट्रोलपंपावर पकडला. तालुक्यातील बोदेगाव येथून सोळा चाके असलेल्या ट्रकातून तांदळाची तस्करी केली जाते.

बोदेगाव येथून तांदूळची तस्करी करून शहरातील आर्णी मार्गावरील पेट्रोलपंपावर सदर ट्रक थांबलेला असल्याची गोपनीय माहिती उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाला मिळाली. त्यावरून उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने घटनास्थळ गाठून एम.एच ४० सी.एम. ६६३३ क्रमांकाचा ट्रकची पाहणी केली. ट्रकमध्ये ३५ टन तांदळाचा साठा आढळून आला.

सर्व मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. हा अवैध तांदूळ बोदेगाव येथील धीरज राठोड, गोलू गोपणे, अलीम शेख यांचा असल्याची माहिती आहे. याबाबतचा पुढील तपास सहायक पोलिस अधिक्षक तथा उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पथकाकडून केला जात आहे.

# पातूरच्या पं.स.वर महिलांचा मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी, पातूर, दि. ५ :



शिर्ला ग्रामपंचायत अंतर्गत येणारा जिरायत पातूर, बागायत पातूर व शिर्ला परिसरातील अनेक गोरगरीब, भूमिहीन व बेघर नागरिकांना अद्यापही घरकुल योजनेचा लाभ मिळालेला नाही. या अन्यायाविरोधात आवाज उठवत ३ जून २०२५ रोजी महिलांनी एकत्र येऊन पातूर पंचायत समितीवर जोरदार मोर्चा काढला. आमचं घर कुठंय? असा सवाल करत त्यांनी घरकुल योजनेंतर्गत आपला हक्क मागितला.

मोर्चाचे नेतृत्व शिर्ला परिसरातील महिलांनी केले. त्या म्हणाल्या की, "आमच्याकडे मोठे मोबाइल नाहीत, डिजिटल ॲप वापरणे आम्हाला शक्य नाही. आम्ही कच्च्या मातीच्या घरांमध्ये राहतो. पावसात घर गळते, उन्हात तापते, तरीही आमच्या नावावर घरकुल मंजूर होत नाही. ग्रामपंचायत अधिकारी व डिजिटल ॲपद्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात अनेक गरजू नागरिक व महिलांना डावलण्यात आले आहे, असा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला. बळी तो कानपिळी अशी व्यवस्था या गावात चालू असून, घरकुलाच्या पात्रतेसाठी योग्य असतानाही आम्हाला दुर्लक्षित केले जात आहे, असा ठपका त्यांनी ग्रामपंचायतीवर ठेवला. गटविकास अधिकारी कुमारी सुनीता इंगळे यांनी मोर्चेकऱ्यांची मागणी ऐकून घेतली व न्याय देण्यासाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. तपासणी आणि सुधारणा न झाल्यास लढा तीव्र करू, असा इशारा महिलांनी दिला आहे. शिर्ला परिसरातील महिलांनी हे स्पष्ट केले की, जर लवकरच न्याय मिळाला नाही, तर पुढील काळात पंचायत समितीसमोर ठिय्या आंदोलन छेडले जाईल. फक्त कागदावर नको, आमच्या घराच्या भिंतीवरही दिसली पाहिजे,असा ठाम इशारा त्यांनी दिला. या महिलांच्या एल्गाराने प्रशासनाचे लक्ष वेधले असून, खऱ्या गरजूंपर्यंत घरकुल योजनेचा लाभ पोहोचवण्याच्या दिशेने काही सकारात्मक हालचाली होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सागर रामेकर, तालुकाप्रमुख रवींद्र मुर्तडकर, शहरप्रमुख निरंजन बंड, परसराम उंबरकर, ॲड.सुरज झडपे आदी उपस्थित होते. मोर्चाच्या माध्यमातून महिलांनी आपली बाजू ठामपणे मांडली आणि गटविकास अधिकारी कुमारी सुनीता इंगळे यांना निवेदन दिले. निवेदनाची तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

# डायटकडून २९०० शिक्षकांना प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ५ :



नवीन शैक्षणिक धोरणानुसार पहिलीच्या अभ्यासक्रमात यावर्षीपासून बदल करण्यात आला. नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे. जिल्ह्यात पहिलीच्या वर्गांना शिकवणाऱ्या २ हजार ९०० शिक्षकांना डायटकडून दि. १३ ते १५ जून दरम्यान नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे पहिलीच्या अभ्यासक्रमात आरोग्य व शारीरिक शिक्षणावर भर असणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना बालवयातूनच स्वतःच्या आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी मदत होणार आहे.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण टप्याटप्याने लागू करण्यात येत आहे. यावर्षी पहिलीचा अभ्यासक्रम त्याच अनुषंगाने बदलून तयार करण्यात आला आहे. संविधानाला अभिप्रेत असणारे, सकस व गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे, यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तर तसेच बालकाचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम यातील मार्गदर्शक तत्त्वात्च्या आधारे स्थानिक गरजांचा संदर्भ घेऊन नवीन अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. पहिली व दुसरीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना क्षमता, ज्ञान, अभिवृद्धी विकासाला स्थान देण्यात आले आहे. बालकाच्या सुरुवातीच्या पाच वर्षांच्या शैक्षणिक कालखंडास पायाभूत स्तर असे संबोधण्यात आले आहे. अशा सुरक्षितता, संगोपन, पोषण, कौशल्य, स्वच्छता, व्यायाम, भावना व्यवस्थापन, खेळ याचाही अभ्यासामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

तसेच, प्रारंभिक संख्येज्ञान, साक्षरता, साक्षरतेचे संतुलन या बाबींवरही विशेष लक्ष देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना शाळेमध्ये शिक्षण घेत असताना कंटाळवाणे वाटू नये, याचीही दक्षता घेण्यात आली आहे. या संदभार्तील प्रशिक्षण १३ ते १५ जून दरम्यान सोळा तालुक्यात सुरू करण्यात येणार आहे. प्रत्येक तालुका स्तरावर, डायटच्या वतीने प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# माहेश्वरी समाजातर्फे महेश नवमीनिमित्त विराट शोभायात्रा

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ५ :



सकल माहेश्वरी समाजाचा वंशोत्पती दिवस म्हणून महेश नवमीनिमित्त बुधवारी भगवान महेश यांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेचा प्रारंभ राजराजेश्वर मंदिरापासून राजराजेश्वर यांच्या पूजा व आरतीने करण्यात आला. आकर्षक रथात भगवान महेश यांच्या प्रतिमेस विराजमान करून विविध झाकी समवेत महिला पुरुषांच्या पारंपरिक वेषात ही शोभायात्रा राजराजेश्वर मंदिरापासून प्रारंभ होऊन जयहिंद चौक, सिटी कोतवाली, टिळक रोड, जुने कापड बाजार, गांधी चौक, तहसील चौक मार्गे निघाली होती. राजेश्वर मंदिर पूजा व्यवस्था राजेंद्र चतलंगे यांनी केली. माहेश्वरी समाज ट्रस्ट व संलग्न संस्थांच्या वतीने आयोजित शोभायात्रेचे मुख्य अतिथी नागपूर आयकर बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेश लोहिया यांच्या हस्ते व माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजय पनपालीया, विजयकुमार राठी, उत्सव प्रमुख विनीत बियाणी, महिला मंडळ अध्यक्ष शिल्पा चांडक, माहेश्वरी प्रगती मंडळ अध्यक्ष सुरज काबरा, नवयुवती मंडळ अध्यक्ष नंदिनी बजाज, वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठचे अध्यक्ष प्रा. गोपिकीसन कासट, महिला प्रकोष्ठ अध्यक्ष प्रमिला लाहोटी आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

तसेच आयएमसीसी क्लबच्या वतीने सुंदर रामेश्वर झाकी, राम लक्ष्मण सीता व हनुमंताच्या आकर्षक देखाव्या समवेत साकार करण्यात आली. यात प्रसन्न पूर्वाल यांनी राम भूमिका केली. या शोभायात्रेचे जागोजागी विविध संस्था मंडळ व संघटनांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

## शहरातील आदर्श कॉलनीत हिरवी क्रांती?

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ५ :

गोरक्षण रोडलगत असलेल्या आदर्श कॉलनीतील "आदर्श पार्क' सध्या पर्यावरण संवर्धनाचा एक उत्कृष्ट नमुना ठरत आहे. विशेष म्हणजे या पार्कची देखभाल ना महापालिका करते, ना खासगी यंत्रणा. ही जबाबदारी परिसरातील नागरिकांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. शहरातील हा एकमेव असा पार्क आहे की जिथे गावंडे दाम्पत्य झाडांना पाणी घालतात, आणि स्वखर्चाने नव्या झाडांची लागवड करतात. यामागे असलेली प्रेरणा म्हणजे माजी नगरसेविका कल्पना गावंडे आणि त्यांचे पती अजय गावंडे. अजय गावंडे हे पार्कमधील झाडांची प्रेमाने आणि निष्ठेने देखभाल करतात. यंदाच्या पर्यावरण दिनीही त्यांनी स्वखर्चातून आणलेल्या नव्या झाडांची लागवड करण्याचा निर्धार केला आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **GENDLAL SAHU /GAIDLAL SAHU.** NOW MY NEW NAME IS **GENALAL SAHU.**
ADD : RANAPRATAP NAGAR NAGPUR -22


MY OLD NAME WAS **ANKITA CHOUDHARI.** NOW MY NEW NAME IS **MAHEK MANOJKUMAR KESWANI.**
ADD : PLOT NO.14-I,HEMU KALANI COLONY, NEAR HANUMAN MANDIR, JARIPATKA, NAGPUR-440014

MY OLD NAME WAS **RAJENDRA BAIS / RAJENDRASIH BAIS.** NOW MY NEW NAME IS **RAJENDRASING BAIS.**
ADD : N.H.06, NEAR RESTARENT BAR SIRPUR PO. SHIRPUBAGH COLONY GONDIA

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **K6771706**. MY OLD NAME WAS **MAKARAND HADAP.** NOW MY NEW NAME IS **MAKRAND BHALCHANDRA HADAP.**
ADD : PLOT NO 30 VAISHALI APT RAMKRISHNA NAGAR KHAMLA NAGPUR 440025

MY OLD NAME WAS **CHAUHAN TUSHAR ANILSINGH.** NOW MY NEW NAME IS **TUSHARSINGH ANILSINGH CHAWHAN.**
ADD : HOUSE NO 1086 B/96 BANGADE PLOT SHITLA MATA MANDIR, SHANTI NAGAR, NAGPUR- 440002


# वृक्षप्रेमींची मियावाकी पद्धतीने १०००० वृक्षांची हरित क्रांती



■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड, दि. ५ :

शहरातील ध्येयवेड्या वृक्षप्रेमींनी औदुंबर नगरी हिरवीगार करण्याची चळवळ चालू केली आहे. वेगवेगळ्या दिवसाचे औचित्य साधून विविध उपक्रम औदुंबर वृक्ष समितीने राबवले आहे. मियावाकी पद्धतीने वृक्षारोपण करून आजपर्यंत दहा हजारांवर वृक्ष लावले आहेत.

वृक्ष लावणे त्याचे संवर्धन करणे हे ओळखून औदुंबर नगरीतील काही ध्येय वेड्या वृक्षप्रेमींनी व्हॉट्सॲपच्या चर्चेतून औदुंबर नगरी हिरवीगार व्हावी, या उद्देशाने ३ एप्रिल २०१६ रोजी औदुंबर वृक्ष संवर्धन समितीची स्थापना केली. समितीत २० ते ८० वर्षापर्यंतचे सदस्य आहेत. आजपर्यंत समितीने देवी टेकडी, महादेव टेकडी, धोंगडे पीर टेकडी, शाळा परिसर, बुद्ध विहार, स्मशानभूमी, सरकारी दवाखाना अशा ३५ स्थळांसह श हरातील अनेक मान्यवरांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लावले आहेत. औदुंबर वृक्ष संवर्धन समितीतील सदस्यांसह शहरातील कुठल्याही मान्यवरांच्या वाढ दिवसाचे औचित्य साधून वृक्ष लावण्यात येते.

या वृक्षाची लागवड आणि संवर्धन सुद्धा समिती करत असते. वृक्ष लागवड होत असलेल्या जागेला बर्थ डे गार्डन, असे नाव दिले. सातत्यपूर्ण, निस्वार्थ कायार्ची पावती समितीला महाराष्ट्र शासनाकडून मिळाली.

शासनाकडून देण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार, भगीरथ पुरस्कार, भाऊसाहेब माने प्रतिष्ठानचा राज्य कृषी पुरस्कार, असे अनेक पुरस्कार देऊन समितीला गौरवण्यात आले.

शेताच्या बांधावर लावले साडेतीनशे फळवृक्ष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याला ६ जून २०२४ रोजी ३५० वर्ष पूर्ण झाले. त्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या बांधावर कळवृक्ष लागवड उपक्रमाच्या माध्यमातून ३५० फळाचे वृक्ष लागवड समितीने केली.

शेतकऱ्यांच्या बांधावर ३५० वृक्ष विविध फळाचे वृक्ष लागवड करण्याकरिता आजी-माजी सैनिकाच्या हस्ते शेतकऱ्यांना त्यांच्या शेताच्या बांधावर लावण्याकरिता वाटप करण्यात आले. या उपक्रमास शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे.

## दोघांची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, अकोट, दि. ५ :

तालुक्यातील बोर्डी आणि रामापूर या दोन्ही शेजारी शेजारी असलेल्या गावात एकाच वेळी दोघांनी आत्महत्या केल्याची घटना बुधवारी घडली आहे. अकोट ग्रामीण पोलिसांनी मर्ग दाखल केला असून, मृतदेह अकोट ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. अकोट तालुक्यातील रामापूर येथे गणेश रामहरी डाफे (२७) या तरुणाने राहत्या आत्महत्या केल्याची फिर्याद मृतकाचा चुलत भाऊ श्रीहरी गजानन डाफे यांनी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली.

## तिहेरी अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
चिखली, दि. ५ :

चिखली-मेहकर रोडवरील खैरव फाट्याजवळ झालेल्या तिहेरी अपघातात एकाच परिवारातील तिघांचा मृत्यू झाला. ही घटना बुधवारी, ४ जून रोजी दुपारी घडली. मृतांमध्ये माता-पिता आणि पुत्राचा समावेश असून ते बुलडाणा तालुक्यातील घाटनांद्रा येथील रहिवासी असल्याची माहिती आहे.

घाटनांद्रा येथील रहिवासी गणेश यादव गायकवाड (वय ४५), हे आपल्या पत्नी लक्ष्मी गणेश गायकवाड (वय ४०) व मुलगा कृष्णा गणेश गायकवाड (वय १५) वर्षे यांना सोबत घेवून दुचाकी क्रमांक एम एच २१ जे १४०३ ने मेहकर येथे असलेल्या लग्नासाठी जात होते. खैरव फाट्याजवळ वेगाने जात असलेल्या डस्टर कार क्रमांक एम एच ०४, जेई ५५०८ वरील चालकाने समोर जात असलेल्या एका ट्रक ला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी कारचे नियंत्रण सुटल्याने या कार व ट्रकची टक्कर झाली. याच वेळी दुचाकी या दोन्ही वाहनांमध्ये सापडल्याने तिचा अक्षरशः चुराडा झाला. दुचाकीवर असलेले गणेश यादव गायकवाड, लक्ष्मी गणेश गायकवाड यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा पुत्र कृष्णा गणेश गायकवाड याला खासगी रुग्णालयात नेले असता त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. सिमेंट रोडमुळे वाहने सुसाट चिखली-मेहकर हा मार्ग सिमेंटचा व प्रशस्त झाल्याने या मार्गावर नेहमीच वाहने भरधाव वेगाने धावतात. अनेक वाहने एकमेकांना समोर जाण्याची जणू स्पर्धाच या मार्गावर असल्याचे चित्र नेहमीच बघावयास मिळत आहे. मार्गावर आता पूर्वीच्या तुलनेत अपघाताची संख्या मोठया प्रमाणात वाढल्याचे दिसत आहे.

# महेश नवमी साजरी

■ महासागर प्रतिनिधी
मोताळा, दि. ५ :

येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने आज ४ जून रोजी महेश नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी समाज बांधवांच्या वतीने गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी समाज बांधवांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून मिरवणुकीत सहभागी झाले होते.

माहेश्वरी मूळचा वंश युधिष्ठर सवंत ९ च्या ज्येष्ठ शुल्क पंचमीला झाला होता तेव्हापासून माहेश्वरी समाजामध्ये दरवर्षी ज्येष्ठ शुक्लपंचमीचा दिवस हा महेश नवमी म्हणून साजरा केला जातो त्याचप्रमाणे आज ४ जून रोजी येथे महेश नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम महादेवाच्या पिंडीवर माहेश्वरी युवक मंडळाच्या वतीने जलाभिषेक करण्यात आला त्यानंतर भगवान महेश यांची प्रतिमा वाहनात ठेवून खरबडी मार्गावरील हनुमान मंदिरापासून मिरवणूक काढण्यात आली. आठवडी बाजार, स्टेट बँक चौक येथून बस स्थानक परिसरातून जुन्या मलकापूर रोडने मार्गक्रमण करत सहकार विद्या मंदिर येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी बारावीमध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या समाजातील कनक अजय राठी, राधा रनछोड चांडक या दोन विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात पुरुषांनी नेहरू शर्ट पायजमा व महिलांनी राणी कलरच्या साड्या परिधान केलेला पोशाख सर्वांचे आकर्षण ठरत होते. कार्यक्रमाला माहेश्वरी समाजबांधव सहकुटुंब सहभागी झाले होते.


## चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

जावक क्रमांक :- चंशमनपा/उद्यान विभाग/२०२५/९०१ दिनांक : ०५/०६/२०२५

## निविदा सुचना

आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, जि. चंद्रपूर यांचे वतीने खालील कामासाठी दोन लिफाफा पध्दतीने निविदा पध्दतीच्या उद्यान विभागाचा कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना उद्यान विभागात उपलब्ध आहे.

| १ | कामाचे वर्णन | निविदे सोबत भरावयाची इसारा रक्कम | कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत | काम करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या उद्यान विभागा मार्फत वृक्ष लागवडीकरिता शहरातील विविध ठिकाणी खड्डे करण्याचे कामाबाबत | रु.९९३६/- | रु.५६०/- | ६ महिने |

**निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| निविदा विक्री व स्वीकृती दिनांक | दिनांक ०५/०६/२०२५ ते १२/०६/२०२५ ला दु. ३.०० वाजेपर्यंत |
| निविदा सादर करावयाची दिनांक | दिनांक १३/०६/२०२५ ला दु. ४.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडणी दिनांक | दिनांक १६/०६/२०२५ ला दु. ५.०० वाजता शक्य झाल्यास |

स्वा/ -
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर


# लढाई करायची की नाही हे निवडलेले सरकार ठरवते : कर्नल जतकर

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा , दि. ५ :




युद्ध म्हणजे काय? आणि ऑपरेशन म्हणजे काय? १९४८,१९६५ ,१९७१ यावेळी जे झाले ते युद्ध होते. सध्या २०२५ मध्ये जे झालं ते ऑपरेशन. युद्ध निर्णायक असते तर ऑपरेशन हे फक्त एखादे लक्ष देऊन त्यावर करायचे असते. युध्दाला खूप खर्च येतो. ऑपरेशन हे लढाईच्या तुलनेत कमी खर्चात होते. लढाईने कोणताही देश प्रगतीच्या दृष्टीने दहा वर्ष मागे येतो. लढाईची करायची की नाही हे निवडून आलेले तत्कालीन सरकार ठरवते, असे मत कर्नल सुहास जतकर यांनी यावेळी व्यक्त केले.

ऑपरेशन सिंदूरच्या निमित्ताने गर्दे वाचनालय बुलडाण्याच्या वतीने कर्नल सुहास जतकर यांच्या संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कर्नल सुहास जतकर यांनी युद्ध व ऑपरेशन या दोन्ही मधील मुख्यत्वे काय फरक असतो हे स्पष्ट करून याबाबतची माहिती कॅप्टन मोहन कुळकर्णी यांच्याशी संवाद साधताना दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गर्दे वाचनालयाचे अध्यक्ष गोकुळ शर्मा हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर नाना कुळकर्णी, महेश पेंडके, ओमसिंग राजपूत, गर्दे वाचनालयाचे सचिव उदय देशपांडे, डॉ.सुभाष जोशी,विनायक वरणगांवकर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. प्रवीण पिंपरकर, रवींद्र जाधव, संजय काळे, रवींद्र कुळकर्णी,आशुतोष वाईकर, मंदार बाहेकर, अरविंद होंडे, ग्रंथपाल नेमिनाथ सातपुते, श्रीकांत कुळकर्णी, सचिन बल्लाळ, अनिल पालकर, कुंदना हिंगे, देविदास राजगुरे यांच्यासह गर्दे वाचनालयाच्या सदस्यांनी पुढाकार घेतला होता. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सैन्यातील सेवानिवृत्त अधिकारी व सैनिकांचा सन्मान देखील गर्दे वाचनालयाच्यावतीने करण्यात आला.

निर्णय राजकीय पण, लढाई सैनिकांची : राजकारण्यांनी निर्णय घ्यायचे आणि सैन्याने ही लढाई लढाईची. यासाठी प्रत्येक देशाकडे त्यांचे सैन्य सल्लागार असतात सर्व जगाची परिस्थिती पाहून ते निर्णय घेतल्या जातात. प्रत्येक देशाच्या शेजारी कोण आहे. कोणत्या त्या देशाच्या बाजूने आहे. त्यांची भौगोलिक परिस्थिती कशी आहे. त्यांची आर्थिक बाजू काय आहे. या सर्व बाबींचा विचार करून युद्धाचा निर्णय घ्यायचा असतो. तो देश युद्ध सहन करू शकतो की नाही. हा राजकीय निर्णय असतो पण युद्ध हे सैनिकांनीच लढायचे असते, असेही कर्नल सुहास जतकर म्हणाले.

# ११ मृत्यूंना जबाबदार कोण?

बुधवार ४ जून रोजी संध्याकाळी बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेट नंबर एकवर चेंगराचेंगरी झाली. त्यात ११ जणांचा मृत्यू झाला. हे लोक रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या आयपीएल जिंकल्याचा आनंद साजरा करण्यासाठी आले होते. चेंगराचेंगरीच्या वेळी आरसीबी संघ विधानसभा भवनात होता. येथे कर्नाटक सरकारने त्यांचा सत्कार केला. सत्कार समारंभ आणि उत्सव संपले आहेत, परंतु चेंगराचेंगरीला जबाबदार कोण आहे हा प्रश्न कायम आहे.

चौकशी केल्यावर असे समजले की पोलिस, प्रशासन, सरकार, आरसीबी व्यवस्थापन आणि कर्नाटक क्रिकेट असोसिएशन, सर्वजण चुका करत होते. लाखो लोकांची गर्दी जमत होती, पण त्यांना रोखणारे कोणीही नव्हते.

सीएम सिद्धरामय्या यांनी स्वतः कबूल केले की जेव्हा आरसीबी संघ विधानसभेत पोहोचला तेव्हा बाहेर एक लाख लोक होते. त्याच वेळी, चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली, जिथे ३ लाख लोक जमले होते. आम्हाला एवढी मोठी गर्दी अपेक्षित नव्हती. आम्ही यासाठी तयार नव्हतो.

कर्नाटक विधानसभा आणि चिन्नास्वामी स्टेडियम बंगळुरू सेंट्रल येथे आहेत. येथेच आरसीबीचा सत्कार समारंभ आणि विजयी परेड होणार होती. बंगळुरू सेंट्रलचे पोलिस उपायुक्त शेखर एच. टेकन्नावर हे कायदा सुव्यवस्था, गर्दी आणि वाहतूक नियंत्रण आणि मार्ग नियोजनासाठी जबाबदार होते.

आरसीबी व्यवस्थापनाने ४ जून रोजी सकाळी सोशल मीडियावर विजय परेडची घोषणा केली होती. दुपारी ३:१५ वाजता, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर विजय परेड तिकिटांची जाहिरात पोस्ट करण्यात आली.

तरीही पोलिसांनी परेडसाठी परवानगी दिली होती की नाही हे स्पष्टपणे सांगितले नाही. प्रश्न असा आहे की जर परवानगी दिली गेली असेल तर इतक्या मोठ्या गर्दीचे व्यवस्थापन कसे केले गेले? जर परवानगी दिली गेली नसेल तर त्याबद्दल संदेश का देण्यात आला नाही?

या घटनेनंतर आता सत्ताधारी काँग्रेस आणि त्या राज्यातील विरोधक भाजप यांच्यात आरोप प्रत्यारोपांचा राजकीय सामना सुरू झाला असला तरी अजून काही प्रश्न कायमच राहतात.

चिन्नास्वामी स्टेडियमची क्षमता फक्त ३५-४० हजार लोकांची आहे, मग २-३ लाख लोकांच्या गर्दीला जमण्याची परवानगी कशी देण्यात आली? गर्दी किती असेल याचा अंदाज आधीच लावला नव्हता का? विविध ठिकाणी बॅरिकेडिंग करून गर्दी का वळवली नाही? जेव्हा गर्दी जमू लागली तेव्हा ड्रोन आणि सीसीटीव्हीद्वारे त्याचे व्यवस्थापन का केले गेले नाही?

आरसीबी व्यवस्थापन आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनशी बोलणे आणि ४ जून रोजी होणाऱ्या कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे आणि त्यानुसार नियोजन करणे ही जिल्हा दंडाधिकारी जगदीश जी यांची जबाबदारी होती. ते संघ विमानतळावर उतरण्यापासून ते स्टेडियममध्ये पोहोचण्यापर्यंतचा मार्ग नकाशा तयार करून वेळेसह प्रसिद्ध करू शकत होते.

जर हे केले असते तर चाहत्यांना काय करावे हे कळले असते. दुपारपर्यंत कोणालाही माहित नव्हते की विजय मिरवणूक होणार नाही. गर्दी विजय मिरवणूक पाहण्यासाठी आली होती.

जर विजय परेड आयोजित न करण्याचा निर्णय घेण्यात आला असेल, तर जिल्हा माहिती विभागाने त्याबद्दल लोकांना माहिती का दिली नाही? प्रशासनाला माध्यमे आणि



सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचवता आला असता, परंतु कोणतेही स्पष्ट नियोजन दिसले नाही आणि कार्यक्रमाशी संबंधित निर्णयाची माहिती लोकांना देण्यात आली नाही.

बंगळुरूमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीचे कारण पोलिस प्रशासनाचे अपयश आणि बेजबाबदार वृत्ती आहे. पोलिस विभाग राज्याच्या गृहमंत्र्यांच्या अधीन आहे. कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांच्यावर स्थानिक पोलिस गुप्तचर यंत्रणेमार्फत गर्दीचा अंदाज घेण्याची जबाबदारी होती. गर्दीचा अंदाज घेतल्यानंतर ते राखीव पोलिस दल आणि अधिक पोलिस तैनात करू शकले असते. जिल्हा पोलिसांना मदत करण्यासाठी अतिरिक्त दल तैनात केले असते.

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, स्टेडियमबाहेर गर्दी वाढताच पोलिसांनी लाठीमार केला. यामुळे चेंगराचेंगरीही झाली. याचे व्हिडिओही समोर आले आहेत.

माजी यूपी डीजीपी विक्रम सिंह म्हणतात, 'ही चेंगराचेंगरी पोलिस खात्याचा पूर्ण निष्काळजीपणा दर्शवतो. पोलिस त्यांच्या जबाबदारीपासून पळून जाऊ शकत नाहीत. पोलिस म्हणतात की त्यांना कमी वेळ मिळाला, परंतु जरी त्यांना वेळ मिळाला नाही, तरीही संपूर्ण व्यवस्था करण्याची जबाबदारी तुमची आहे.'

कर्नाटक सरकारमधील उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांना आरसीबीच्या विजयानंतरचा उत्सव एक मोठा कार्यक्रम बनवायचा होता. ते मीडियामध्येही याबद्दल बोलत होते. डीके शिवकुमार बंगळुरू शहरात काम करणाऱ्या विविध एजन्सींसाठी जबाबदार आहेत. दुपारी ३ वाजताच्या सुमारास, डीके शिवकुमार स्वतः आरसीबी संघाचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर पोहोचले. त्यांनी विमानतळावर खेळाडूंचे स्वागत केले. दुपारी ३:३० वाजता त्यांनी एक्सवर विमानतळाचा फोटो पोस्ट केला.

शिवकुमार या कार्यक्रमाचे नेतृत्व करत होते. पोलिस प्रशासन, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि आयोजकांमध्ये बैठक घेऊन संपूर्ण नियोजन करण्याची जबाबदारी त्यांची होती. नियोजन केल्यानंतरच त्यांनी विजयी परेडसाठी परवानगी देणे आवश्यक होते. जर त्यांना हवे असते तर विजयी परेड आणि सत्कार समारंभ एक-दोन दिवस पुढे ढकलता आला असता.

स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली तेव्हा आत विजयाचा जल्लोष सुरू होता, असे वृत्तही आले होते. यावर मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी दावा केला की, 'मी ताबडतोब संघाकडे गेलो आणि त्यांना सांगितले की कार्यक्रम १० मिनिटांत थांबवावा. संघाने यावर सहमती दर्शवली आणि त्यांनी ५ मिनिटांत कार्यक्रम थांबवला. कोणतीही घटना घडू नये अशी आमची इच्छा असल्याने आम्ही त्यांच्यासोबत पोलिस पथके पाठवली.'

संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी आरसीबी व्यवस्थापनावर होती. हा कार्यक्रम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये होणार होता, त्यामुळे कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचाही त्यात सहभाग होता. आता ११ जणांच्या हकनाक मृत्यूनंतर राजकारण सुरू झाले आहे. सरकारच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. विरोधक तुटून पडत आहेत. जबाबदार असलेल्यांना शिक्षा होणार का? हा प्रश्न कायम आहे.

■ ■ ■

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी लोकसंख्यावाढ रोखणे अनिवार्य!

जागतिक पर्यावरण दिन नुकताच साजरा झाला. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे कोणत्याही देशाच्या सरकारपुढील मोठे आव्हान असते. भारतही त्याला अपवाद नाही. विज्ञानाने वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे देशातील मृत्युदर कमालीचा घटला आहे याउलट वाढत्या लोकसंख्येवर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही.

चीनमध्ये वाढती लोकसंख्या देशाच्या विकासावर परिणाम करत असल्याचे लक्षात येताच तेथील सरकारने लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरु केले. १९७९ सालापासून चीनने एकल अपत्य धोरण देशभरात सक्तीने राबवले. ज्यामुळे सुमारे ४०० दशलक्ष नवीन जन्म चीनला रोखता आले. भूभागाच्या बाबतीत भारताच्या तीन पटीने मोठ्या असलेल्या चीनने लोकसंख्येच्या बाबतीत मागील अनेक दशकांपासून आपले नाव पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले होते.

वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र चीनने ती रोखण्यासाठी पुष्कळ मेहेनत घेतली. एप्रिल २०२३ मध्ये भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. विकासाच्या नावावर मते मागणाऱ्या मोदी सरकारने वाढती लोकसंख्यावाढ हा विकासातील सर्वात मोठा अडथळा असल्याचे लक्षात येऊनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. वाढत्या लोकसंख्येच्या आधारे देश जगातील चवथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनला आहे असेही मत आहे.

मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते.

शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे हे संकट वर्षागणिक अधिक भयावह होऊ लागले आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. ज्यामध्ये परप्रांतीयही असतात आणि बांगलादेशी घुसखोरही असतात. यांच्या निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि झोपडपट्टी दादा यांच्या आशीर्वादाने ठिकठिकाणी अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्या निर्माण होऊ लागल्या आहेत. मतांच्या लाचारीसाठी हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वीज आणि पाणी यांसह कागदपत्रांची आणि रोजगाराची सोयही करून देतात.

वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीची साधने अपुरी पडू लागली आहेत. मुंबईसारख्या ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी लोकल ट्रेनमधील गर्दी पाहता त्यातील प्रवास म्हणजे मृत्यूचा खेळ झाला आहे. चालत्या गाडीतून पडल्यामुळे प्रतिदिन कितीतरी अपघात होतात; मात्र हा धोका पत्करण्याशिवाय चाकरमान्यांकडे अन्य पर्याय नसतो.

लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत.

शहरांतील ठराविक ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अशा भागांत नवनवीन उड्डाणपुलांची कामेही सुरु झाली आहेत. हे सर्व कमी पडते म्हणून आता सागरी सेतू उभारले जाऊ लागले आहेत. भूमीच्या आणि समुद्राच्या खालूनही भुयारी मार्ग आणि मेट्रो प्रकल्प उभारण्यात आले आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सुरु असलेले मेट्रो प्रकल्प, उड्डाणपुलाची कामे आणि रस्ते रुंदीकरणाची कामे यांमुळे सकाळ आणि संध्याकाळी वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

या कोंडीत वाहन चालकांकडून अनावश्यक वाजवल्या जाणाऱ्या हॉर्न्समुळे रस्त्याच्या दुतर्फा राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खोदकामांमुळे उडणारी धूळ, खोदकाम करणाऱ्या यंत्रांचे प्रचंड आवाज आणि गाड्यांचे कर्णकर्कश हॉर्न यांमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. ध्वनी आणि वायू या दोन्ही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. याशिवाय शहरांत ठिकठिकाणी सुरु असलेल्या टोलेजंग इमारतींची कामे यांमुळेही प्रदूषणात भर पडत आहे.

रस्त्यावरील पुलांची कामे आणि इमारतींची उभारणी यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट आणि तत्सम रासायनिक पदार्थांमुळे वातावरणातील हवेत विषारी धूलिकण पसरू लागले आहेत ज्यामुळे सर्वच विकसनशील शहरांतील हवेची गुणवत्ता घसरून त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. शहरातील नागरिकांना प्रतिदिन श्वासाबरोबर विषारी आणि प्रदूषणकारी हवा ग्रहण करावी लागत आहेत. गर्भवती स्त्रिया, दम्याचे रुग्ण, वयोवृद्ध आणि लहान मुले यांना या प्रदूषित हवेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. श्वसनविकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

रोजगारासाठी शहरात येऊन निवृत्त झालेले नागरिक शहरांतील वाढत्या प्रदूषणामुळे निवृत्तीनंतर गावची वाट धरू लागले आहेत. शहरांतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता या विकासकामांना पर्याय नाही. त्यामुळे ग्रामीण भागांत अधिकाधिक रोजगारनिर्मिती करणे यासोबत देशातील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणणे आज अत्यंत आवश्यक बनले आहे. लोकसंख्यावाढ वेळीच रोखली गेली नाही तर भविष्यात देशातील समस्त शहरे मृत्यूची केंद्रे बनल्यावाचून राहणार नाहीत.

■ ■ ■



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

# इंडीया आघाडीचं काही खरं नाही!

लोकसभा निवडणूकांच्या काळात मजबूत अवस्थेत असलेल्या इंडिया आघाडीला ग्रहण लागले आहे. इंडीया आघाडीतील एक महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या आम आदमी पक्षाने आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. हे कधी तरी होणारच होते.

कारण लोकसभा निवडणुकांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या होत्या. हरयाणा विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा फटका इंडिया आघाडीतील कॉंग्रेसला बसला होता. विधानसभेच्या पाच जागांवर कॉंग्रेस आणि आपच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज,विजयी भाजपा उमेदवारांना मिळालेल्या मतांपेक्षा जास्त होती.

खरे पाहता जवळ जवळ सर्वच निवडणूक चाचण्यांमध्ये, कॉंग्रेसला हरयाणा विधानसभा निवडणुकीत सहजपणे विजय मिळेल, असे अंदाज वर्तवण्यात आले होते, परंतु इंडिया आघाडीतील कॉंग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यात निवडणूक समझोता होऊ न शकल्याने, कॉंग्रेसला अनपेक्षितपणे पराभव पत्करावा लागला.

दिल्ली विधानसभा निवडणुकात आम आदमी पक्षाला फाजील आत्मविश्वास नडला.२०१५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने विधानसभेच्या एकूण ७० जागांपैकी ६७ जागा जिंकून भाजपाचा पालापाचोळा केला होता.त्यानंतर २०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने विधानसभेच्या ७० जागांपैकी ६२ जागा जिंकल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर २०२५ च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाचा आत्मविश्वास कमालीचा वाढला होता. मात्र भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांनी जेलची वारी केल्यानंतर दिल्ली मधील सामान्य नागरिकांचा आम आदमी पक्षावरील विश्वास उडाला होता.त्याचा फटका दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला बसला आणि पक्षाला सत्तेवरून पायउतार व्हावे लागले.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीत असलेल्या कॉंग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यात निवडणूक समझोता झाला असता तर कदाचित आम आदमी पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला नसता.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत १७ जागांवर आम आदमी पक्ष आणि कॉंग्रेस यांना मिळालेल्या मतांची बेरीज, विजयी भाजपा उमेदवारांना मिळालेल्या मतांपेक्षा जास्त होती, ही गोष्ट लक्षात घेतली तर हे दोन पक्ष वेगळे लढल्याने आम आदमी पक्षाला त्याचा कसा फटका बसला,या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळते.

इंडिया आघाडीतील बेबनाव दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या वेळी समोर आला होता. अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाने त्या निवडणुकीत कॉंग्रेसला पाठिंबा न देता आम आदमी पक्षाला पाठिंबा दिला होता.आता अधिकृतरित्या आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केल्याने आघाडीला मोठाच धक्का बसला आहे.

मध्यंतरी कॉंग्रेसचे नेते पी.चिदंबरम यांनी इंडिया आघाडीच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली होती.ममता बॅनर्जी या सतत इंडिया आघाडीच्या आत बाहेर करत असतात.

लोकसभा निवडणुकीत ममतांनी इंडिया आघाडीचे घटक पक्ष असलेल्या, मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि कॉंग्रेस बरोबर निवडणूक समझोता केला नव्हता.पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असलेल्या ममतांनी लोकसभा निवडणुकीत स्वतंत्रपणे लढून, नेत्रदीपक विजय मिळवला होता.

महाराष्ट्रात इंडिया आघाडीचे अस्तित्व असून नसल्यासारखे आहे. आघाडीतील तीन महत्त्वाचे घटक पक्ष असलेल्या, शिवसेना (उबाठा ), राष्ट्रवादी कॉंग्रेस (शप ) आणि कॉंग्रेस यांची तोंडे तीन दिशांना आहेत.

शिवसेना ( उबाठा) हा पक्ष अधून मधून, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याच्या गोष्टी करत असतो.शिवाय शिवसेना ( उबाठा) आणि मनसे एकत्र आल्यास ते इंडिया आघाडीत राहतील की नाही याबाबत शंकाच आहे.

उत्तर प्रदेशात २०२७ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.परंतु इंडिया आघाडीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या कॉंग्रेस आणि समाजवादी पक्ष यांच्यात आतापासूनच जागा वाटपावरून रूसवे फुगवे सुरू झाले आहेत.

जम्मु-काश्मिरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला हे इंडिया आघाडीच्या कामकाजाबाबत नाराज आहेत.पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, तेंव्हा ममता बॅनर्जी या इंडिया आघाडीचे घटक पक्ष असलेल्या कॉंग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्याशी निवडणुक समझोता करतील असे वाटत नाही.

केरळमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डावी आघाडी आणि कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडी हे एकमेकांचे पारंपरिक राजकीय शत्रू आहेत.इंडीया आघाडीत असूनही, हे पक्ष पुढील वर्षी होणाऱ्या केरळ विधानसभा निवडणुकीत एकमेकांविरोधात लढतील. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेतली तर इंडिया आघाडीचे काही खरे नाही, असेच म्हणावे लागेल. ■ ■ ■



अभय गोखले

# केल्याने होत आहे रे.. आधी केलेची पाहिजे..

आळस हा माणसाचा शत्रू आहे. तसे तर माणसाला शत्रू आवडत नाहीत. पण, आळस हा नेहमी आपल्या सोबत असतो. आळस झटकून कामाला लागा. मग तुमच्या इच्छित ध्येयापर्यंत एक दिवस नक्कीच पोहोचाल. असा विचार करून प्रयत्न करत राहिल्यास एक दिवस स्वप्न सत्यात उतरल्याशिवाय राहणार नाही असा विचार करुनच केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे...असे संत रामदास स्वामी यांनी म्हटले आहे. जीवनात उत्तरोत्तर कर्म करत राहिल्यास कर्म हे दैव बनून जाते.

मानवी जीवनात कष्टाला अनन्यसाधारण महत्त्व आहे कष्ट प्रामाणिक असले तर यशाला ही पर्याय नसतो. सतत प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते. मराठीमध्ये एक सुभाषित आहे प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे. म्हणून सतत प्रयत्न करत राहिले पाहिजे.

इंग्लिश मध्ये एक म्हण आह.. वर्क इज वर्कशीप. आपले कर्म करीत राहणे हेच आपले कर्तव्य आहे. कर्मा पेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे. जीवनात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे यासारखे श्रेष्ठ कार्य दुसरे कोणतेही नाही. आयुष्याचा मार्ग क्रमण करीत असतांना जीवन जगण्यासाठी कष्ट करणे अपरिहार्य आहे.

जीवन जगत असताना काम करण्यासाठी प्रेरणा मिळणे आवश्यक असते. तसेच आपल्या आवडीचे काम मिळणे हे सुद्धा आवश्यक आहे. ज्या कामात आपल्याला रुची नाही ते काम आपल्याला कंटाळवाणे वाटते. जगण्यासाठी प्रत्येकाच्या गरजा वेगवेगळ्या असतात. प्रत्येकाला वेगळ्या गोष्टीत रस असतो. जीवनामध्ये नऊ रसांपैकी प्रत्येकाला वेगवेगळ्या गोष्टी रस वाटतो. जीवन हे कैरीच्या फोडी सारखे असते. आंबट कैरीला मिठाची चव लावून खाल्ली की ते रुचकर लागते. जीवनाचेही त्याप्रमाणेच आहे. कैरीच्या फोडीला तिखट मीठ लावलं तर छान चविष्ट लोणचं बनते. कच्ची कैरी जेव्हा पिकते तेव्हा त्याचा गोड आंबा बनतो. जीवनाचे सुद्धा असेच आहे कधी आंबट कधी गोड असे आयुष्य आपलं असतं.

आयुष्यात गोड आंबट तिखट कडू सगळ्या चवी असतील तर आनंद जगण्यात रस वाटतो. जेवणाच्या ताटात फक्त गोड पदार्थ असतील तर आपल्याला जास्त गोड जेवण आवडणार नाही. त्याचप्रमाणे जीवनाच्या ताटात गोड आंबट कडू अशा विशिष्ट चवीची आवश्यकता असते. तसेच जीवनाच्या थाळीत सुख आणि दुःख हे सुद्धा वाढले जातात. त्यामुळे आपल्याला कधी सुखाची तर कधी दुःखाची चव चाखायला मिळते. ज्याप्रमाणे दह्यापासून चविष्ट असे आंबट गोड श्रीखंड तयार होते. आणि त्याची चव जास्त वाढते. त्याचप्रमाणे आपल्या जीवनात कष्ट प्रामाणिक असतील तर जगण्याला चमक आणि चकाकी येते.

प्रा. सौ. वर्षा विलास कावरे
बालाजी नगर, मूर्तिजापूर,
अकोला. 9021673178

आपले हित घडवून आणण्याचे सामर्थ्य प्रत्येक मानवात असते फक्त त्यासाठी कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. समर्थ रामदास स्वामी याच गोष्टीवर भर देताना दिसतात. कधी कधी आपण अपयशाबद्दल दुसऱ्याला दोष देतो. दुसऱ्याला नावे ठेवतो परंतु अशावेळी आपले दोष पाहणे देखील आवश्यक असते. उत्तुंग भरारीसाठी कष्टाची आवश्यकता आहे. आणि कष्ट प्रामाणिक असले तर यशालाही पर्याय नसतो. ■ ■ ■

## वाचक लिहितात

### अन्यथा वारकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल!

आषाढी पालखी सोहळा १५ दिवसांवर आला असताना महापालिका विकास आराखड्यात मोशी आणि डूडूळगाव सीमेवर आळंदी पासून तीन किलोमीटर अंतरावर कत्तलखाना आरक्षित करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. पालखी सोहळ्यानिमित्त लाखो वारकरी आळंदी आणि देहू या ठिकाणी पालखीत सहभागी होण्यासाठी येतात. या पालखीमार्गातच पशुवधगृह उभारण्यास परवानगी मिळाल्याने समस्त वारकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

वारकरी संप्रदाय हा संपूर्ण भारतातील सर्वांत मोठा संप्रदाय आहे. आषाढीची पंढरपूर वारी हा वारकऱ्यांचा सर्वांत मोठा उत्सव. या उत्सवानिमित्त महाराष्ट्रासह देशभरातून वारकरी मंडळी ऊन,वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात. हजारो किलोमीटरचा प्रवास पायी करण्याचे बळ विठूमाऊलीच त्यांना देत असते. गळ्यात तुळशीची माळ घालून भक्तिमार्गाची कास धरणारा हा वारकरी धारण केलेल्या माळेचे पावित्र्य राखण्यासाठी मांसाहार, मद्यपान त्यागतो. माउली प्रत्येक क्षणी आपल्याकडे पाहात आहे या भावाने आचारधर्माचे पालन करतो.

'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' हा अभंग सर्वांनाच ठाऊक आहे. वारकरी संप्रदायांचा पाया रचणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांची समाधी आळंदी या गावी आहे, त्यामुळे वारकऱ्यांसाठी ही भूमी काशीहून उणे नाही. अशा ऐतिहासिक भूमीचे पावित्र्य राखणे हे सरकारचे कर्तव्य आहे; मात्र या कर्तव्याचा विसर पडलेल्या सरकारने आता या पवित्र भूमीच्या परिसरातच पशुवधगृह उभारण्याचा घाट घातला आहे. ज्यामुळे लाखो वारकऱ्यांसह समस्त हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. जनभावनेचा विचार करून सरकारने आळंदी क्षेत्रात पशुवधगृह उभारण्यास केलेल्या भूमीचे आरक्षण रहित न केल्यास येत्या आषाढी वारीत सरकारला वारकऱ्यांच्या रोषाचा सामना करावा लागेल हे निश्चित आहे.

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

# तांब्याच्या बाटलीतून पाणी किती वेळा प्यावं?



आजच्या घडीला मानवी जीवनात प्लास्टिक किंवा काचेच्या बाटल्या कालबाह्य होत चालल्या आहेत. ऑनलाइन शॉपिंग साइट्स उघडताच तांब्याच्या किंवा स्टेनलेस स्टीलच्या विविध प्रकारच्या बाटल्या दिसतील. तांब्याच्या बाटल्या, तांब्याचे ग्लास, आणि वेगवेगळ्या डिझाईनचे तांब्याचे कप सुद्धा मोठ्या प्रमाणावर विकले जात आहेत.

तांब्यापासून बनवलेल्या भांड्यांची मागणी अधिक आहे. कारण पुन्हा एकदा तांब्याच्या भांड्यातून पाणी पिण्याची फॅशन किंवा प्रवृत्ती वाढली आहे. तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्याने आरोग्य सुधारते आणि वजन कमी करण्यास मदत होते, असा अनेकांचा विश्वास आहे. पण ही सवय खरंच किती आरोग्यदायी आहे?

ल्यूक हे आहारतज्ज्ञ, फिटनेस ट्रेनर आणि लाईफस्टाइल कोच आहेत. अनेक बॉलिवूड कलाकारांनी त्यांचे मार्गदर्शन घेतले आहे. ल्यूक सांगतात की, एकेकाळी आपल्या आजी-आजोबांना तांब्याच्या ग्लासमधून पाणी पितांना पाहिलं जायचं. प्राचीन भारतात तांब्याची भांडी खूप वापरात होती. तांब्याच्या ग्लासमध्ये रात्री पाणी ठेवून सकाळी ते पिण्याची परंपरा होती. यामुळे शरीर निरोगी राहत असे आणि पचनशक्तीही सुधारायची. तांबे मेटाबॉलिक रेट वाढवतो, हे नक्कीच. मात्र, याचा फायदा किती होतो हे तुम्ही ते कसे आणि किती वेळा वापरता यावर अवलंबून असते.

पूर्वी तांब्याची भांडी वापरली जात होती पण दिवसातून एकदोन वेळाच तांब्याच्या ग्लासमधून पाणी प्यायलं जात होतं. पण आज उलटं होतंय झ तांब्याच्या फायद्यांचा विचार करून लोक संपूर्ण दिवसभर तांब्याच्या बाटलीत पाणी भरून ठेवतात. परिणामी, शरीरात जास्त प्रमाणात तांबे जातो आणि त्यामुळे विविध आरोग्यविषयक समस्या उद्भवतात.

तांबे थायरॉईडची समस्या कमी करू शकतो. पण जर तुम्ही दिवसभर फक्त तांब्याच्या ग्लास किंवा बाटलीतूनच पाणी पित असाल तर शरीरातील कॉपरची मात्रा वाढते. यामुळे थायरॉईड ग्रंथीला नुकसान होऊ शकते.

शरीरात खूप जास्त तांबे मिसळला गेला तर रक्तप्रवाहात अडथळे निर्माण होऊ शकतात. अपचन होऊ शकते. पोट फुगणे, उलट्या होणे, चक्कर येणे, अशा तक्रारी वाढू शकतात. पचनसंस्थेत संसर्ग होण्याची शक्यताही वाढते. त्यामुळे तांब्याच्या बाटलीतील पाणी वारंवार पिवू नका.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### टाळू शकता..!

जशी करणी
तशी भरणी
शाश्वत सत्य
आहे जिवनी ..!

रोपटे लावले बाभळीचे
तर येणारच त्यास काटे
नको यावयास दुःखाश्रू
भविष्यात डोळयावाटे ..!

विचार करुनच
करावी कृती
जीवनी ना येई
पश्चातापाची स्थिती ..!

# वाल्डॉर्फ अ‍ॅस्टोरिया आणि हिल्टन हॉटेल्स अ‍ॅण्ड रिसॉर्ट्स जीएमआर एरोसिटीमध्ये डायलसोबत भागीदारीत उघडणार



नागपूर, ५ जून : हिल्टनने आज जीएमआर समूहाच्या नेतृत्वाखालील दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड सोबतच्या भागीदारीत वाल्डॉर्फ अ‍ॅस्टोरिया आणि हिल्टन हॉटेल्स अ‍ॅण्ड रिसॉर्ट्स या ब्रॅंड्सअंतर्गत दोन हॉटेल्स उघडण्याची घोषणा केली. ही हॉटेल्स जीएमआर एरोसिटी, नवी दिल्ली येथे उघडली जातील दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्टवरील भारताचा पहिला जागतिक व्यवसाय केंद्र, ज्यामध्ये जागतिक दर्जाची हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि भविष्य-केंद्रित कार्यालयांचा समावेश आहे. हे प्रकल्प हिल्टनचे लक्झरी आणि फुल-सर्व्हिस ब्रॅंड्स राजधानीच्या उत्तम कनेक्टिव्हिटी असलेल्या आदरातिथ्य आणि व्यावसायिक परिसरात आणतात. या प्रकल्पांमुळे नवी दिल्ली व नॅशनल कॅपिटल रीजनमध्ये हिल्टनची उपस्थिती अधिक बळकट होईल, जिथे हिल्टनचे आधीच चार प्रॉपर्टीज आहेत. या स्वाक्षरीनंतर भारताच्या राजधानीत वाल्डॉर्फ अ‍ॅस्टोरियाचे पदार्पण होणार असून, हे हिल्टनच्या भारतातील लक्झरी बाजारातील दीर्घकालीन वचनबद्धतेचे प्रतिक आहे. या हॉटेलमध्ये १५० खोल्या व सुईट्स, सिग्नेचर डायनिंग अनुभव, मोठ्या प्रमाणावर इव्हेंट स्पेसेस आणि आल्हाददायक वेलनेस सुविधा असतील. यासोबतच, पीकॉक अॅले हा प्रत्येक वाल्डॉर्फ अ‍ॅस्टोरियाच्या केंद्रस्थानी असलेला प्रतिष्ठित सोशल स्पेसही येथे अनुभवता येईल. याव्यतिरिक्त, ५० खोल्यांचे हिल्टन एरोसिटी, नवी दिल्ली हे नवी दिल्लीतील पहिले हिल्टन हॉटेल्स अ‍ॅण्ड रिसॉर्ट्सचे प्रॉपर्टी असेल. या हॉटेलमध्ये व्यावसायिक आणि पर्यटनासाठी येणाऱ्या प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधा, डायनिंग पर्याय आणि सोशल स्पेसेस उपलब्ध असतील, यासोबतच हिल्टनच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवाही मिळतील.

हिल्टनचे अध्यक्ष व सीईओ क्रिस नॅसेटा म्हणाले, जीएमआरच्या नेतृत्वाखालील डायलसोबतच्या भागीदारीत दिल्ली एरोसिटीमध्ये वाल्डॉर्फ अ‍ॅस्टोरिया आणि हिल्टनची स्वाक्षरी ही भारतातील आमच्या दीर्घकालीन बांधिलकीचे उदाहरण आहे. आम्ही दक्षिण आशियामध्ये आमची वाढ वेगाने पुढे नेत आहोत, आणि ही प्रतिष्ठित प्रॉपर्टीज आणि भागीदाऱ्या हिल्टनचे पोर्टफोलिओ वाढवण्यात आणि जागतिक प्रवाशांना उत्कृष्ट अनुभव देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. या स्वाक्षरीमुळे भारतातील आमच्या वाढीच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले गेले आहे.

जीएमआर समूहाचे कॉर्पोरेट चेअरमन किरण कुमार ग्रांधी म्हणाले, जीएमआर एरोसिटीमध्ये वाल्डॉर्फ अ‍ॅस्टोरिया आणि हिल्टन आणण्यासाठी हिल्टनसोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. ही भागीदारी एरोसिटीला दिल्लीच्या पर्यटन व व्यावसायिक अर्थव्यवस्थेशी एक फोर्स मल्टिप्लायर ठरवेल. हिल्टनचे जागतिक दर्जाचे स्टँडर्ड्स आमच्या जीएमआर एरोसिटीला जागतिक पातळीवरचा दर्जा मिळवून देण्याच्या ध्येयाशी सुसंगत आहेत.

हिल्टनचे आशिया-पॅसिफिक अध्यक्ष अ‍ॅलन वॅट्स म्हणाले, जीएमआर एरोसिटीमध्ये वाल्डॉर्फ अ‍ॅस्टोरिया आणि आमचा प्रमुख हिल्टन हॉटेल्स अ‍ॅण्ड रिसॉर्ट्स ब्रॅंड आणणे हा आमच्या भारतातील वाढीच्या धोरणातील एक मैलाचा दगड आहे. ही स्वाक्षरी आमच्या भारतातील पोर्टफोलिओला पुढील दशकात दहापटीने वाढवण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

जीएमआर समूहाच्या एअरपोर्ट लँड डेव्हलपमेंटचे सीईओ अमन कपूर म्हणाले, ही भागीदारी जीएमआर एरोसिटी, नवी दिल्लीला जागतिक दर्जाचे डेस्टिनेशन म्हणून उभारते. आमचे नेहमीच ध्येय हे एकत्रित, जागतिक दर्जाचे केंद्र बनवण्याचे राहिले आहे, जे सामाजिक व आर्थिक प्रभाव घडवतात. या दोन प्रतिष्ठित ब्रॅंड्ससाठी हिल्टनसोबतची भागीदारी ही आमच्या या बांधिलकीचे प्रतिक आहे.

## कुमकुम भाग्यमधील अभिनेता नमिक पॉलने सेटवरील कॉर्नरला बदलले वर्कआऊट झोनमध्ये



मुंबई, ५ जून : झी टीव्हीवरील कुमकुम भाग्य आपल्या मनावरील पकड घेणारे प्लॉटमधील ट्विस्ट्स आणि प्राइम होत जाणारी पात्रे यांसोबत प्रेक्षकांचे हृदय जिंकत आहे. मालिकेतील हल्लीच्या अ‍ॅक्शनने भरलेल्या दृश्यांमध्ये शिवांश (नमिक पॉल) आपली पत्नी प्रार्थना (प्रणाली राठोड) ला वाचवण्यासाठी मोठे प्रयत्न करत असून तो गुंडांसोबत मारामारी करतो. त्याच्या ऑनस्क्रीन कामाने प्रेक्षक अतिशय प्रभावित झाले असून उत्तम शरीरयष्टी राखण्यासाठी नमिक ऑफस्क्रीन किती मेहनत घेतो आणि शिस्त राखतो ते फारच कमी लोकांना ठाऊक आहे.

कामाचे दीर्घ तास आणि चित्रीकरणाचे डिमांडिंग स्वरूप यांव्यतिरिक्तही नमिकने कुमकुम भाग्यच्या सेटवरच फिटनेसला आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा हिस्सा बनवले आहे. आपल्या कामाप्रति सशक्त मूल्ये आणि निरोगी राहण्याबद्दलची वचनबद्धता यांसह त्याने दोन दृश्यांच्या दरम्यान सक्रिय राहण्यासाठी हलकेफुलके स्ट्रेचेस ते सेटवरच बॉडीवेट वर्कआऊट्स असा कलात्मक मार्ग शोधून काढला आहे. तो आपल्या डाएटमध्ये संतुलन राखतो आणि बहुतेकदा घरी बनवलेले जेवणच जेवतो आणि आपल्या शरीराला नियमितपणे हायड्रेट करतो, ज्यामुळे त्याला ऊर्जा राखायला आणि आपले केंद्रित ठेवायला मदत होते.

नमिक पॉल म्हणाला, माझ्यासाठी आरोग्य आणि तंदुरुस्ती यांच्यासोबत कधीच तडजोड होऊ शकत नाही. हे केवळ एखाद्या प्रकारे दिसण्याबद्दल नसून आतून सशक्त वाटणे, तरतरी असणे आणि माझ्या मन आणि शरीरावर माझे नियंत्रण असण्याबद्दल आहे. कुमकुम भाग्यच्या सेटवर दृश्यांच्या दरम्यान जेव्हा मला उसंत मिळते तेव्हा मी काही पुशअप्स मारतो, जंपिंग जॅक्स करतो किंवा केवळ निव्वळ वॉक करतो.

## वीर हनुमान मालिकेत हनुमान आपले आराध्य दैवत श्रीरामांना भेटायला अयोध्येला जायचे ठरवतो



मुंबई, ५ जून : भावनिकदृष्ट्या समृद्ध आणि आध्यात्मिक आनंद देणारे कथानक सादर करून सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. या मालिकेत छोट्या मारुतीच्या भूमिकेत आन तिवारी, केसरी आणि अंजनीच्या भूमिकेत अनुक्रमे आरव चौधरी आणि सायली साळुंखे तर वाली आणि सुग्रीवच्या दुहेरी भूमिकेत माहिर पांधी दिसत आहे. मालिकेत आता एक भावनिक टर्निंग पॉइंट आला आहे. यावेळी हनुमानाच्या भक्तीची कसोटी होणार आहे. प्रेक्षकांनी अलीकडच्या भागांमध्ये हनुमान आणि शनिदेव (ऋषभ पवार) यांच्यातील संघर्ष बघितला आहे. आगामी भागांमध्ये प्रेक्षक एक भावनिक आणि मोठे वळण बघणार आहेत. हनुमान आता दिव्य शोधासाठी निघाला आहे. आपले आराध्य श्रीराम यांच्या शोधार्थ अयोध्येला जाण्याचा निर्णय तो घेतो. एका भावाकुल स्थितीतून तो या मिशनवर निघाला आहे. आपली माता अंजनी हिला कायमसाठी किष्किंधा सोडून जाण्याच्या विचारापासून त्याला प्रवृत्त करायचे आहे. पण वेळ निसटून चालली आहे आणि नियती पुढे उभे ठाकली आहे. हनुमान श्रीरामांकडे वेळेवर पोहोचणार का? की भक्तीच्या या मार्गात त्याच्या समोर काही अनपेक्षित वळणे असणार आहेत?

अंजनी मातेची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, अंजनी मातेची भूमिका करणे ही माझ्यासाठी खूप भावनिक बाब आहे. एक आई म्हणून अपराधी भावना आणि प्रेम यांच्यात तिची कुतरओढ होत आहे. आपण येथे असल्यामुळेच किष्किंधा नगरीत अशांतता आहे, असे तिला वाटते. आपला मुलगा हनुमान याला सोडून जाणे हा क्लेशदायक आणि आत्म्याला पिळवटून टाकणारा निर्णय आहे. या दृश्यात एका आईच्या बलिदानाचे गहिरेपण दिसून येते तसेच आपल्या मुलाच्या रक्षणार्थ एक आई कुठवर जाऊ शकते, स्वतःचा देखील हिरमोड करू शकते हे या दृश्यात दिसते. एक अभिनेत्री म्हणून अंजनीच्या मौनाचा प्रत्येक क्षण, तिचे सामर्थ्य आणि तिच्या मनातील वादळ मी अनुभवू शकते. हे दृश्य आपल्याला स्मरण देते की, कधीकधी, प्रेमात केलेली सर्वात मोठी कृती ही प्रिय वस्तूच्या त्यागात असते.

## कलाकार सुचवत आहेत काही छोट्या छोट्या कृती, ज्यांच्यामुळे मोठा फरक पडू शकतो

मुंबई, ५ जून : जागतिक पर्यावरण दिन पृथ्वी संरक्षणाबाबतच्या आपल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव आपल्याला करून देतो. हवामान बदलाविषयी जागरूकता निर्माण करण्यापासून ते चांगल्या सवयी अंगी बाणवण्यापर्यंत पर्यावरण दिन प्रत्येकाला अधिक हरित भविष्यासाठी अर्थपूर्ण कृती करण्याचे प्रोत्साहन देतो. या दिवसाची लक्षणीयता सांगताना सोनी सब वाहिनीवरील मालिकांमध्ये काम करणारे करुणा पांडे, वृही कोडवारा, परिवा प्रणती आणि आदित्य रेडिज हे कलाकार पर्यावरणविषयक जागरूकता, व्यक्तिगत ईको-फ्रेंडली सवयी याविषयी आपले मत मांडत आहेत आणि यंदा हा दिवस ते कशा प्रकारे साजरा करणार आहेत, हे देखील सांगणार आहेत.

## प्लास्टिक ॲनिमिया हा ॲनिमियाच्या इतर प्रकारांहून भिन्न का आहे

अकोला, ५ जून : प्लास्टिक ॲनिमिया ही रक्ताची एक अशी दुर्मिळ व्याधी आहे, ज्यात बोनमॅरोमधून विकृत स्टेम पेशी निर्माण केल्या जातात, जो बरेचदा कुटुंबांमध्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचतो व सर्वसाधारणपणे लहानपणी किंवा प्रौढपणाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर त्याचे निदान होते. याउलट ॲनिमियामध्ये शरीर पुरेशा संख्येने पांढऱ्या पेशी (आरबीसी) तयार करण्यास असमर्थ असते. प्लास्टिक ॲनिमिया हा फक्त ॲनिमिया नव्हे, तर तो एक पॅन्सायटोपेनिया आहे, एक अशी वैद्यकीय स्थिती ज्यामुळे सर्व प्रकारच्या रक्तपेशींची संख्या लक्षणीयरित्या कमी होते, ज्यात अस्थिमज्जा म्हणजे बोन मॅरो निकामी झाल्याने ल्युकोपेनिया (पांढऱ्या पेशींचा अभाव), ॲनिमिया (आरबीसीची संख्या कमी असणे) आणि थ्रॉम्बोसायटोपेनिया (प्लेटलेट्सची संख्या कमी असणे) या तिन्ही स्थिती तयार होतात.

तुमच्या डॉक्टरांना प्लास्टिक ॲनिमियाचा संशय असल्यास ते कदाचित तुम्हाला रक्तपेशींची पातळी मोजणारी व प्लास्टिक ॲनिमियाचे निदान करण्यासाठी वापरण्यात येणारी कम्प्लिट ब्लड पिक्चर (सीबीपी) ही चाचणी, किंवा तुमच्या रक्तपेशी व प्लेटलेट्समधील बदलांचे सुस्पष्ट चित्र पुरविणारी पेरिफेरल ब्लड स्मिअर चाचणी करायला सांगतील, जे कदाचित आजाराचे एक चिन्ह असू शकेल. पेरिफेरल ब्लड स्मियर चाचणी हा आजाराच्या निदानाचा एक महत्त्वाचा भाग आहे. निदान वैद्यकीय आणि कौटुंबिक पूर्वेतिहास, एक शारीरिक तपासणी आणि चाचण्यांचे निष्कर्ष यांच्यावर आधारित असते, ज्यात रक्तचाचण्या, बोन मॅरो चाचण्या व इतर तपासण्यांचा समावेश असू शकतो. प्लास्टिक ॲनिमियावर उपचार न केल्यास ती एक जीवघेणी स्थिती बनू शकते व या आजाराच्या उपचारांमध्ये बोन मॅरो ट्रान्स्प्लान्ट, इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी, ब्लड ट्रान्स्फ्युजन आणि औषधोपचारांचा समावेश असू शकतो.

प्लास्टिक ॲनिमिया आणि ॲनिमिया (पोषणाशी संबंधित) या दोघांमध्येही थकवा, डोकेदुखी, गरगरणे अशी सारखीच लक्षणे दिसतात. याशिवाय प्लास्टिक ॲनिमिया असलेल्या व्यक्तींना पांढऱ्या रक्तपेशींची संख्या कमी झाल्याने जंतुसंसर्गाशी लढा देणे अधिक कठीण जाते. हे कोणत्याही वयात, विशेषतः किशोरवयात व विशीत घडू शकते, मात्र ५५ ते ६० वर्षांच्या दरम्यान ही स्थिती उद्भवण्याची शक्यता तुलनेने अधिक असते. लुपससारखी ऑटोइम्यून म्हणजे रोगप्रतिकार यंत्रणेतील बिघाडामुळे उद्भवणारी स्थिती याला निमित्त ठरू शकते आणि काही दुर्मिळ प्रकरणांमध्ये एप्स्टेन-बार, पर्व्होव्हायरस बी१९ आणि गोवरसारखी संबंधित घटकांमुळे प्लास्टिक ॲनिमिया बळावू शकतो. खाण्याच्या सवयी, आहार व पोषण यांतील बदलांमुळे प्लास्टिक ॲनिमिया रोखता येत नाही वा त्यावर उपचार करता येत नाही हे खरे असले तरीही या स्थितीमध्ये आहारासंबंधीच्या काही विशिष्ट मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे गरजेचे ठरू शकते.

नागपूर येथील मॅक्स हॉस्पिटलमधील कन्सल्टन्ट हिमॅटोलॉजिस्ट अँड बीएमटी डिपार्टमेंट डॉ. राहुल अरोरा सांगतात, प्लास्टिक ॲनिमियाचा एखाद्याच्या आयुष्यावर लक्षणीय परिणाम होतो, कारण यामुळे जाणवणाऱ्या थकवा, गरगरणे व एकूणच थकलेपणाची जाणवणारी भावना यांसारख्या लक्षणांमुळे त्यांची नेहमीची कामे करण्याची क्षमता कमी होते. त्यांना खूप प्रमाणात रक्तस्राव होत असल्याचे जाणवू शकते किंवा पुन्हा-पुन्हा संसर्ग होऊ शकतो, ज्यामुळे वारंवार हॉस्पिटलमध्ये दाखल होणे व ब्लड ट्रान्स्फ्युजन्स करून घेणे गरजेचे ठरू शकते. यामुळे त्यांच्या दैनंदिन आयुष्यामध्ये अडथळे येऊ शकतात व अखेरीस ते समाजापासून अलग पडू शकतात. खेळामध्ये भाग घेताना, विशेषतः क्रिकेट, हॉकी, बास्केटबॉलसारख्या इतरांशी शारीरिक स्पर्श होईल अशा खेळांमध्ये त्यांना दक्ष रहावे लागते, कारण त्यामुळे रक्तस्रावास कारणीभूत ठरणारी इजा होण्याची किंवा लक्षणे व चिन्हे बळावण्याची शक्यता असते.

या स्थितीच्या दीर्घकालीन स्वरूपामुळे व्यक्तीच्या मनावरही लक्षणीय परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे काही काळासाठी ती व्यक्ती निराशा, तणाव व चिंतेच्या आहारी जाऊ शकते. वैद्यकीय आरोग्यकर्मींनी उपचारांचा भाग म्हणून रुग्णाच्या शारीरिक तसेच मानसिक स्थितीलाही प्राधान्य देणारा सर्वसमावेशक दृष्टिकोन अंगिकारायला हवा.

## भारतीय स्टार्टअप 'एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनल'चे नॅसडॅकवर पदार्पण



नागपूर, ५ जून : भारतीय वैद्यकीय तंत्रज्ञानाने जागतिक पातळीवर आणखी एक मोठी भरारी घेतली आहे. स्वदेशी एसएसआय मंत्र सर्जिकल रोबोटिक सिस्टिम बनवणाऱ्या एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलने आज न्यूयॉर्क शहरातील नॅसडॅक मार्केटसाईटमध्ये पदार्पण केले आहे. कंपनीचे शेयर्स 'एसएसआयआय' या टिकीट सिम्बॉलअंतर्गत सूचिबद्ध करण्यात आले आहेत.

एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ सुधीर श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या विशेष समारोहात कंपनीच्या व्यवस्थापन टीमचे सदस्य, संचालक मंडळ, मुख्य सल्लागार आणि खास पाहुणे देखील सहभागी झाले होते. हा टप्पा भारतासाठी एक अभिमानाचा क्षण आहे. प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानामध्ये देशाचे अधिकाधिक मजबूत होत चाललेले नेतृत्वस्थान यामुळे अधोरेखित झाले आहे. नावीन्याचे एक नवे युग अवतरत असल्याचे आणि भारतात तयार करण्यात आलेल्या आरोग्य देखभाल उपाययोजना, उत्पादनांना जागतिक पातळीवर मान्यता मिळत असल्याचे यामध्ये दिसून आले आहे.

एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ सुधीर श्रीवास्तव यांनी सांगितले, एप्रिल ०५ मध्ये नॅसडॅकमध्ये आमच्या यशस्वी अपलिस्टिंगचा आनंद आम्ही साजरा करणारा, आजचा बेल-रिंगिंग समारंभ एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलमध्ये आम्हा सर्वांसाठी एक अभिमानाचा क्षण होता. हा महत्त्वाचा टप्पा एसएसआय मंत्र ही भारतात डिझाईन आणि तयार करण्यात आलेली प्रगत, परवडण्याजोगी आणि जागतिक दर्जाची सर्जिकल रोबोटिक सिस्टिम विकसित करण्यात आमच्या टीमने घेतलेले अथक प्रयत्न दर्शवतो. १०० पेक्षा जास्त प्रकारच्या सर्जरीजमध्ये ००० पेक्षा जास्त रोबोटिक प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्याचा आनंद देखील आम्ही साजरा करत आहोत, त्यामध्ये कोणतीही गुंतागुंत, अपघात किंवा मृत्यू झालेले नाहीत, हे यश या सिस्टिमची अचूकता आणि सुरक्षा दर्शवते. एसएसआय मंत्रा हा फक्त भारतातील नव्हे तर सहा इतर देशांमधील सर्जन मोठ्या प्रमाणावर वापरू लागले आहेत. युरोपियन युनियन आणि युनायटेड स्टेट्स यांच्यासह प्रमुख जागतिक बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आमचे मिशन सुस्पष्ट आहे: अत्याधुनिक रोबोटिक सर्जरी जगभरातील रुग्णांसाठी उपलब्ध आणि परवडण्याजोगी करावी, यामध्ये भारत कायम आघाडीवर असावा.

क्लिनिकल मान्यता मिळालेल्या आणि पेटंटेड एसएसआय मंत्र सर्जिकल रोबोटिक सिस्टिमसह एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलने लक्षणीय प्रगती केली आहे. सध्या ही सिस्टिम भारतभरातील ५ ठिकाणी ० हॉस्पिटल्समध्ये इन्स्टॉल करण्यात आली आहे. कंपनीने आंतरराष्ट्रीय पातळीवर नेपाळ, इक्वाडोर, ग्वाटेमाला, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, श्रीलंका, कोलंबिया आणि युक्रेन या देशांमध्ये आपला विस्तार केला आहे. १०० पेक्षा जास्त सर्जिकल प्रक्रियांमध्ये ००० पेक्षा जास्त रोबोटिक सर्जरी यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. एसएसआय मंत्र हा एक सहज परवडण्याजोगा उपाय असल्याने जास्तीत जास्त रुग्णांना त्याचे लाभ घेणे शक्य होत आहे. एसएसआय मंत्रने प्रगत रोबोटिक सर्जरीच्या उपलब्धतेमध्ये एक मोठे परिवर्तन घडवून आणले आहे. युरोप आणि युनायटेड स्टेट्समध्ये विस्तार करण्याची कंपनीची योजना आहे. मेडिकल रोबोटिक्समध्ये जागतिक पातळीवर आघाडीची कंपनी म्हणून एसएस इनोवेशन्स आपले स्थान निर्माण करत आहे, त्याबरोबरीने जगभरात आरोग्यसेवा तंत्रज्ञानाच्या भविष्याला आकार देण्यात भारताचे प्रमुख स्थान अधिक मजबूत करत आहे.

## कामगार वर्गाच्या प्रश्नांचे उत्तर भाजपा विचारधारेतच आहे : रविंद्र चव्हाण



अमरावती, ५ जून : आमदार रविंद्र चव्हाण यांनी भाजपा कार्यकारी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर, त्यांच्या कार्यशैलीने संघटनेत गतिमानता आणल्याचे दिसून येत आहे. डोंबिवलीसारख्या भाजपच्या बालेकिल्ल्यातून आमदार म्हणून सलग चार वेळा निवडून येणाऱ्या रविंद्र चव्हाण यांनी भाजपच्या उज्ज्वल विचारसरणीचा झेंडा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याबरोबरच राज्यातील विविध पक्षांतील अनेक महत्त्वाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपात प्रवेश करत आहेत. अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या अंगीकृत संस्था त्याचसोबत विविध समाज घटक यांना भाजपाच्या प्रवाहात आणण्याचा झपाटा रविंद्र चव्हाण यांनी लावला आहे.

मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली. सदर कार्यक्रमात बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की कामगार वर्गाच्या प्रश्नांचे उत्तर भाजपा विचारधारेतच आहे. अंत्योदयाचे दिव्य स्वप्न साकार करण्यासाठी भाजपा परिवार सदैव कटिबद्ध आहे. यामुळे कामगार वर्गासमोर असणाऱ्या असंख्य छोट्या-मोठ्या प्रश्नांचे समाधान केवळ भाजपा विचारधारेतच आहे, हे कामगार वर्गाला भाजपाकडे आकृष्ट करण्यात यशस्वी ठरत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील कामगार वर्गाने मोठ्या संख्येने आपल्या भाजपा परिवारात प्रवेश करत आहे. शिव वाहतूक सेना उबाठा गटाचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. महेश सुधाकर पोरे, महाराष्ट्र उपाध्यक्ष संजय चावनेकर, रायगड जिल्हाध्यक्ष अच्युत पाटील, रायगड जिल्हा संघटक विनायक बेलोसकर, खारघर शहर अध्यक्ष मोहसिन शेख यांच्या सोबत मुंबई, नवी मुंबई, रायगड, धुळे, जळगाव, चंद्रपूर, बीड येथील शिव वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी आज विकासाचे 'कमळ' हाती घेतले आहे. तसेच इंडिगो एअरलाईन एअरपोर्ट प्रायव्हेट लि. मुंबई विमानतळ, बीडब्लूएफएस मुंबई विमानतळ, एयर इंडिया, स्पाईसजेट एअरलाईन अशा विविध वाहतूक कामगार संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी देखील भाजपाचा ध्वज हाती घेतला.

## कलाकार सांगत आहेत, कोणाच्या प्रेरणेने त्यांच्या मनात अभिनयाविषयीची ओढ निर्माण झाली

मुंबई, ५ जून : प्रत्येक कलाकाराच्या मागे एक मार्गदर्शक प्रकाश असतो, जो त्यांना स्वप्न बघण्याची प्रेरणा देतो. सोनी सबच्या मालिकांमध्ये काम करत असलेल्या आपल्या लाडक्या कलाकारांसाठी अभिनय हा केवळ प्रसिद्धी आणि पैशाचा ध्यास नाही; तर त्यांना प्रेरित करणाऱ्या, शिकवणाऱ्या आणि घडवणाऱ्या आदर्श व्यक्तीच्या पावलावर पाऊल टाकून केलेला प्रवास आहे!.

तेनाली रामा मालिकेत राजा कृष्णदेवरायाची भूमिका करणारा आदित्य रेडिज म्हणतो, मी अभिनय निवडण्याअगोदर अभिनय कलेनेच माझी निवड केली होती. मला पहिल्यापासून कथाकथन करण्याची आवड होती, मंचावर किंवा कॅमेऱ्यासमोर. प्रत्येक वेळी नव्या व्यक्तिरेखेत शिरल्यावर मला जो आनंद मिळायचा, त्यामुळे माझा निर्णय ठाम होऊ लागला. शाहरुख खानचा प्रवास बघताना मला नेहमीच प्रेरणा मिळते. चित्रपटाची पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून तो आला आहे. त्याने खूप संघर्ष केला आणि निव्वळ आपल्या प्रतिभेच्या आणि परिश्रमाच्या बळावर आपले आगळे स्थान निर्माण केले. टेलिव्हिजनकडून चित्रपटांकडे झालेला त्याचा प्रवास या गोष्टीची साक्ष देतो की, तुमचा जर स्वतःवर विश्वास असेल आणि तुम्ही आपल्या लक्ष्यावर लक्ष केंद्रित ठेवले, तर स्वप्नं नक्की पूर्ण होतात. त्याला यशस्वी होताना पाहून आमच्यासारख्या बऱ्याच जणांना नवी आशा मिळाली आणि त्याच्याच पावलावर पाऊल टाकून त्यांनी प्रवास सुरू केला.

## आज का अंदाज

शुक्रवार ६ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ७ | ० | २ | ४ | ६ | ७ |
| ३९० | १२२ | १२४ | १३६ | ११० | ११२ | १२३ | १२४ |
| २५५ | २६७ | २२३ | ३८९ | २०० | २५७ | २४० | २२३ |
| ३४५ | ३६६ | ३४० | ४६० | ५७० | ३५६ | ३३० | ५६६ |
| २३ | ५४ | ७४ | ०३ | २१ | ४१ | ६२ | ७१ |
| २४ | ५६ | ७५ | ०४ | २६ | ४३ | ६४ | ७४ |
| २० | ५८ | ७० | ०८ | २९ | ४७ | ६७ | ७८ |

६ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ४२ | ६२ | ०४ |
| २४ | ४६ | ६४ | ०५ |
| २९ | ४८ | ६७ | ०७ |

## राशीभविष्य

मेष : आज घराबाबत काही समस्या असू शकते. आज आर्थिक क्षेत्रात चढ-उतार येतील. आर्थिक बाबी स्पष्ट करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे लागेल.

वृषभ : तुम्हाला महत्त्वाच्या योजनेची जबाबदारी मिळू शकते. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जवळीक वाढल्यामुळे तुम्हाला नोकरीत उच्च पद मिळू शकेल. प्रेमसंबंधांमध्ये जवळीक निर्माण होईल.

मिथुन : आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगले काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. आई-वडिलांची खूप आठवण येईल. त्यांच्यापासून दूर राहणे वेदनादायक असेल.

कर्क : आज नशीब तुमच्यासोबत असेल. सरकारच्या मदतीने कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. व्यवसायात तुम्हाला तुमच्या वडिलांकडून पाठिंबा आणि साथ मिळेल.

सिंह : आज तुम्ही क्रीडा स्पर्धेत यशस्वी व्हाल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये यशस्वी व्हाल. शेतीच्या कामात गुंतलेल्या लोकांना सरकारी मदत मिळेल. नोकरीत मान्यता आणि जबाबदारी मिळू शकते.

कन्या : व्यवसायात नवीन भागीदार फायदेशीर ठरतील. जमा भांडवलात वाढ होईल. वाहन खरेदी करण्याच्या योजना यशस्वी होतील. आज तुम्ही तुमच्या प्रियजनांना प्रेमविवाहाच्या योजना सांगू शकता.

तुळ : आज तुमचे आरोग्य चांगले राहील. तुम्ही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट, निरोगी असाल. आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्या उद्भवणार नाहीत. दिवस सुखकर जाईल.

वृश्चिक : अनावश्यक धावपळ होईल. सहकाऱ्यांशी मतभेद होऊ शकतात. नोकरीच्या ठिकाणी बदल होऊ शकतो. उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क स्थापित होतील.

धनु : कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन सहकारी मिळतील. तुमच्या मुलांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. व्यवसायात एखाद्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल.

मकर : आज तुम्हाला नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना त्यांच्या बॉसचा पाठिंबा आणि साथ मिळेल. व्यवसायात प्रगतीसोबतच नफाही मिळेल.

कुंभ : आज दिवसाची सुरुवात तणाव आणि धावपळीने होईल. जर प्रेमसंबंधांमध्ये काही धोका असेल तर आज कोणताही धोका पत्करू नका. अनावश्यक त्रास होऊ शकतो. कामात प्रचंड मेहनत करावी लागेल.

मीन : तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. पैशाशी संबंधित कोणत्याही कामातील अडथळे दूर होतील. व्यवसायात उत्पन्न वाढेल. नवीन प्रेमसंबंधांमध्ये पैसे आणि दागिने मिळण्याची शक्यता असेल.

## शब्दकोडे क्रमांक २१२९

आडवे शब्द :–

१) आपल्या ऐपती प्रमाणे (अल्प का होईना) देणे
८) श्रीमंत
११) बंगाल
१२) मोठी वाटी
१३) ढीग
१४) देणारा
१५) कोरांत गुदरलेला खटला
१६) नाचणी धान्य
१७) एक सुगंधी वनस्पती
१९) दूर करणारा
२०) वेडा
२२) भेसळ
२४) माल राखून ठेवण्याची जागा
२५) गोसावी, भटक्या माणूस
२८) लाज
२९) वेडा (हिं)
३०) गृह
३१) रथ चालविणारा
३३) रसाने भरलेले
३५) उद्याच्या नंतरचा दिवस
३७) प्रथम, उत्कृष्ठ
३८) निमग्न, रममाण
४१) घमघमाट
४२) सोपे
४४) गडीमाणसे
४७) ढुकर
४९) सोन्याचा धागा
५०) वर-वधूमधील पडदा
५३) प्रफुल्लित
५५) दोन मैलाचे अंतर
५६) संध्याकाळ
५७) बासरी
५८) पुरुष
५९) रसाच्या आंब्याची एक जात
६०) माणसाच्या डोक्याची कवटी
६३) गाय
६४) फक्कड, छानदार
६६) बाण
६८) रंग (इं)
६९) वांती
७२) झाडाची पाने
७३) संकलन, अनेक वस्तू गोळा करणे
७६) फणसातील खाद्यभाग
७८) द्रवपदार्थ
७९) होकारच्या विरुद्ध
७०) स्तुती करणारा, भाट
८१) अधांतरी, लटकत ठेवणे

उभे शब्द :–

२) अत्यंत तिखट बारीक आकाराची मिरची
३) सर्प
४) निःसत्व, पोकळ
५) तरंग, लहर
६) मर्यादा
७) वाळवी, उणीव
८) आईबाप
९) मोठा भाऊ
१०) कणीदार
१७) मानेवरची सूज, चिकण माती
१८) शुद्ध, पूर्णपणे, स्पष्ट
१९) लाकूड कापण्याचे हत्यार
२१) चांगले वाईट याचे तारतम्य विचार
२३) मेहनत, कष्ट
२४) म्हैस, वगैरे
२६) अंतःकरण
२७) हार, वेणी मधील सुगंधी वनस्पती
३०) भाजलेल्या वांग्याचा एक पदार्थ
३२) केवळ
३४) प्रगती, उत्कर्ष
३६) लाकडी जिना
३७) अकस्मात
३९) छिद्र४०) नरसिंह
४३) बारीक केस
४५) चांदी
४६) मेहेरबानी, उपकार
४८) होम, यज्ञात आहुती टाकणे
५०) डोळ्यात सुरमा लावण्याची धातूची कांडी
५१) खोडण्याचे साधन
५२) पत्र
५४) फळाचे आवरण
५५) आंब्याची बी
५९) पराभव
६१) माजा
६२) दिल्लीच्या विमानतळाचे नाव
६५) चटोर, फाजील
६७) एक रंगीत कंदमूळ
६८) कविता रचनारा
७०) जीव जाणे
७१) धमनी, नाडी
७२) पर्ण
७४) बोलणे, वाणी
७५) चाळीस शेर
७७) पौर्णिमा

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

# संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या

## यावलकरांची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी




■ महासागर प्रतिनिधी, शेंदुरजनाघाट , दि. ५ : तालुक्यातील १ हजार ९२६ संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस व वादळाचा फटका बसला आहे. त्या सर्वांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी मोर्शी बरुडचे आ. उमेश यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहावर आ. यावलकर यांनी फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी वरुड-मोर्शी तालुक्यातील १,९२६ संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा मांडली. सन २०२३ मध्ये झालेली अतिवृष्टी व २०२४ मध्ये झालेली गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे महसूल विभागाकडून पंचनामे करण्यात आले होते. शासनाकडे त्याचा अहवालही पाठवण्यात आला होता, तरीदेखील अद्याप १,९२६ शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही.

त्यामुळे या मुद्द्याकडे विशेष बाब म्हणून तातडीने लक्ष द्यावे व लवकरात लवकर नुकसान भरपाईपोटी अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वळती करावी, अशी मागणी आ. यावलकर यांनी फडणवीस यांच्याकडे केली आहे. याशिवाय मोर्शी मतदारसंघातील रखडलेल्या अनेक प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली असून, मुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण विषयाचे गांभीर्य लक्षात घेता लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही आ. यावलकर यांचे म्हणणे आहे.

## रासायनिक खताचा तुटवडा वाढल्यामुळे शेतकरी त्रस्त

**मारेगाव :** दरवर्षीच्या तुलनेत मान्सूनपूर्व मे महिन्यातच पावसाचे आगमन झाल्याने शेतकऱ्यांची बि-बियाणे व खते खरेदीसाठी कृषी केंद्रात गर्दी दिसून येत आहे. परंतु तालुक्यात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या डीएपी सारखे रासायनिक खत उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांत नाराजी दिसून येत आहे. खरीप हंगाम तोंडावर येताच शेतकरी पेरणीच्या तयारीला लागत असतात. मात्र, पेरणी पूर्वी शेतकरी आपल्या शेतात पिकाच्या वाढीसाठी डीएपी सारखी रासायनिक खते वापरतात. आता शेतकऱ्यांना ही रासायनिक खते मिळणार नसल्याचे चित्र आहे. कृषी केंद्रात डीएपी खत उपलब्ध नसल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे येत्या हंगामात डीएपी सारखी रासायनिक खते मिळण्याची शक्यता जवळ जवळ मावळली आहे.

शेतकऱ्यांनी डीएपी खताला पर्याय म्हणून इतर खते वापरून आपली गरज भागवावी, असे आवाहन देखील यावेळी करण्यात आले आहे. पेरणीच्या वेळीच युरिया, डीएपी, यासारख्या खताचा मारेगाव तालुक्यात तीव्र तुटवडा जाणवू लागला आहेत. तेव्हा कृषी विभागाने तालुक्याला रासायनिक खताचा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करीत आहे.

# शेतकऱ्याचे ६.५० लाख लुटणारी टोळी गजाआड



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. ५ : चांदूर रेल्वे तालुक्यातील सुपलवाडा येथील एका ४४ वर्षीय शेतकऱ्याला रक्कम दुप्पट करून देतो, अशी बतावणी करून एकाने अचलपूर नाक्याजवळ बोलावले. त्या ठिकाणी परिसरात असलेल्या त्रिवेणी संगमावर रकमेची पूजा केली. त्यानंतर साडेसहा लाख रुपयांची रक्कम घेऊन सहा ते सात जणांच्या टोळीने पळ काढला. शेतकऱ्याने प्रतिकार केला असता त्याला मारहाण केली. ही घटना सोमवारी (दि. ३) सायंकाळी ६ वाजता घडली. त्यानंतर एलसीबीच्या पथकाने लुटारूंचा शोध घेत मंगळवारी सहा जणांना अटक करत त्यांच्याकडून ५ लाख १४ हजार रोखसह दहा लाखांचा ऐवज जप्त केला आहे.

दिलीप राऊत उर्फ शरद दिगांबर ढोके (५३, रा. शहापूर वरुड), लाला ऊर्फ मनोजकुमार फुलचंद जयस्वाल (४२) आणि गोलू ऊर्फ जयकुमार जगदीश गेडाम ( ४०, दोघेही रा. फ्रेजरपुरा, अमरावती), नीलेश देवकरण यादव (४०, रा. राजापेठ, अमरावती), प्रदीप रामराव वैराळे (४७) व शुभम गोपाल वैराळे (२६, दोघेही रा. राजना पूर्णा ता. चांदूर बाजार) यांना अटक केली आहे. या घटनेचा मुख्य सूत्रधार शरद ढोके असून, त्याने स्वत:चे नाव दिलीप राऊत (रा. अचलपूर) असे सांगून सुधाकर राऊत (४४, रा. सुपलवाडा) यांना रक्कम दुप्पट करून देण्याचे आमिष देत अचलपूर नाक्यावर बोलावले होते. दिलीप राऊत व सुधाकर राऊत यांची भेट सुपलवाडा येथील सचिन ठाकरेने घालून दिली होती. दिलीप व सुधाकर यांची अगोदर एकदा भेट झाली आहे. त्यानंतर २ जूनला शरद ढोकेने सुधाकर यांना रक्कम घेऊन त्रिवेणी संगम अचलपूर येथे बोलावले. सोमवारी सायंकाळी सचिन ठाकरेसह सुधाकर राऊत अचलपुरात दुचाकीने पोहोचले. त्यावेळी राऊत यांनी दहा लाख रुपये सोबत आणले होते.

मात्र काही दगाफटका झाल्यास आपले मोठे नुकसान होईल यामुळे सुधाकर यांचा लहान भाऊ त्यापैकी साडेतीन लाख रुपये काढून घरी निघून गेला. दरम्यान साडेसहा लाख रुपये घेऊन सचिन व सुधाकर अचलपूर नाक्यावर हजर होते. काही वेळातच त्या ठिकाणी शरद ढोके ऊर्फ दिलीप आला.

अचलपूर येथे वाहन खरेदीसाठी आलो असताना पाच ते सहा जणांनी आपल्यासह पाच ते सहा जणांनी बेदम मारहाण करून १० लाख रुपये घेऊन पळाल्याची तक्रार सुपलवाडा येथील सुधाकर राऊत यांनी परतवाडा पोलिसांत केली. मात्र, उलट तपासणीदरम्यान आपल्याकडील ६.५० लाख रुपये हिसकावले गेल्याची कबुली देत आपण वाहन खरेदीसाठी नाही तर पैसे दुप्पट करण्याच्या बतावणीमुळे परतवाड्याच्या त्रिवेणी संगम परिसरात आल्याचे राऊत यांनी सांगताच पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. साडेसहा लाख लुटल्यानंतर अवघ्या काही वेळातच रकमेची हिस्सेवाटणी झाली. साडेसहा लाखांपैकी ५ लाख एकट्या शरद ढोकेने ठेवले, तर अन्य एकाला ५० हजार दिले. तसेच वाहन भाडे दिले. या व्यतिरिक्त इतरांना ३ ते ४ हजार रुपये दिलेत. एकाला तर केवळ १ हजार रुपये त्याने दिल्याचे पोलिस तपासात समोर आले

# एचव्हीपीएमच्या उन्हाळी शिबिरात

## जलतरण विभागाचे लक्षवेधी प्रात्यक्षिक सादरीकरण



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. ५ : श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या आंतरराष्ट्रीय जलतरण विभागाचा लौकीक राष्ट्रीय-आंतरराष्ट्र रीय स्तरावरील असल्याची अनुभूती जलतरणपटूच्या चित्तथरारक प्रात्यक्षिक सादरीकरणातून नागरिकांना झाली. सिंक्रोनाइज्ड स्विमिंग, वॉटर पोलो, स्विमिंग ड्रिलसोबत अंधारामध्ये पाण्यावर जळती मशाल, कारंजा आणि पाण्यावर तरंगणारा मल्लखांबची प्रात्यक्षिके चित्तथरारक आणि रोमहर्षक ठरली. एचव्हीपीएमच्या उन्हाळी शिबिराचा समारोप सोमवार २ जूनला सायंकाळी ६ वाजता झाला. त्याचे औचित्य साधून मंडळाच्या जलतरण विभागात हे चित्तथरारक जलतरण प्रात्यक्षिक पार पडले. विशेष म्हणजे मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी या सोहळ्याला उपस्थित राहून खेळाडूंचा सत्कार व कौतुक केले. एचव्हीपीएमचे कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित समारोपीय सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका राधा कुरील, टॉमी जोश, प्रा. प्रणव चेंडके, प्रा. दीपा कान्हेगावकर, पडोळे, डॉ. संजय तीरथकर, जलतरण विभागप्रमुख डॉ. योगेश निर्मल, शिबिर संचालक राजेश महात्मे उपस्थित होते. यावेळी प्रभाकरराव वैद्य यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती पुरस्कार प्राप्त सांजली वानखडे, पार्थ अंबुलकर, यश दुर्गे, वेदांत सराफ, कौस्तुभ गाडगे, स्वर्णीम शेटे, मंथन शिवणीकर, पीयूषीनी देशमुख, भूमिका गिरी, अंजली राऊत, नारायणी यांच्यासह विविध पुरस्कार प्राप्त १७ जलतरणपटूंचा सत्कार घेण्यात आला. या संपूर्ण प्रात्याक्षिकांच्या सादरीकरणाचे संचालन महेंद्र लोणकर यांनी करत जलतरणाचे महत्व, कौशल्य आणि जलतरणाचे प्रकार आदीबाबत माहिती दिली. जलतरण विभागाचे प्रमुख डॉ. योगेश निमळ यांच्या मार्गदर्शनात आयोजित सोहळ्यात जलतरणपटूंनी विविध कवायती सादर करत उपस्थित नागरिकांची मने जिंकली. सोहळ्याचे सूत्रसंचालन करून आभार प्रा. आशिष हटेकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी मयूर कुमार, प्रा. मनोज कोहळे, गोहाड यांनी परिश्रम घेतले. जळती मशालसोबतच मल्लखांबने वेधले लक्ष हव्याप्रमंच्या जलतरण विभागाद्वारे आयोजित जलतरण प्रात्यक्षिक व कवायती मध्ये पाण्यावर तरंगणारा मल्लखांब नेत्रदीपक ठरला. मल्लखांब विभाग प्रमुख प्रा.मयूर दलाल यांच्या मार्गदर्शनात ६ मुली व १० मुलांच्या चमूने तलवार, जळती मशालसह विविध मल्लखांब कवायतीच्या सादरीकरण उपस्थितांची नेत्रदीपक ठरले. दरवर्षी जलतरण विभागाच्या सोहळ्यात पाण्यावर तरंगणारा मल्लखांब कवायती आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

# पुन्हा १० पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

## युवक काँग्रेसमध्ये नाराजी सत्र सुरूच



■ महासागर प्रतिनिधी, बाभूळगाव, दि. ५ : बाभूळगाव मागील काही दिवसांपासून बाभूळगाव तालुका युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त तालुकाध्यक्षाच्या नियुक्तीवर नाराजी व्यक्त करीत राजीनामे दिले आहेत. आता त्यात भर पडली असून पुन्हा दहा पदाधिकाऱ्यांनी जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे यांचे कडे सोमवार दि.२ जून रोजी राजीनामे सुपुर्द केले. यापूर्वी सुद्धा राळेगाव विधानसभा अध्यक्षा-सहित १९ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिल्याने तालुक्यात खळबळ उडाली होती. सततच्या राजीनामा सत्रामुळे तालुक्यातील काँग्रेसची युवा फळी विस्कळीत झाल्याचे दिसून येत आहे. कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री प्रा. वसंत पुरके यांच्या कार्यप्रणालीवर नाराजी व्यक्त करीत त्यांनी निवड केलेल्या युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष अमेय घोडे यांचे विरोधात पदाधिकाऱ्यांनी उघडपणे प्रतिक्रीया देण्यास सुरूवात केली. त्याचाच एक भाग म्हणून सुरूवातीला १९ पदाधिकाऱ्यांनी आपापल्या पदांचे राजीनामे वरिष्ठांना पाठविले. सरांनी आतातरी युवकांच्या भावना लक्षात घ्याव्यात असा प्रत्येकाचा सूर होता. मात्र, त्याकडे सरांनी साफ दुर्लक्ष केल्याने आता पुन्हा दहा पदाधिकाऱ्यांनी राजीनामे वरिष्ठांकडे दिले आहेत. एकंदरीत तालुक्याची युवक काँग्रेस पुर्णपणे रिकामी झाल्याचे दिसून येत आहे. नवनियुक्त तालुकाध्यक्षांविरोधा त असलेल्या नाराजीचा फटका तालुक्यातील काँग्रेसला आगामी काळात बसण्याची चिन्हे या प्रकारामुळे निर्माण झाली आहेत.

**कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री प्रा. वसंत पुरके यांच्या कार्यप्रणालीवर नाराजी व्यक्त करीत त्यांनी निवड केलेल्या युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष अमेय घोडे यांचे विरोधात पदाधिकाऱ्यांनी उघडपणे प्रतिक्रीया देण्यास सुरूवात केली.**

# बकरी ईदला स्वच्छतेसाठी प्रार्थनस्थळात कंपोस्टेबल बॅग

## महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी घेतली आढावा बैठक



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. ५ : बकरी ईदला मशीदीसह मुस्लीम वस्तीच्या परिसरात स्वच्छता राहावी, पाण्याची उणीव जाणवू नये तसेच कुर्बानी दिल्यानंतर टाकाऊ पदार्थ फेकण्यासाठी प्रत्येक मशीदीत जाऊन कंपोस्टेबल बॅगचे वाटप करण्याचे तसेच मुस्लीम प्रभागांमध्ये नवीन कंटेनर ठेवण्याचे आदेश मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिले. तसेच पशुवैद्यकीय विभागामार्फत विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली. मंगळवारी ३ जून रोजी झालेल्या बैठकीमध्ये मुस्लीम बांधवांकडून मिळालेल्या सूचनांनुसार उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही मनपा आयुक्तांनी दिली.

महानगरपालिका, पशुवैद्यकीय विभागाद्वारे मुस्लीम बांधवांचा शनिवारी ७ जूनल होणारा बकरी ईद हा सण स्वच्छतापूर्ण व पर्यावरण पूरक व्हावा, यासाठी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला मनपा उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, कार्यकारी अभियंता रवींद्र पवार, पशु शल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे , पोलिस उपायुक्त शिंदे, सहायक पोलिस आयुक्त तसेच बडनेरा पो.स्टे. पोलिस निरीक्षक सुनील चव्हाण, गाडगेनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक, खोलापुरी गेट पो.स्टे. पोलिस निरीक्षक गौतम पठारे, नागपुरी गेट पो.स्टे. पोलिस निरीक्षक हनुमंत उरला गोंडावार, फ्रेजरपुरा पो.स्टे. पोलिस निरीक्षक, स्वास्थ्य अधीक्षक श्रीकांत डवरे, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक, स्वास्थ्य निरीक्षक व सर्व पोलिस स्टेशनचे अधिकारी उपस्थित होते.बकरी ईद सणानिमित्त जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्तांच्या झालेल्या बैठकीला अनुसरून मनपा क्षेत्रातील सर्व मुस्लीम बांधवांनी उत्साह व शांतता पूर्ण वातावरणात आरोग्यदायी व पर्यावरणपूरक ईद साजरी करणसाठी मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन मनपा आयुक्तांनी केले. महानगरपालिका हद्दीतील पशुपालकांनी गाय ,वळू, बैल, वासरे या मोकाट सोडलेल्या जनावरांना ओळख चिन्ह देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या चिकीत्सालयात जनावरांना घेऊन जावे. बकरी ईद संदर्भाने सर्व मुस्लीम बांधवांनी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा व गोवंश हत्या प्रतिबंध कायदा अधिनियमानुसार कुर्बानी करीता जनावरांचा वापर करावा व प्रशासनास सहकार्य करावे, अशाही सुचना देण्यात आल्या.

# १९ वर्षे उलटूनही दिग्रसच्या पूरग्रस्त कुटुंबीयांचे पुनर्वसन अधांतरी

## ९५२ घरकुलांचे अर्धवट बांधकाम



■ महासागर प्रतिनिधी, दिग्रस , दि. ५ : दिग्रस शहराला विद्रुप करून सर्वत्र हाहाकार माजवणाऱ्या महापुराला तब्बल १९ वर्षे पूर्ण झाली आहे. मात्र, अर्ध्यापेक्षा अधिक पूरग्रस्तांचे पुनर्वसन न झाल्यामुळे त्यांच्या वेदना अधिकच तीव्र झाल्या आहेत. ही सर्व मंडळी सद्या नदीकाठच्या झुडुपात आपल्या तुटक्या झोपड्या बांधून जीवन कंठत आहे. अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या डोळ्यावरील पट्टी उघडत नसल्याने पूरग्रस्तांच्या डोळ्यातून आजही अश्रूंचा पूर वाहत आहे. दिग्रस पासून ९ किलोमीटर अंतरावर असलेल्या पुसद मार्गावर नगरपालिकेच्या मालकीचे नांदगव्हाण धरण आहे. धरणाचा दि. ९ जुलै २००५ रोजी रात्री ८ वाजता सांडवा फुटला आणि शहरात प्रचंड पूर आला होता. शहरातून वाहणाऱ्या धावंडा नदीकाठच्या परिसरात पाणी शिरल्याने प्रचंड हाहाकार माजला होता. जुने बैल बाजार परिसरातील मीना सोनोने, भाग्यश्री सोनोने, वैभव सोनोने, तेजस्विनी सोनोने, प्रभाकर विलायते, स्वाती विलायते, वासुदेव नवरे, शशिकला नवरे, दिवाकर शेलकर, वेणू शेलकर, शांता शिंदे, बाली शिंदे, पंचिबाई पवार व श्याम पाचंगे अशा १४ निष्पाप नागरिकांचा या पुरात बळी गेला. दिग्रस शहरातील ८ तर सिंगद येथील ३ व साकरी येथील ३ जणांचा मृतांमध्ये समावेश होता. महापुरात शहर व ग्रामीण भागतील २ हजार ७९ कुटुंबातील १० हजार ९७८ सदस्य बाधित झाले होते. तालुक्यातील २ हजार ५११ कास्तकारांची २ हजार ८०६ हेक्टर शेतीमधील पिके नेस्तनाबूत झाली होती. अनेक कास्तकारांची पिके तर पूर्णतः खरडून गेल्याने कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले होते. याव्यतिरिक्त असंख्य घरांची पडझड होऊन, दुकाने, गोदाम, विद्युत, दूरभाष केंद्राचे खांब, तार, रोहित्र, जनावरे अशी कोट्यवधी रुपयांची खाजगी व शासकीय मालमत्ता मातीत मिसळली होती. शासनातर्फे त्यावेळी पूरग्रस्तांच्या तोंडाला सानुग्रह अनुदानाची पाने पुसण्यात आली. अनेक राजकिय पुढारी, स्वयंसेवी संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने अन्नधान्य, कपडे, ब्लँकेट, चादरी, जेवण, गृहोपयोगी भांडी व इतर साहित्य वाटप करण्यात आले. मात्र स्वतः ची कोणतीही चूक नसतांना व एवढे मोठे संकट कोसळूनही अधिकतर पूरग्रस्तांचे अद्याप पर्यंत पुनर्वसन न झाल्यामुळे त्यांच्या वेदना अधिकच तीव्र झाल्या आहे. अखेर किती काळ वाट बघावी व जीवन कसे व्यतीत करावे? असा यक्ष प्रश्न त्यांच्या समक्ष उभा ठाकला आहे. शासनातर्फे त्यांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया भवानी मंदिर परिसरात सुरू करण्यात आली होती त्याला खीळ बसली आहे. तेथे अंदाजे शंभर किंवा त्यापेक्षा अधिक कुटुंब सद्य:स्थितीत वास्तव्यास आहे. पण उर्वरित पूरग्रस्त कुटुंबांचे काय? आपले नातेवाईक व मालमत्ता गमावण्याचा दुःख पुनर्वसनाची मलमपट्टीही न झाल्यामुळे डोळ्यातून अश्रूंचा पूर वाहत आहे. दिग्रस येथील ९५२ पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी २२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यातून दि. १२ जुन २००९ रोजी ३ किलोमीटरवर असलेल्या श्री भवानीमाता मंदिर परिसरातील ९.९६ हेक्टर जमीन खरेदी करण्यात आली होती. प्रती कुटुंब २७० चौरस फुटाचे बांधकाम करुन देण्यात येईल, अशी योजना आखण्यात आली होती. मात्र, दुर्दैवाची बाब अशी की सदर जागेवर प्रत्यक्ष ४०० घरकुल बसत असून ४० टक्के भागात तलाव असल्याने ही जागा बांधकामास योग्य नसल्याचा अहवाल तज्ञांनी दिला. त्यामुळे पुनर्वसनाचा गुंता अधिकच वाढत गेला. दिग्रस येथील ९५२ पैकी अंदाजे शंभर कुटुंबांना भवानी मंदिर परिसरात निवारा देण्यात आला, मात्र उर्वरित पूरग्रस्तांचे काय असा प्रश्न आजही कायम आहे.

# स्वा. सावरकर यांच्या जयंतीनिमित्त रंगली वेशभूषा स्पर्धा







■ महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. ५ : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त चित्पावन ब्राह्मण संघाच्या स्थानिक शाखेने विविध वेशभूषा स्पर्धा आयोजित केली होती. देशभरातील वेगवेगळ्या राज्यांमधील पेहरावाचे सादरीकरण हा या स्पर्धेचा उद्देश होता.

त्यानुसार या स्पर्धेत अनेकांनी सहभाग घेतला. यावेळी मराठी, पंजाबी, राजस्थानी, केरळी, गुजराती, काश्मिरी वेशभूषेचे सादरीकरण करण्यात आले. येथील बडनेरा रोड स्थित समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या सभागृहात सायंकाळी साडेसहा वाजता हा कार्यक्रम सुरू झाला. ही स्पर्धा सर्व वयोगटासाठी खुली होती. कार्यक्रमाचा प्रारंभ 'जयोस्तुते' या गीताने व स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, भारत माता तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा पूजनाने झाला. या वेळी 'शतकिरणांनी करू निरंतर नमितो तुजला कलेश्वरा' या नांदीही सादर करण्यात आली. कार्यक्रमाला चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्रीरंग फाटक तसेच परीक्षक संगीता माथाने, मधुसूदन वटक आणि पूर्वा सोपान गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

छोट्या गटात सहा स्पर्धकांनी वेशभूषा सादर केली. लवकुश-अद्वय सारंग लिमये व अनय सारंग लिमये. सैनिक-युगांशहरीश जडे, श्रीकृष्ण-रिदम गुल्हाने, झाशीची राणी-तीर्थाराहुल बलखंडे, भारत माता-आरोही राहुल बलखंडे आणि मदर तेरेसा-निर्वेशगजानन चौधरी यांनी सादर केली. या गटात निर्वेश चौधरीला प्रथम, आरोही बलखंडेला द्वितीय तर रिदम गुल्हाने याला तृतीय क्रमांकाचे बक्षीस दिले. मोठ्या गटात पाच स्पर्धकांनी सहभाग घेतला. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर-सर्जेराव गलपट, नेताजी सुभाषचंद्र बोस-अविनाश राजगुरे, गाडगे महाराज-अर्चना वऱ्हाडपांडे, लोकमान्य टिळक-वसंत साठे, तुकडोजी महाराज-वसंत साठे आणि सावित्रीबाई फुले-सुजाताचंद्रशेखर पेंडसे यांनी सादरीकरण केले. यामध्ये वसंत साठे यांना प्रथम क्रमांक, सर्जेराव गलपट यांना द्वितीय क्रमांक तर अर्चना वऱ्हाडपांडे यांना तृतीय क्रमांक देण्यात आला. सर्वांना रोख पारितोषिक आणि प्रशस्तिपत्र देण्यात आले. यानंतर परीक्षकांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. संघाच्या सचिव स्वाती परांजपे यांनी प्रास्ताविक केले. आभार प्राची मोडक यांनी मानले. प्रारंभी मकरंद जोशी, सीमा करमरकर, सीमा गद्रे यांच्या हस्ते परीक्षकांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सावरकरप्रेमी उपस्थित होते. उपक्रमासाठी चित्पावन ब्राह्मण संघाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. स्वाती फाटक (गुजराती), अर्चना केळकर (केरळ), प्राची मोडक (बंगाली), अश्विनी शर्मा (पंजाबी), नीलिमा जोशी (मराठी), सोनाली धामणकर (राजस्थानी) आणि भार्गवी वझे (काश्मिरी) यांनी स्पर्धेत वेशभूषा सादर केल्या. या सर्व प्रदेशातील महिलांच्या हस्ते भारत मातेची आरती करण्यात आली. कार्यक्रम स्थळी वंदे मातरम, भारत माता की जय या जयघोषासह स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांच्या वेशभूषेत श्रीरंग फाटक यांचे आगमन झाले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रचलेल्या (जयदेव जयदेव जय जय शिवराया) या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीचे समूह गान करण्यात आले आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# ‘स्वित्झरलंड’: स्वर्गीय अनुभूती



स्वित्झरलंड युरोपमधील सर्वांत सुंदर देश... येथील घड्याळे आणि चॉकलेट विश्वविख्यात आहेत. येथील हवा खूपच थंड असते. बर्फाच्छादित डोंगर, चारही बाजूंनी व्यापलेली हिरवळ, रंगीबेरंगी फुलांच्या बागा, मधुर आवाजात गाणारे पक्षी, स्वच्छ-सुंदर रस्ते आणि निसर्गसौंदर्याने बहरून गेलेली पर्यटनस्थळे, यामुळे 'स्वित्झरलंड'पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनले आहे.

येथील 'राईन फॉल'हे पाहण्याजोगे पर्यटनस्थळ आहे. रेल्वेने विंटरथर जाऊन तेथून दुसरी रेल्वे पकडून 'राईन फॉल' येथे जाता येते. या प्रवासातही निसर्गसौंदर्य पाहताना खूपच मजा येते. सुंदर, छोटी-छीटी आणि विशेष म्हणजे स्वच्छ गावे, सगळीकडे हिरवळ आणि त्यामध्ये चरणाऱ्या गाई हे दृश्य पाहताना मन प्रसन्न होऊन जाते. घाटमाथ्यातून गाडी धावू लागली की 'राईन फॉल'आल्याची जाणीव होऊ लागते. रेल्वेतून उतरताच समोर निसर्गसौंदर्याने बहरून गेलेला नजरा दिसतो. धबधब्यांचे जोरदार आवाज, अंगावर उडणारे पाण्याचे तुषार अनुभवत घाटात खाली उतरण्यासाठी पायवाट आहे. घनदाट जंगलातून हा रस्ता गेला आहे. काही अंतर चालल्यावर समोर युरोपातील सर्वांत मोठ्या 'राईन फॉल'दृश्य दिसते आणि आपण थक्क होऊन जातो. पाण्याचे तुषार, त्यावर कोवळे उन्ह पडताच निर्माण होणारे इंद्रधनुष्य, पाहतच बसावेसे वाटते.

येथून रेल्वेने ज्यूरिखला जाता येते. येथील स्विस भोजनाचा स्वाद काही औरच आहे. याठिकाणी मोठे शॉपिंग मार्केट आहे. विशेष करून ज्यूसेस, फ्रूट्स आणि ब्रेडस मिळतात. एक दिवसाच्या मुक्कामानंतर लूजर्नला जाता येते. येथे जाणाऱ्या रेल्वे कमालीच्या फास्ट असतात. स्वच्छ, आरामदायी असण्याबरोबरच बाहेरील निसर्गसौंदर्य पाहण्यासारखे असल्याने कितीही मोठा प्रवास असला तरी थकवा जाणवत नाही. लूजर्नमध्ये राहण्यासाठी चांगली हॉटेल्स आहेत. याठिकाणी प्रसिद्ध लेक लूजर्न आणि चॅपल ब्रिज पाहण्यासारखे आहे. शहराच्या सुरक्षिततेसाठी सेंट पीटर चॅपल यांच्या नावाने हा ब्रिज चौदाव्या शतकात बांधण्यात आला आहे. हा पुल पूर्णपणे लाकडाचा आहे, हे विशेष. दोन्ही बाजूस रंगीबेरंगी फुलांनी सजावट करण्यात आली आहे. वरून पॅक असणाऱ्या या पुलाच्या आतील भागात लूजर्न शहराचा इतिहास सांगणारी चित्रे आहेत.

याठिकाणी 'माउंट पीलेटस' हे खास आकर्षण असणारे स्थळ आहे. लेक लूजर्न येथून बोटीने जाता येते. हा प्रवासातही समुद्राकाठचे निसर्गसौंदर्य आल्हादकारक आहे. बीचवरील सुंदर गावे, डोंगर, हिरवळ पाहता पाहता कॉगविल कधी येते ते समजतच नाही. येथून पुडे रेल्वेने प्रवास करावा लागतो. ही रेल्वे उंचच उंच टेकड्या आणि खोल दऱ्यांमधून धावते. विशेष म्हणजे जगातील सर्वांत चढावरून धावणारी ही रेल्वे आहे. दऱ्याखोऱ्यातून 'माउंट पीलेटस' मध्ये पोहोचल्यावर येथील दृश्य पाहताना स्वर्गीय अनुभूती होते. येथे एक दिवस थांबून धम्माल करता येते. घाटातून रेल्वेप्रवास करण्याचा अनोखा अनुभव घेल्यानंतर खाली उरण्यासाठी केबल कारचा अनुभवही रोमांचकारक आणि कायम स्मरणात राहण्यासारखा आहे. कारण ७००० फुट उंचीवरून आपण काही मिनिटांत खाली येतो.

इंटरलाकन हे पाहण्याजोगे आहे. येथील आल्पस पर्वतरांगामधील जुंगफ्राउ हे स्थळ पाहण्यासारखे आहे. युरोपमधील सर्वांत उंच म्हणूनही याची ख्याती आहे. सुमारे ११ हजार ३३३ फुट एवढ्या उंचीवर जायचे म्हटले तर अंगावर काठा उभा राहतो पण, येथे जाण्यासाठीही आरामदायक रेल्वे आहे आणि निसर्गसौंदर्य पाहताना आपण याठिकाणी कधी पोहोचलो तेच समजत नाही. इंटरलाकनपासून 'जुंगफ्राउ'हा सुमारे अडीज तासांचा प्रवास आहे. पण, शेवटचा तासभरच्या प्रवासात रेल्वे बर्फाच्छादित पर्वतांतून धावत असते, हा नजारा शब्दात व्यक्त करता न येणारा आहे.

जुंगफ्राउ पीकवर 'व्हू पॉईंट्स' आहेत. येथील स्फींक्स ऑब्जर्वेशन हॉल आणि टेरेस पाहताना आपण थक्क होऊन जातो. आईस पॅलेसही पाहण्यासारखा आहे. जिकडे बघाल तिकडे बर्फाने व्यापून टाकलेला परिसर, सुर्यकिरणे पडतात चकाकून जाणारी शिखरे, त्यामध्ये स्कीइंग करताना मुंग्यांसाखरे दिसणारे लोक पाहताना वेगळीच मजा येते. खरोखरच येथून पायच निघत नाही. उंचीवर बॉलीवूड रेस्टॉरंट आहे. याठिकाणी भारतीय पदार्थांचा आस्वाद घेतानाचा अनुभवही काही औरच आहे. भारतीयांबरोबरच युरोपीय लोकही या भोजनाचा आस्वाद घेताना दिसतात.

इंटरलाकन पासून माँत्रोला जाता येते. या तीन तासांच्या प्रवासासाठी पारदर्शत रेल्वे आहे. या पेनोरेमिक ट्रेनमधून प्रवास करण्याचा अनुभही सुखद आहे. माँत्रोमधील जिनेवा लेक प्रसिद्ध आहे. याला स्विस रिविएराही म्हटले जाते. याठिकाणी जास्तकरून फ्रेंच बोलली जाते. येथील ओल्ड टॉउन फ्रेंडी मर्क्युरी मेमोरियल, केसल चिलिया ही स्थळे पाहण्यासारखी आहेत. येथून 'चॉकलेट ट्रेन' आपल्याला ग्रुएरला घेऊन जाते. येथील गावांमध्ये चीज बनविले जाते. म्हणूनच याला चीज मेकिंग टाउनही म्हटले जाते. याच मार्गावर येणाऱ्या 'ब्रोक' येथे जगविख्यात नेस्लेची चॉकलेट फॅक्टरी आहे.






# तुमचा प्रवास बनवा आठवणीतील

चांगल्या जीवनासाठी फिरायला आणि पर्यटनाला जाणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपल्या जीवनात नवीन उत्साह, आशा जागी होते आणि जीवनात प्रसन्नता येते, पण सध्याच्या व्यस्त आयुष्यात सहली, पर्यटन आणि फिरायला सहसा शक्य होत नाही, तर मग आपल्या जीवनात प्रसन्नता का निर्माण करू नये.

आजकालच्या तणावपूर्ण आणि व्यस्त आयुष्यात सहली आणि फिरायला जाणे संपत चालले आहे. जीवन फक्त घर आणि ऑफिसच्या जबाबदाऱ्या व बस-ट्रेनमधील घाई गडबडीपर्यंत मर्यादित होत आहे. अशा परिस्थितीत सहल व पर्यटनाला जाणेही एक डोकेदुखी वाटते, पण खऱ्या पर्यटनाचा आनंद तेव्हाच मिळतो जेव्हा पर्यटन पूर्ण तन्मयतेने आणि कोणत्याही तणावाशिवाय पार पडते. प्रवास म्हणजे फक्त बस, रेल्वे, टॅक्सी किंवा विमानाने जाणे नव्हे, तर आपल्या दिनचर्येला आयुष्यापासून वेगळे करणारी जवळची शतपावलीदेखील एक चांगला प्रवास म्हटला जाऊ शकतो. यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.

कधीही मानत नसताना फिरायला जाऊन नये. इच्छा असेल तेव्हाच आरि मन पूर्णत: तयार करून प्रवासाला निघावे.

कोणतेही काम अपूर्ण ठेवून प्रवासाला जाऊ नये. घर किंवा ऑफिसच्या जबाबदाऱ्या पूर्ण करूनच बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून मन ऑफिसमध्ये गुंतू नये.

पर्यटनासाठी रोमांचक स्थळ निवडावे जे तुमच्यासाठी पूर्णत: नवीन असेल.

प्रवासासाठी निघताना शक्यतो सायंकाळची वेळ निवडावी ज्यामुळे बस, रेल्वे किंवा जहाजात नवीन रात्र घालवण्याची संधी मिळेल.

शक्य असल्यास सोबत लग्नाचा अल्बम किंवा संस्मरणीय फोटो ठेवावेत. वेळ मिळाल्यास हे फोटो पाहावे. यामुळे फक्त गोड आठवणीच जाग्या होणार नाहीत, तर धकाधकीच्या आयुष्यात विस्मरणात गेलेले प्रेमही जागे होईल.

एकमेकांना त्रास होईल आणि रंगाचा बेरंग होईल असे काम किंवा नावाचा उल्लेख येऊ देऊ नये. संधी मिळेल तेव्हा एकमेकांचे कौतुक करावे आणि असे क्षण कॅमेऱ्यात कैद करावेत जेणेकरून नंतरही कधी ते पाहिल्यास दिलासा मिळू शकेल.

नेहमीच्या आयुष्यात आपण जी गोष्ट करणे टाळतो ती प्रवासाला किंवा पर्यटनाला गेल्यानंतर निश्चित करून पाहावी.

स्वत:ला नवीन लूक किंवा आत्मविश्वास देणारे नवीन कपडे प्रवासादरम्यान घालावेत. विचार करा - पार करण्यासाठी आयुष्याक अडचणीच नसतील, तर माणसाच्या समृद्ध अनुभवाची माजच निघून जाईल. खल दऱ्याच नसतील, तर उंच शिखरावर घालवलेले क्षण कधीही अद्भुत वाटणार नाहीत



# ट्रेकर्ससाठी कुल्लु आयडियल

बियास नदीचया पात्रात उत्तरेकडून दक्षिणेकडे ८० कि.मी. लांब परिसरात हे खोरं वसलयं. गिर्यारोहक, पर्यटकांसाठी ते एक आव्हानच ठरतं. स्थानिक विणकरांकडून बनवलेल्या रंगीबेरंगी शाली आणि टोप्यांसाठी कुल्लू प्रसिद्ध आहे. इथूनच १५ किलोमीटर अंतरावर विश्वेश्वर महादेवाचं मंदिर आहे. हे आठव्या शतकात बांधलं गेलेलं आहे. याशिवाय कुल्लू शहर मासेमारी आणि शिकारीसाठीही प्रसिद्ध ठिकाण आहे.


कुटुंबासह, मित्रांच्या गोतावळ्यासह येते भटकंतीसाठी यावंच, पण ट्रेकर्ससाठीही हा प्रदेश आयडियल आहे. ट्रेकिंग, रॉक क्लायबिंग, रिव्हर्स क्रॉसिंग याचा मनसोक्त आनंद घ्यायचा असेल तर कुल्लू-मनालीला यावंच. पूर्वी कुल्लू कुलंथपीठा या नावानं ओळखलं जायचं. कुल्लू दसरा या सणासाठी लोकप्रिय आहे. दसऱ्यादरम्यान इथे नृत्य, संगीत, देवदेवतांच्या पालख्या अशी धमाल असते. कुल्लूच्या शाली आणि कॅप्स आवर्जून खरेदी कराव्या. दिल्लीवरून पठाणकोट मार्गे कुल्लू ७६० कि.मी. अंतरावर आहे.



# भारताचे स्वित्झलँड खज्जियार

खज्जियार भारताचे स्वित्झलँड म्हणतात. येथे छान नैसर्गिक लॉन आहे. मध्ये तळे आहे आणि समोर मोठा डोंगर आणि जंगल आहे. येथे मैदानात बरेच खेळ आणि घोडेवाले असतात. या ठिकाणाहून घोड्याने चंबा गावात जाता येतो.

रावी नदीच्या किनारी हे गाव वसले आहे. येथे ४ देवळांचा एक समूह आहे. त्यातिल एक मंदिर लक्ष्मी नारायण मंदिर १०व्या शकतातील आहे. मंदिरांवर सुंदर कोरीव काम आहे. रावी नदी अतिशय सुंदर आणि स्वच्छ आहे. याठिकाणी कोई मिल गया ह्या चित्रपटाचे चित्रिकरण झाले आहे.



# कनकदुर्ग-गोवागड



हर्णे बंदर प्राचिन काळापासून प्रसिध्द आहे. सुवर्णदुर्ग या जलदुर्गामुळे हर्णे बंदराला ऐतिहासीक महत्वही प्राप्त झालेले आहे. सुवर्णदुग किल्ल्याच्या रक्षणासाठी हर्णेच्या सागरी किनाऱ्यावर तीन किनारी किल्ल्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. ते तीन दुर्ग म्हणजे कनकदुर्ग, फत्तेदुर्ग आणि गोवागड हे होय.

हर्णे बंदर दापोली तालुक्यामधे असून तो रत्नागिरी जिल्ह्यामधे आहे. कोकणामधील महाड, मंडणगड आणि खेड कडून गाडीमार्गाने दापोलीला पोहोचता येते. दापोलीपासून सोळा कि.मी. अंतरावर हर्णे आहे. हर्णेच्या सागरातील सुवर्णदुर्ग किल्ल्याबरोबर किनाऱ्यावरील या तिन्ही किल्ल्यांनाही भेट देता येते.

हर्णेच्या किनाऱ्यावर दक्षिणेकडे टेकडीवजा एक भुशिर घुसलेले आहे. या लहानश्या टेकडीवजा भुशिरावर कनकदुर्गाचा किल्ला उभा आहे. कनकदुर्गाच्या पुर्व बाजुला मच्छिमारांच्या असंख्य नौका दिसतात. या नौकांमधे जाण्यासाठी कनकदुर्गाला लागुनच धक्का बांधलेला आहे. या धक्क्यावर जाण्यासाठी पुलासारखा रस्ता केलेला आहे. या रस्त्यावर चालत गेल्यावर कनकदुर्गाच्यावर जाण्यासाठी केलेल्या पायऱ्यांचा मार्ग आहे. या पायऱ्यांच्या बाजुलाच भक्कम बांधणीचा बुरुज आहे. काळ्या पाषाणातील हा बुरुज म्हणजे कनकदुर्ग... हा पुर्वी किल्ला होता याचा साक्षीदार आहे. पायऱ्यांच्या मार्गाने आपण पाचच मिनिटांमधे कनकदुर्गावर पोहोचतो. गडाच्य माथ्यावरच्या इमारती आता नष्ट झाल्याअसून त्याभागात दिपगृह उभे असलेले दिसते. कनकदुर्गावरुन मुरुड दाभोळ तसेच गोपाळगडापर्यंतचा सागरकिनारा दिसतो. पश्चिमेकडे अथांग सागराची मधुन मधुन चमचमनारी किनार आणि सागराची गाज आपल्या मनाला धडकी भरवत रहाते. या पार्श्वभूमीवर दिमाखात उभा असलेला फुलपाखराच्या आकाराचा सुवर्णदुर्ग आपले लक्ष वेधून घेतो. उत्तरेकडै फत्तेदुर्गाची टेकडी मच्छिमारांच्या वस्तीने पुर्णपणे घेरलेली दिसते. कनकदुर्गावरील गडपणाचे अवशेष काळाच्या ओघात नष्ट झाल्यामुळे आपली गडफेरी १५ ते २० मिनिटांमधे आवरते.

कनकदुर्गाकडून परत फिरल्यावर डावीकडील टेकडी म्हणजे फत्तेदुर्ग असल्याची मनाची समजूत घालून पुढे निघावे लागते. मच्छिमारांच्या वस्तीने व्यापलेल्या फत्तेदुर्गावरचे अवशेष केव्हाच लुप्त झालेले आहे.

फत्तेदुर्गापासून फर्लांगभर गाडीरस्त्याने चालत आल्यावर समोर दिसतो तो तटबंदीने युक्त असलेला गोवागड. भक्कम तटबंदी आणि भक्कम दरवाजा असलेल्या या किल्ल्याचे नाव जरी गोवागड असले तरी गोव्याशी याचा काही संबंध नाही. रस्त्याच्या कडेलाच याचा दरवाजा दिसतो पण याचा मुख्यदरवाजा मात्र उत्तरेकडे तोंड करुन आहे. हे भव्य प्रवेशव्दार पहाण्यासाठी तटबंदीला वळून समोरुन आपल्याला जावे लागते. सागराच्या बाजुला थोडेसे उतरुन डावीकडे वळाल्यावर आतल्या बाजुला हे प्रवेशव्दार आहे. हे प्रवेशव्दार दगडाने चिणून बंद करण्यात आले आहे. प्रवेशव्दाराजवळ हनुमानाची मुर्ती आहे. तसेच येथे शरभ व महाराष्ट्रामधे किल्यांवर अभावानेच दिसणारे गंडभेरुडाचे शिल्प आहे. हे प्रवेशव्दार पाहून पुन्हा रस्त्यावर येवून नव्याने केलेल्या कमानीवजा दारातून गडामधे प्रवेश करावा लागतो. सध्या कोणा हॉटेल व्यवसायीकाने गडाचा ताबा घेतला आहे. त्याने दारावर चौकीही उभारली आहे. तेथील रखवालदाराची परवानगी घेवून किल्ल्यामधे जाता येते. गोवागड दक्षिणकडील भाग थोड्या चढाचा आहे. याचाच उपयोग करुन त्याला तटबंदी घालून बालेकिल्ला केलेला आहे. पश्चिमेकडील तटबंदी काहीशी ढासळलेली आहे. पश्चिमबाजुला सुवर्णदुर्गाचे दृष्य उत्तम दिसते. गडामधे पाण्याची विहीर आहे. तिचा वापर नसल्यामुळे पाणी वापरण्यायोग्य राहीले नाही. किल्ल्यात इंग्रजकालीन दोन इमारती पडलेल्या अवस्थमधे आहेत. त्यामधील एकात पुर्वी कलेक्टर राहात असे. गडामधे महत्त्वाचे असे बांधकाम फारसे शिल्लक नसल्यामुळे गड पहाण्यासाठी अर्धा तास पुरेसा होतो.

जर आपण संध्याकाळच्या वेळेस येथे असू तर कनकदुर्गच्या किनाऱ्यावरील मासळी बाजार अवश्य पहाण्याजोगा आहे. अर्थात खवय्यासाठीतर ही सुवर्णसंधीच होय.

# भाजपचे दरवाजे सर्वांसाठी खुले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरूवारी नाशिकमध्ये बोलताना पक्षवाढीसाठी आपल्या पक्षाची कवाडे सर्वासाठी खुली असल्याचे स्पष्ट केले आहे.

त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेल्या सुधाकर बडगुजरांसाठी भाजपने अवघ्या २४ तासांतच आपले दरवाजे खुले केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक १५ ऑगस्टला लागेल, असा अंदाजही बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

ठाकरे गटाने पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत बुधवारी सुधाकर बडगुजर यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देण्याचे संकेत दिलेत.

तत्पूर्वी स्वतः बडगुजर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपण भाजपच्या वाटेवर असल्याचे स्पष्ट केले होते. पण बडगुजर यांना पक्षात घेण्यास भाजपच्या स्थानिक नेत्यांनी विरोध केला होता. पण आता बावनकुळे यांनी स्वतःच बडगुजर यांना पक्षात घेण्यास ग्रीन सिग्नल दिला आहे.

सुधाकर बडगुजर यांच्या पक्ष प्रवेशाविषयी गिरीश महाजन लक्ष घालत आहेत. पक्षवाढीसाठी आमची कवाडे सर्वासाठी खुली आहेत, असे बावनकुळे यांनी याविषयी बोलताना स्पष्ट केले.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी नेत्यांच्या मागे-पुढे फिरणाऱ्यांना तिकीट मिळणार नसल्याचेही ठणकावून सांगितले. नेत्यांच्या मागे-पुढे करणाऱ्या महापालिका निवडणुकीत तिकीट मिळणार नाही. त्यामुळे कुणीही नेत्यांपुढे चमकोगिरी करू नये. भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मागील ११ वर्षांत मोदी सरकारने केलेल्या कामांची उजळणी करून ती जनतेपर्यंत पोहोचवायची आहेत.

आगामी निवडणुकांत आपल्याला एकेक मत महत्वाचे आहे. त्यामुळे कमळ चिन्हावर लढणाऱ्या एकाही कार्यकर्त्याला आपल्याला हरू द्यायचे नाही. सर्वांनी असा संकल्प घेतला पाहिजे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने लाडकी बहीण, शेतकरी वीज बिल माफीसारखे निर्णय घेतले होते. आता १५ ऑगस्टला स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लागेल. त्यामुळे आपल्याला अधिक प्रयत्न करावे लागतील, असे ते म्हणाले.

## बडगुजरांच्या प्रवेशाला सीमा हिरेंचा विरोध

दुसरीकडे, सुधाकर बडगुजर यांच्या भाजप प्रवेशाला नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सीमा हिरे यांनी कडाडून विरोध केला आहे. सुधाकर बडगुजर भाजपमध्ये प्रवेशासाठी इच्छुक असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. पण यासंबंधी आमच्याशी कोणतीही चर्चा किंवा विचारणा झाली नाही. मी स्वतः बडगुजर यांच्या विरोधात दोनदा निवडणूक लढवली. त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला. आमच्या वरिष्ठ नेत्यांवर आक्षेपार्ह टीका केली. खुद्द चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविषयी त्यांनी चुकीची माहिती पसरवली होती. एवढेच नाही तर नारायण राणे यांच्याबद्दल त्यांनी अटक होईल अशी परिस्थिती निर्माण केली. त्यामुळे अशा व्यक्तीस पक्षात प्रवेश देऊ नये अशी आमची भूमिका आहे. बडगुजर यांच्यावर सध्या १७ गुन्हे दाखल आहेत. त्यांचे अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीमचा हस्तक सलीम कुत्ता याच्याशी संबंध असल्याची माहिती आहे. त्याच्या मुलावरही गोळीबाराचा गुन्हा दाखल आहे. या सर्व प्रकरणांमधून स्वतःची सुटका करण्यासाठी ते भाजपमध्ये येण्याचा प्रयत्न करत असावेत, असे त्यांनी म्हटले आहे.

## बफर झोनमधील गावांमध्ये
# एआय कॅमेरे बसवणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून ग्रामस्थांना वाचविण्यासाठी वन्य प्राण्यांचा वावर आहे, अशा महाराष्ट्रातील वनालगतच्या बफर झोनमधील गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर असणारे कॅमेरे लावण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी येथे दिली.

चंद्रपूर येथे आयोजित महिला परिषदेला उपस्थित राहण्यासाठी आले असता ते माध्यमांशी बोलत होते. मानव व वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, अशा घटनांमध्ये माणसांचा मृत्यू होऊ नये, यासाठी ठोस पावले उचलण्यात येईल, असेही ते म्हणाले.

वनालगतच्या गावांमध्ये फेन्सिंग करणे, चर खोदणे याबरोबरच वन्य प्राण्यांची माहिती गावकऱ्यांना कळावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. यासाठी यासाठी कॅम्पा वन्यजीव निधी तसेच गरज पडल्यास मॅनग्रोजमधील निधी वापरला जाईल, असे नाईक यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील जंगलांमध्ये वन्य प्राण्यांची संख्या वाढत असल्यामुळे मानव व वन्यजीव संघर्ष होत आहेत. जंगलातील प्राणी संख्या नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे. संध्याकाळी साडेसातसे सकाळी साडेसात पर्यंत तो काळ महत्त्वाचा असतो. लोकांमध्ये जागृती व्हावी सोलर फेन्सिंग लावण्यात येईल. यासह अनेक उपाययोजना केल्या जातील.

नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात नेऊरवाडा गावात वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. रवी कवडू कालसर्पे (वय ३८) हे शेतात काम करत असताना वाघाने हल्ला केला. वन विभागाचे अधिकारी सातत्याने काम करीत होते. पण, समज, गैरसमज पसरवले जातात.

विभागाचे अधिकारी कोणाला सांगत नसतात. आम्ही आमचे प्रयत्न करीत असतो, असे नाईक म्हणाले. चंद्रपूरसह इतर ठिकाणी बफरमध्ये पर्यटक वाघ पाहण्यासाठी रस्त्यावर उतरत आहे. वन विभागासह प्रत्येक विभागात आम्ही मायक्रो लेव्हलवर बदल करीत आहो. त्यातून निश्चितपणे चांगले बदल होतील. यात जनतेचाही सहभाग लागेल असे ते म्हणाले.

## माजी आमदार सानंदांचे
# अखेर ठरले!

### दादांच्या राष्ट्रवादीत घेणार प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ५ :



खामगावचे माजी आमदार काँग्रेस सोडण्याच्या दीर्घ चर्चेला अखेर त्यांनीच पूर्णविराम दिला आहे. खामगाव विधानसभा मतदारसंघाचे तब्बल तीनवेळा काँग्रेसचे आमदार राहिलेले ज्येष्ठ नेते दिलीपकुमार सानंदा यांनी अखेर पक्षाला रामराम ठोकला आहे.

येत्या १२ जून रोजी दिलीप कुमार सानंदा हे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून हातात घड्याळ बांधणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

मागील काही महिन्यांपासून सानंदा हे काँग्रेस सोडणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. ते कोणत्या पक्षात जाणार याबद्दल उत्सुकता होती. मध्यंतरी त्यांनी किमान दोनवेळा शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. अलीकडे बुलढाणा दौऱ्यावर आलेले शिंदे यांची त्यांनी आमदार गायकवाड यांच्या फार्म हाऊस वर भेट घेतली. मात्र संभाव्य सेना प्रवेश टळला. भाजप प्रामुख्याने खामगावचे आमदार आकाश फुंडकर यांचा कडवा विरोध असल्याने हे डावपेच फसले. मात्र काँग्रेस सोडण्याचा निर्धार पक्का असल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क साधला.

एक महिन्यापूर्वी त्यांच्या ताब्यातील खामगाव बाजार समिती मधील काही संचालकानी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. यामुळे ते लवकरच हातात घड्याळ बांधणार हे स्पष्ट झाले. स्वतः सानंदा यांनी प्रसिद्धी माध्यमाशी बोलतांना यावर शिक्कामोर्तब केले. तसेच काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनाम्याच्या माहिती दिली.

मागील चार दशकांच्या राजकारणात सानंदा यांनी क्रियाशील सदस्य ते तीनवेळा आमदार अशी मजल मारली. मतदारसंघात कोणतेही नेतृत्व निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली. खामगाव मतदारसंघात काँग्रेस म्हणजे सानंदा असे समीकरण तयार झाले. गेली चार दशके ते काँग्रेसच्या कार्यात सक्रिय होते. पक्षनिष्ठा राखून त्यांनी संघटन बळकट करण्यासाठी तन-मन-धनाने योगदान दिले होते. पक्षानेही त्यांना विविध जबाबदाऱ्या देऊन गौरवले होते, असे त्यांनी आपल्या राजीनाम्यात नमूद केले आहे.

मात्र, गेल्या काही काळात पक्षातील अंतर्गत गटबाजी, दुर्लक्ष आणि अनुशासनहीनतेमुळे सानंदा नाराज होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी पक्षाच्या सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा दिला असून, तो तात्काळ स्वीकारावा, अशी विनंती त्यांनी आपल्या पत्रात केली आहे. राजीनामा दिला असून, त्यांनी अधिकृतपणे याची माहिती प्रसिद्धी माध्यमांना दिली. त्यांच्या पाठोपाठ खामगाव मतदारसंघातील अनेक काँग्रेस पदाधिकारी राजीनामा देणार असल्याचे समजते.

## अदानीला २१ एकर जागा देता यावी
# म्हणूनच अटी शिथिल

### वडेट्टीवार यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मुंबईतील धारावी प्रकल्पासाठी अदानी समूहाला मुंबईतील जमिनीची खैरात वाटण्यात येत आहे. धारावी पुनर्वसनाचे नाव पुढे करून मोक्याच्या जागा या उद्योग समूहाला देण्याचे काम सरकार करत आहे.

या मोक्याच्या ठिकाणी टॉवर उभे केले जाणार, पण धारावीकरांसाठी जमीन दिल्याचे सरकार सांगत आहे हे खोटे आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. हे सरकार अदानी उद्योग समूहासाठी महाराष्ट्राला उध्वस्त करत असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

कुर्ला येथील २१ एकर जागा ही अदानी उद्योगसमूहाला राज्य सरकारने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी अटी शर्ती देखील शिथिल केल्या आहेत. संपूर्ण मुंबईतील अनेक महत्वाचे भूखंड हे या समूहाला देण्यात आले आहेत. अजून किती जमीन यांना देणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्र आणि मुंबईचे अदानी समूहाला गहाण ठेवली आहे का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

देशात जनगणना होणार आहे, २०२७ पासून या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. यावेळी जातीनिहाय जनगणना देखील करण्यात येणार आहे. राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती, त्यानंतर सरकारने निर्णय घेतला आहे. आता सरकारने २०२७ मध्ये जनगणनेची प्रक्रिया सुरू करणार ही घोषणा केली आहे. निवडणुकीत ओबीसी समाजाची मत घ्यायची पण त्यांच्याकडे भाजप दुर्लक्ष करते. २०२९ निवडणुकीला समोर ठेवून जुमलेबाजी करू नये. जातीनिहाय जनगणना सरकारने याचवर्षी ती प्रक्रिया सुरू करावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

## नागपुरात नवविवाहितेची आत्महत्या

### लग्नाच्या ३५ दिवसानंतर तरुणीने संपवले जीवन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण अजूनही ताजे असताना नागपूरमध्येही अशीच हुंडाबळीची घटना घडली. बुटीबोरी परिसरात सासरच्यांकडून होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून एका नवविवाहितेने आत्महत्या केली. मयुरी ठाकरे डाहुले (वय २६) हिने राहत्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. अवघ्या ३५ दिवसांपूर्वी म्हणजेच २५ एप्रिल २०२५ रोजी तिचा विवाह अभिषेक डाहुले याच्याशी मोठ्या थाटामाटात पार पडला होता.

विवाहानंतर काहीच दिवसांत सासू कुसुम डाहुले, सासरे दीपक डाहुले आणि दीर आदित्य डाहुले यांनी सतत पैशांसाठी मयुरीवर दबाव टाकण्यास सुरुवात केली. नवरा अभिषेक डाहुले यानेही या छळाला पाठिंबा दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

शारीरिक आणि मानसिक छळामुळे मयुरी अत्यंत तणावात होती. काही दिवसांत परिस्थिती सुधारेल असे वाटल्याने तिने सुरुवातीला तिला होत असलेल्या त्रासाची माहिती वडिलांना दिली नव्हती. मात्र, छळ न थांबल्यामुळे तिने आपल्या वडिलांना सर्व प्रकार सांगितला. वडिलांनी मदतीचा हात पुढे करत गटाच्या भीशीतील २० हजार रुपये सासरच्या मंडळींना दिले, मात्र त्यानंतरही छळ थांबला नाही. छळाला कंटाळून मयुरीने गळफास घेऊन जीवन संपवले. मयुरीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अभिषेक डाहुले, सासू कुसुम डाहुले, सासरे दीपक डाहुले आणि दीर आदित्य डाहुले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

: सिनेरंग :

## अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांचा नवा घोटाळा!




लोकरंजन

मराठी प्रेक्षकांची मने जिंकणारी सुपरहिट फ्रँचायझी ये रे ये रे पैसा पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे. धमाल विनोद, कमाल कथा आणि एकाहून एक भन्नाट पात्रे घेऊन ये रे ये रे पैसा ३ येत्या १८ जुलै रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून यात अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांचा कूल अंदाज पाहायला मिळत आहे.

चित्रपटाच्या टीझरला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असतानाच आता या नवीन पोस्टरने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या फ्रँचायझीने नेहमीच प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले आहे. त्यामुळे यंदा हे मनोरंजन तिप्पट होणार हे नक्की.

ये रे ये रे पैसा ३ मध्ये कॉमेडीचा ट्रिपल धमाका असून एका नव्या मोठ्या गोंधळाची धमाल कहाणी उलगडणार आहे. यावेळी पाच कोटींचा आर्थिक घोटाळा आणि तो सुटवण्याच्या प्रयत्नात अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांच्यासोबत घडणाऱ्या भन्नाट घटना पाहणे रंजक ठरेल. या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे धर्मा प्रॉडक्शन्स प्रस्तुत अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, एव्हीएस पिक्चर्स आणि न्युक्लिअर ॲरो पिक्चर्स यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून वर्डविझार्ड एंटरटेनमेंट यांनी सहनिर्मिती केली आहे.

तसेच सुधीर कोलते, ओमप्रकाश भट्ट, नासीर शरीफ, ओंकार सुषमा माने, स्वाती खोपकर, निनाद नंदकुमार बत्तीन, गिरीधर गोपालकृष्ण धुमाळ हे निर्माते व सौरभ लालवाणी सहनिर्माते आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन संजय जाधव यांनी केले असून या चित्रपटात संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, उमेश कामत, तेजस्विनी पंडित, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्यासह आणखी काही कलाकार प्रेक्षकांना पाहायला मिळतील.

■ ■ ■



नवनवे प्रयोग, नव्या कल्पना मराठी चित्रपटसृष्टीत होत असतात. आता आगामी कप बशी या चित्रपटातून पूजा सावंत आणि ऋषी मनोहर ही नवी जोडी प्रेक्षकांसमोर येणार आहे. अत्यंत मजेशीर, मनोरंजक अशी कहाणी या चित्रपटातून उलगडणार असून सध्या मुंबई येथे या चित्रपटाचे चित्रिकरण सुरु आहे.

## 'कप बशी' या आगामी चित्रपटात दिसणार पूजा सावंत, ऋषी मनोहर ही फ्रेश जोडी

रुकप बशीर या चित्रपटाची निर्मिती सुकल्प चित्र या निर्मिती संस्थेच्या कल्पक सदानंद जोशी यांची असून निर्माता म्हणून हा त्यांचा पहिलाच चित्रपट असला, तरी त्यांचं चित्रपटसृष्टीशी असलेलं नातं जुनंच आहे.

त्यांचे वडील सदानंद जोशी यांनी १९९६ साली प्रदर्शित झालेल्या पुत्रवती या चित्रपटासाठी कथा, पटकथा, गीतलेखन आणि निर्मिती अशा सर्वच बाजूंवर काम केलं होतं. त्या चित्रपटानं राष्ट्रीय, राज्यस्तरीय १४ पुरस्कारांनी गौरवला गेला होता. त्यामुळे वडिलांचं प्रेरणादायी काम आणि त्यांचा कलात्मक वारसा आता कप बशी या चित्रपटातून ते पुढे आणत आहेत. वैभव चिंचाळकर हे टीव्ही मालिका, नाटक, मराठी चित्रपटातलं सुपरिचित नाव आहे. वैभव यांनी कन्यादान, नकुशी, शुभमंगल ऑनलाइन, पुढचं पाऊल अशा अनेक गाजलेल्या मालिका, पुष्पक विमान या चित्रपटाशी दिग्दर्शन केले होते.

पूजा सावंतनं अनेक मराठी, हिंदी चित्रपटांत उत्तम अभिनयाचं दर्शन घडवलं आहे. तर ऋषि मनोहरन टीव्ही मालिका, नाटक, चित्रपटांतून स्वतःला अभिनेता म्हणून सिद्ध केलं आहे. त्यामुळे या दोघांची फ्रेश जोडी मोठ्या पडद्यावर किती खुलून दिसते याचं कुतूहल आहे.

■ ■ ■

स्टार प्लस या वाहिनीवर प्रेक्षकांना नवा आस्वाद घेता येईल, असा एक नवा कार्यक्रम लवकरच सादर होणार आहे. प्रसिद्ध यू ट्यूबर आणि आपल्या पदार्थांनी घरगुती स्वयंपाकाच्या बाबतीत एक नवी हलचल निर्माण करणाऱ्या निशा मधुलिका स्टार प्लसद्वारे छोट्या पडद्यावर पदार्पण करत आहेत! त्यांचा लाघवी स्वभाव, वागण्या-बोलण्यातील नम्रता, सोप्या पाककृती आणि प्रेक्षकांना आपलेसे करण्याची त्यांची वृत्ती याकरता नावजलेल्या निशा मधुलिका यांना यू ट्यूबवर १ कोटी २० लाखांहून अधिक सदस्यांचा एक निष्ठावंत समुदाय निर्माण केला आहे.




## स्टार प्लसद्वारे छोट्या पडद्यावर निशा मधुलिका यांचे पदार्पण

शाकाहारी पाककृतींचा एकेक टप्पा निगुतीने आणि अत्यंत सोप्या पद्धतीने सांगण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे निशा मधुलिका आजच्या घडीला देशातील सर्वात आवडत्या पाककृती विशेषज्ञ बनल्या आहेत.

प्रामुख्याने, गृहिणी आणि खाद्यप्रेमींचा मोठा प्रतिसाद त्यांना लाभत आहे. आता त्यांची जादू छोट्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. स्टार प्लस वाहिनीवरील लोकप्रिय पात्रांसह स्टार प्लसच्या मालिकांमध्ये त्या आता सहभागी होत आहेत. तेव्हा दर सोमवारी संध्याकाळी ६:१५ वाजता फक्त स्टार प्लसवर निशा मधुलिका यांना तुमच्या दूरचित्रवाणीवर स्वयंपाक करताना पाहण्यासाठी सज्ज व्हा!

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१९६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## कृषी घोटाळ्याचे पुरावे एसीबीकडे सादर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधातील कथित कृषी घोटाळ्याचे पुरावे एसीबी अर्थात अँटी करप्शन ब्यूरोला दिले. तसेच या पुराव्यांमुळे आता धनंजय मुंडे वाचणार नाहीत असा ठाम दावाही केला.

त्यांच्या या दाव्यामुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय आणखी खोलात गेल्याचा दावा केला जात आहे. अंजली दमानिया यांनी काही महिन्यांपूर्वी तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यानंतर एसीबीने त्यांना या आरोपांचे पुरावे देण्याचे समन्स बजावला होता.

त्यानुसार, दमानिया यांनी बुधवारी अँटी करप्शन ब्यूरोच्या येथील कार्यालयाला भेट देऊन धनंजय मुंडे यांच्याविरोधातील पुरावे दाखल केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी योग्य कारवाई झाली तर धनंजय मुंडे वाचणार नाहीत असे अंजली दमानिया म्हणाल्या.

## राज्यमंत्र्यांना किरकोळ अधिकार
# थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :



अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ (अजित पवार गट) आणि त्याच खात्याचे राज्यमंत्री योगेश कदम (शिंदे गट) यांच्यातील संघर्ष वाढला आहे. कदम यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याविरुद्ध तक्रार केली आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे किरकोळ अधिकार देण्यात आल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे आणि तोंडी अधिकार स्वीकारण्यास नकारही दिला आहे.

महायुती सरकारच्या दोन मंत्र्यांमधील अंतर्गत संघर्षाची चर्चा सध्या संपूर्ण मंत्रालयात चर्चेचा विषय बनली आहे. एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राज्यमंत्र्यांना जे अधिकार देण्यात आले होते तेच अधिकार आताही सर्व राज्यमंत्र्यांना देण्यात यावेत, अशी विनंती कदम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना लेखी स्वरूपात केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

कदम यांच्याकडे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन विभागांची जबाबदारी आहे. गृहमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अवघ्या १० दिवसांत फडणवीसांनी त्यांना राज्यमंत्रिपदाचे अधिकार बहाल केले.

परंतु महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज आणि अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणाशी संबंधित राज्यमंत्र्यांना दिले जाणारे अधिकार त्यांना अद्याप देण्यात आलेले नाहीत. मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अन्न आणि औषध प्रशासन विभागाशी संबंधित अतिशय किरकोळ अधिकार दिले, असे त्यांचे म्हणणे आहे. हे प्रकरण तापण्याचे संकेत आहेत.

# झेपणार नव्हती तर आश्वासने लादली कशाला?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर बच्चू कडू यांनी सरकारविरोधी भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांविरोधात एक व्यंगचित्र तयार करून थेट सरकारला प्रश्न विचारले आहेत.

कर्जमाफीच्या मुद्द्यावरून बच्चू कडू यांनी सरकारला घेरण्याचे योजिले आहे. अजित पवार यांनी आपण कुठेही कर्जमाफीसंदर्भात बोललो नसल्याचे वक्तव्य केले आहे. यावर भाष्य करताना कडूंनी भाजप हा राष्ट्रवादीचा बाप असल्याचा टोला लगावला होता. तर पुढील महिन्यापासून त्यांनी आंदोलन छेडणार असल्याची घोषणा केली आहे.

बच्चू कडू यांच्या पक्षाकडून एक कार्टून व्हायरल केले जात आहे. ज्यामध्ये कडू यांनी मुख्यमंत्र्यांवर प्रहार केला आहे, तसेच निवडणुकीत दिलेल्या घोषणांवर प्रश्न केलेला आहे. हे कार्टून सर्वत्र चर्चेचा विषय ठरलेला आहे.

बच्चू कडू यांच्या कार्टूनमधून शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी देणार, ७२ हजार रोजगारांची कधी निर्मिती होणार, दिव्यांगला न्याय कधी मिळणार, शेतकऱ्यांचे प्रश्न कधी सुटणार, असे अनेक प्रश्न या व्यंगचित्राच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच झेपणार नव्हते तर खोटे आश्वासन दिले कशाला? असा प्रश्नही केला आहे. या कार्टूनला कडू सवाल असे नाव देण्यात आले आहे.

### ७ जुलैपासून मोझरी येथे आमरण उपोषण

अजित पवारांच्या घरासमोरील आंदोलनानंतर




बच्चू कडू पुढे टप्प्याटप्प्याने पंकजा मुंडे, बाळासाहेब पाटील आणि संजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन करणार आहेत. यात सर्वात शेवटी कर्जमाफीच्या मुद्द्यावर नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलनाची घोषणा त्यांनी केली आहे.

कर्जमाफीच्या मुद्द्यावर ७ जुलैपासून तुकडोजी महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी किंवा आपले जन्मगाव असलेल्या कुरळपूर्णा येथे आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
शुक्रवार, दि. ६, जुन २०२५

# १६ आरोपीकडून पिस्तूलसह जिवंत काडतूस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

पिस्तूलचा वापर करण्यापूर्वीच गिट्टीखदान पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या. प्रजत पंचारिया (२३) रा. सुयोगनगर, नारी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून पिस्तूलसह एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.

प्रजत हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. शांतीनगर ठाण्यात त्याच्याविरुद्ध खुनाच्या गुन्ह्याची नोंद आहे. त्याचा मित्र सोहेल गुन्हेगारी प्रवृत्तीचा होता. त्याच्याकडे एक पिस्तूल होते. पोलिस वारंवार त्याच्या घरी जायचे. एखादे वेळी पोलिस त्याच्या घरून पिस्तूल जप्त करतील, अशी भीती सोहेलला होती.

त्यामुळे फेब्रुवारी महिन्यात त्याने प्रजतकडे पिस्तूल ठेवायला दिली. त्याच्याकडे पिस्तूल सुरक्षित राहील, असा सोहेलला विश्वास होता. दरम्यान एप्रिल महिन्यात सोहेलची भररस्त्यात हत्या झाली. हत्येच्या तपासादरम्यान पिस्तूल असल्याची कुणकुण पोलिसांना लागली. त्यादिशेने गिट्टीखदान पोलिसांनी तपास केला.

प्रजतकडे पिस्तूल असल्याची खात्रीलायक माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास देशमाने यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकाला कामी लावले. मंगळवार, ३ जूनच्या रात्री प्रजत फुटाळा परिसरात फिरायला गेला होता. गस्तीवर असलेल्या पोलिस पथकाने दुचाकीच्या डिक्कीची तपासणी केली असता त्यात पिस्तूलसह जिवंत आढळले. पोलिसांनी त्याला ठाण्यात नेऊन सखोल चौकशी केली. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक चेतन बोरखेडे, पोहवा बलजित ठाकूर, अजय यादव, विलास चव्हाण, नागनाथ कोकरे व आकाश लोथे यांनी केली.

## पर्यावरणपूरक व सर्वसमावेशक नियोजनावर भर द्या
# विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

विधानभवन विस्तारीकरण करताना पर्यावरणपूरक व सर्वसमावेशक नियोजनावर आपला भर आहे. याद्दष्टीने विधानभवन विस्तारीकरणासंदर्भात येत्या २५ जून रोजी मुंबईत बैठक आयोजित करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आज येथे दिले.

विधानभवन नागपूर येथील विस्तारांतर्गत इमारतीचे बांधकाम व जमिनीच्या अधीग्रहणासंदर्भात त्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा येथील विधानभवनात घेण्यात आला. या आढावा बैठकीला महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे, मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांच्यासह संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते.

विधिमंडळाची हेरिटेज इमारत कायम ठेवून हेरिटेज वास्तूव्यतिरिक्त उपलब्ध जागेच्या प्रस्तावित बांधकामाची माहिती सादर करण्यात यावी. विधिमंडळ परिसरात प्रस्तावित बांधकाम करताना पुरेशा प्रमाणात झाडे लावून पर्यावरणपूरक करण्यावर भर देण्यात यावा. रस्ते मोठे व प्रशस्त असावेत. मुंबईतील पावसाळी अधिवेशनापूर्वी २५ जून रोजी मुंबईत बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत सर्व माहिती सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी यावेळी दिले.



* विधानभवन विस्तारीकरण कामांचा घेतला आढावा
* मुंबईत २५ जून रोजी होणार पुढील बैठक

राजस्थान विधिमंडळात संग्रहालय उभारण्यात आले आहेत. याच धर्तीवर नागपूर विधिमंडळ परिसरात संग्रहालय उभारण्यात येऊ शकते का याची पडताळणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. याचबरोबर एफएसआय, पुरातत्व विभागाच्या परवानग्या यांचीही माहिती सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बैठकीत दिले. बैठकीनंतर विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आज विधिमंडळाची दोन्ही सभागृहे, मंत्रिदालनांसह विधिमंडळ परिसराची पाहणी करीत आवश्यक सूचना संबंधितांना दिल्या.

# तंत्रकुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी
## आयटीआयच्या अद्यावतीकरणाचे धोरण महत्त्वाचे : मंगल प्रभात लोढा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत तंत्रकुशल युवा मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. ज्या गतीने औद्योगिकीकरणाच्या गरजा बदलत आहेत. नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. सौरऊर्जेपासून इलेक्ट्रीक वाहनापर्यंत उत्पादने वाढली आहेत. यासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्याद्दष्टीने महाराष्ट्र शासनाने नुकतेच धोरण जाहीर केले असून यात कंपन्यांच्या सहभागातून त्यांना गरजेनुरूप कौशल्य असलेली युवा पिढी घडविता येईल, असा विश्वास राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला.

सार्वजनिक - खाजगी भागिदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अद्यावतीकरणाबाबत सिव्हील लाईन्स येथील चिटणविस पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादात ते बोलत होते. यावेळी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापिठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर, ॲडव्हांटेज विदर्भचे प्रेसिडेंट आशिष काळे, सहसंचालक योगेश पाटील, निखिल मुंडले, मीत्राचे समन्वयक विनयकुमार सोटे व विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



राज्यात महाराष्ट्र शासनाचे जवळपास 418 औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आहेत. याचबरोबर खाजगी क्षेत्रातील सहाशे औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या संस्थांमार्फत दिले जाणारे प्रशिक्षण हे औद्योगिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधीप्रमाणे, गरजेप्रमाणे करावे लागेल ही वस्तुस्थिती आहे. ज्या काही त्रुटी आहेत त्या शासनाने समजून घेतल्या असून त्यावर मात करण्यासाठी आम्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे खाजगी भागेदारीद्वारे अद्यावतीकरणाचे धोरण स्विकारले आहे. या धोरणाप्रमाणे आम्ही खाजगी उद्योग क्षेत्रांसोबत काम करण्यास उत्सुक असून कंपन्यांनी विश्वासाने पुढे यावे, असे आवाहन मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

आपल्या आयटीआय संस्थांचे जागतिकदर्जाच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये रुपांतर करण्याचा उद्देश आपण या धोरणापाठीमागे निश्चित केला आहे. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय, शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी या विभागाच्या सहभागातून सदर धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रयत्नातून विदर्भात मोठ्या प्रमाणात नविन उद्योग येत आहेत. मोठी गुंतवणूक उद्योजक विदर्भात करत आहे. यातून साकारणाऱ्या उद्योग क्षेत्राला अपेक्षित असणारे तंत्रकुशल मनुष्यबळ शासनाच्या या नव्या धोरणातून निर्माण होईल अशी अपेक्षा ॲडव्हांटेज विदर्भचे चेअरमन किरण काळे यांनी व्यक्त केली.

मानवी कौशल्याची गुंतवणूक ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. सर्वांनी एकत्र येवून आपण प्रयत्न केले तर कुशल मनुष्यबळाचा प्रश्न तात्काळ मार्गी लागेल असे कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर यांनी सांगितले. या कार्यक्रमात विदभार्तील उद्योजकांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्याशी संवाद साधला.

## अज्ञात चोरट्यांनी चोरले दुचाकी वाहन

■ महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. ५ :

सिद्धार्थ नगर येथील रोहीत राजेश पाटील यांनी घरासमोर दुचाकी वाहन ठेवले होते. ४ जुन बुधवार ला पहाटे पर्यंत हे वाहन घरासमोर होते. पाच वाजताच्या सुमारास प्रकाश राजेश पाटील पहाटे पाच वाजता उठला असता त्याला घरासमोर दुचाकी गाडी दिसली नाही वाहनाची इतरत्र शोधाशोधा केली असता वाहन दिसून आले नाही. याबाबत भिवापूर पोलिस स्टेशनला तक्रार देण्यात आली. सिद्धार्थ नगर येथिल रहिवासी असलेले रोहीत राजेश पाटील यांनी स्प्लेंडर वाहन क्रमांक MH 40 CF 5076 हे वाहन घरासमोर रात्री घरासमोर उभे केले होते. मात्र पहाटे पाच वाजताच्या सुमारास येथे वाहन आढळून आले. नाही या वाहनाची इतरत्र शोधा शोध केली दिसून आले नाही.

# शाळेतील टॉपर विद्यार्थ्यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

इकोफ्यूजन फाउंडेशन आणि डिफेन्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील टॉपर दहा विद्यार्थ्यांना शिक्षक आणि मुख्याध्यापकांसह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

इकोफ्यूजन फाउंडेशन आणि डिफेन्स अकॅडमी यांच्या संस्थापक भुम्रा पठाण यांनी शैक्षणिक महत्त्व आणि पर्यावरणाच्या संरक्षणाची गरज यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, प्रत्येकाने दरवर्षी "एक झाड अवश्य लावा" ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले आणि विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच पर्यावरण रक्षणाची जाणीव असावी. या उद्देशासाठी शाळांमध्ये नियमितपणे जनजागृती मोहिमा राबविल्या पाहिजेत. सत्कार करण्यात आलेल्याना विद्यार्थ्यांना विविध फळाचे रोपटे, बॅग आणि प्रमाणपत्र देऊन



गौरविण्यात आले.

त्याचबरोबर नागपूरमधील सर्वोत्तम प्रशिक्षकांचा सत्कार केला विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण देऊन तयार केले आहे. यापैकी अनेक जण आज भारतीय सैन्यात अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सांगितले की डिफेन्स अकॅडमी विद्यार्थी संरक्षण सेवेसाठी तयार करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.

माजी सेवानिवृत्त मुख्य शिक्षण अधिकारी अशोक इंगळे, यांनी देखील विद्यार्थ्यांना संबोधित केले. त्यांनी आपले अनुभव शेअर केले आणि विद्यार्थ्यांना शिस्त आणि समर्पणाने आपले ध्येय गाठण्याची प्रेरणा दिली. कार्यक्रमाच्या शेवटी डिफेन्स अकॅडमी च्या सेंटर प्रमुख दीप्ती वकाडे यांनी सर्व पाहुण्यांचे मनापासून स्वागत केले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या ताहेर आणि अर्जु यांचे आभार मानले. त्यावेळी अपेक्षा, संजीदा, शीतल डोणे, अजहर शेख, विजय वासनिक सर, शादिक शेख या कार्यक्रमाच्या यशात सहभाग दिला.

## ट्रकमधून १०० किलो गांजा जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

कळमना पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर एका ट्रकमधून १०० किलो गांजा जप्त केला. शहरातील एका मोठ्या गांजा विक्रेत्याने मोठ्या प्रमाणात शहरात गांजा बोलावला असून माल ट्रकने नागपुरात येणार असल्याची माहिती कळमना पोलिसांना मिळाली होती. त्या आधारावर पोलिसांनी परिसरात सापळा रचला. ट्रक अडवून झडती घेतली असता एका प्लॅस्टिकच्या पोत्यात १०० किलो गांजा मिळाला. पोलिसांनी ट्रक चालकासह स्थानिक गांजा विक्रेत्याला अटक केली.

## फसवणुकीच्या पीडितावरही गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

क्रेडिट कार्डवर 3 टक्के कमिशनचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांनी फसवणूक करणारे सचिन हरीश शंभूवानी रा. सिंधी कॉलनी, खामला आणि मयूर सुरेश निमजे रा. पार्वतीनगर, रामेश्वरी हे तुरुंगाची हवा खाल्यानंतर आता बाहेर फिरत आहेत, मात्र पीडितांना अद्याप एकही रुपया परत मिळालेला नाही. दरम्यान त्यांच्या फसवणुकीला बळी पडलेल्या एका तरुणाविरुद्ध आता शांतीनगर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. कारण त्याच्याच माध्यमातून एका पीडिताने त्याचे क्रेडिट कार्ड आरोपी सचिन आणि मयूरला दिले होते. सचिन रमेश गिरी (32) रा. रामसुमेर बाबानगर असे तक्रारकर्त्याचे तर विशाल धामेचा (29) रा. खामला असे आरोपीचे नाव आहे.

आरोपी विशाल हा सुद्धा सचिन शंभूवानी आणि मयूर निमजेच्या फसवणुकीला बळी पडला आहे, मात्र सचिन गिरीची ओळख त्यानेच शंभूवानी याच्याशी करून दिली होती. ऑक्टोबर 2023 मध्ये सचिनची ओळख विशालशी झाली. विशालने सांगितले की, शंभूवानी लोकांकडून त्यांचे क्रेडिट कार्ड भाड्याने घेतो. त्या माध्यमातून तो लॅपटॉप, मोबाईल फोन व इतर ईलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करतो. त्याला खूपच कमी दरात ईलेक्ट्रॉनिक वस्तू मिळतात. त्या वस्तू तो बाजारात विकून नफा कमावतो. दर महिन्याला होणाऱ्या ट्रांजेक्शनवर तो 3 ते 5 टक्के कमिशन देतो. नफ्याच्या आमिषाला बळी पडून सचिनने सुद्धा त्याचे क्रेडिट कार्ड आरोपींना दिले. काही नातेवाईकांचेही कार्ड विशालच्या माध्यमातून शंभूवानी आणि मयूरपर्यंत पोहोचले. सुरूवातीला कमिशनही मिळाले. नंतर आरोपींनी त्यांच्या क्रेडिट कार्डमधून 10.37 लाख रुपयांचे ट्रांजेक्शन केले. मात्र यावेळी ना कमिशन मिळाले आणि ना क्रेडिट कार्डचे बिल भरण्यात आले.

सचिनने विशालच्या म्हणण्यावरून शंभूवानी आणि मयूरला कार्ड दिले होते. त्यामुळे त्याने विशालविरुद्ध शांतीनगर ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी विशालविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्वतः विशालही शंभूवानी आणि निमजेच्या फसवणुकीला बळी पडला आहे. त्याचे 33 लाख रुपये दोघांनी बुडवले आहेत. विशालने कमिशनच्या नादात इतरही लोकांकडून त्यांचे क्रेडिट कार्ड घेत आरोपींना दिले.

आता ते लोक विशालला आपले पैसे परत मागत आहेत. शंभूवानी आणि निमजे यांनी खामला परिसरात राहणाऱ्या विशालसह अनेकांची फसवणूक केली आहे. त्यांच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड प्राप्त केले. आता लोक मध्यमस्थांना पैशांची मागणी केली आहे.

# नागपूर येथील सहकार भवन बांधणीचा प्रस्ताव तातडीने सादर करा : डॉ.पंकज भोयर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

नागपूर येथे भव्य सहकार भवन उभारण्याचा प्रस्ताव तातडीने शासनास सादर करावा. सुंदर आणि प्रशस्त इमारत असेल अशा पद्धतीचा आराखडा तयार करावा, अशा सूचना सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिल्या.

मंत्रालयात नागपूर येथे सहकार भवन उभारण्याबाबत बैठक झाली. यावेळी सहकार आयुक्त दीपक तावरे, सहकार विभागाचे उपसचिव अंकुश शिंगाडे, नागपूर विभागीय उपनिबंधक दिनेश चंदेल, सार्वजनिक बांधकाम



विभागाचे उपविभागीय अभियंता अविनाश गुव्हाने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, नागपूर येथील गणेश पेठमधील भूविकास बँकेच्या जागेवर सहकार भवन उभारण्यात यावे. या इमारतीचा आराखडा तयार करताना इमारतीची देखभाल दुरुस्ती लक्षात घ्यावी. तसेच पुणे, छत्रपती संभाजीनगर येथील सहकार भवनच्या आराखड्याचा अभ्यास करून सर्वंकष असा आराखडा तयार करावा. या विषयी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) चा पूर्ण वापर करावा. सध्या या ठिकाणी असलेल्या भूविकास बँकेच्या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्ट्रक्चरल ऑडिट तातडीने करुन घ्यावे, अशा सूचनाही राज्यमंत्री भोयर यांनी दिल्या.

## समाजात ज्ञानाचा वृक्ष लावणाऱ्या शिक्षकांना पगार दया
# निषाद पार्टी महिला मोर्चाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

जागतिक पर्यावरण दिनी प्रत्यक समाजात ज्ञानाचा वृक्ष लावणाऱ्या शिक्षकांना मागील चार महीन्या पासून काही स्तर सोडले तर नियमित पगार मिळाले नाही. विशेष करून नागपूर विभागात प्रत्यक अधिकारी शासन च्या धरपकडी मुळे घाबरला आहे. भीती एवढी आहे की साफ सूत्री छबि असणाऱ्या शिक्षकांचे पगार बिल चार चार महिन्या पासून अजून पास झाले नाही.ज्या प्रकारे वृक्षाला दोन दिवस पाणी मिळाले नाही तर तो सुखतो तसेच आज चार महिन्या पासून पगार न मिळनाऱ्या शिक्षकांचे हाल झाले आहे. एक एक रुपया करिता शिक्षकांना तरसावं लागत आहे. निषाद पार्टी महिला मोर्चा नागपूर च्या उपाध्यक्षा सीमा गौर नी सांगितले की आज शिक्षण क्षेत्रात शिकला सवरलेला समझदार कोणताही व्यक्ती नौकरी करायला तैयार नाही कारण या क्षेत्रात शोषण तसेच भरपूर अडचणी आहे. वर्षोवर्षापासून हजारो शिक्षक सरकारी अनुदाना करिता तरसत आहे.हजारों शिक्षक आर्थिक तंगी मुळे आत्महत्या करुण चुकले आहे परंतु आजपर्यंत कोणतीही सरकार शिक्षकांना योग्य न्याय देऊ सकली नाही परंतु एकनाथ शिंदे यांच्या कार्यास पाहता शिक्षक त्यांच्या कडे आशेने पाहत आहे.

# संघ जीवनचे
## सरसंघचालकांच्या हस्ते प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ५ :

संघ जीवन-भाग 1 व 2 या दोन महत्त्वपूर्ण ग्रंथांचे प्रकाशन रा.स्व.संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते शुक्रवारी 6 जूनला सायंकाळी 6 वाजता गांधीसागरावरील शिक्षक सहकारी बँक सभागृहात होणार आहे.या दोन्ही ग्रंथांचे लेखन ज्येष्ठ संघ स्वयंसेवक रामचंद्र देवतारे यांनी गेल्या अनेक वर्षांच्या अथक परिश्रमातून केले आहे.

तब्बल 800 पानी या दोन्ही खंडांमधून नागपूर जिल्ह्यातील संघ कायार्चा इतिहास व त्यात कार्यरत ग्रामीण कार्यकर्त्यांचे योगदान साक्षेप आणि कृतज्ञतेने मांडले गेले आहे.

संघ जीवन- भाग 1 मध्ये नागपूर जिल्ह्यातील संघ कार्याचा तपशीलवार इतिहास दिला असून, भाग 2मध्ये हे कार्य गावोगावी पोहोचवण्यात योगदान दिलेल्या दिवंगत कार्यकर्त्यांच्या कार्याची कृतज्ञ आठवण दिली आहे.लेखक देवतारे मास्तर यांचे हे लेखन केवळ माहितीपूर्ण नाही, तर संघकायार्तील ग्रामीण कार्यकर्त्यांचे अमोल योगदान टिपणाड्या दस्तऐवजीकरणाचे स्वरूप आहे.

गेल्या वर्षांहून अधिक काळापासून ग्रामीण भागात संघ कार्य रुजवण्याच्या कार्यात ते सक्रिय असून त्यांचे हे लेखन त्यांच्याच अनुभवांचे संचित आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन देवतारे परिवारातर्फे भानुप्रताप देवतारे यांनी केले आहे.

# विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या : राजेंद्र पवार

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ५ :

"वीज अदृश्य असली तरी तिचे दुर्लक्ष कधीही क्षम्य नसते. विद्युत अपघातात कर्मचाऱ्याचा किंवा कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा अकाली मृत्यू झाल्यास, त्यांच्या केवळ वर्तमानाचेच नव्हे, तर पुढील तीन पिढ्यांचे कधीही भरून न येणारे, अपरिमित नुकसान होते. हे भयावह वास्तव लक्षात घेऊन, महावितरणचे प्रत्येक कर्मचारी तसेच राज्यातील प्रत्येक नागरिकाने विद्युत सुरक्षेबाबत सदैव सतर्क राहावे आणि सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे," असे कळकळीचे आवाहन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी आज केले.

महावितरणच्या गौरवशाली 20 व्या वर्धापनदिनानिमित्त सध्या राज्यभरात सुरू असलेल्या 'विद्युत सुरक्षा सप्ताहा'चा एक महत्त्वाचा भाग म्हणून, गुरुवारी (दि. 5) प्रकाशभवन, गड्डीगोदाम, नागपूर येथे 'बाईक रॅली फॉर इलेक्ट्रिकल सेफ्टी' चे दिमाखदार उद्घाटन राजेंद्र पवार यांच्या



हस्ते संपन्न झाले. यावेळी ते उपस्थितांना संबोधित करत होते. याप्रसंगी संचालक (ग्राहक व्यवहार) ॲड. गौरी चंद्रायण, नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके, नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे, सिव्हील लाईन्स विभागाचे कार्यकारी अभियंता धम्मदिप फुलझेले यांच्यासह महावितरणचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनजागृतीच्या या अभिनव उपक्रमात सहभागी होण्यासाठी उपस्थित कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. या बाईक रॅलीत तब्बल 300 अधिकारी व कर्मचारी हातात विद्युत सुरक्षेचे घोषणा फलक घेत सहभागी झाले होते. यावेळी ॲड. गौरी चंद्रायण, आणि दिलीप दोडके यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संचालक राजेंद्र पवार यांनी यावेळी माहिती दिली की, महावितरणचे दूरदृष्टीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी संपूर्ण राज्यभरात विद्युत सुरक्षेची व्यापक जनजागरण मोहीम सुरू करण्याची सूचना केली आहे. त्यांच्याच दूरदृष्टीच्या मार्गदर्शनाखाली 'शून्य विद्युत अपघाता'चे महत्त्वाकांक्षी ध्येय निश्चित करून, विद्युत सुरक्षा सप्ताहात विविध माहितीपर व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अत्यंत धकाधकीच्या आणि संवेदनशील सेवा क्षेत्रात कार्यरत असताना, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी विद्युत सुरक्षेच्या नियमांचे तंतोतंत पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत विद्युत अपघाताचा धोका निर्माण होणार नाही याची काटेकोरपणे काळजी घ्यावी, असे श्री. पवार यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर, त्यांनी नागरिकांना वीजसाक्षर करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यासाठी सातत्याने स्थानिक पातळीवर विविध उपक्रम राबवून नागरिकांशी थेट संवाद साधण्याचे आणि त्यांना विजेच्या सुरक्षित वापराबाबत शिक्षित करण्याचे आवाहनही संचालक राजेंद्र पवार यांनी केले.

वसुंधरा दिनानिमित्त ठिकठिकाणी वृक्षारोपण आणि व्यापक जनजागृती रॅली या सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून, राजेंद्र पवार, ॲड. गौरी चंद्रायण, दिलीप दोडके, अमित परांजपे आणि धम्मदिप फुलझेले यांच्या हस्ते प्रकाशभवन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचे संवर्धन आणि विजेचा सुरक्षित वापर या दोन्ही महत्त्वाच्या संदेशांचा समन्वय साधण्यात आला.

केवळ सिव्हिल लाईन्स विभागापुरती मर्यादित न राहता, महावितरणच्या नागपूर परिमंडलांतर्गत असलेल्या नागपूर व वर्धा जिल्ह्यातील काँग्रेस नगर, महाल, गांधीबाग, बुटीबोरी, मौदा, सावनेर, उमरेड, काटोल, वर्धा, आर्वी आणि हिंगणघाट या सर्व विभागांमध्ये देखील विद्युत सुरक्षा रॅलीच्या माध्यमातून वीज सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. वसुंधरा दिनानिमित्त ठिकठिकाणी वृक्षारोपण करून लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचा सामूहिक निर्धार यावेळी करण्यात आला. या उपक्रमांमुळे विद्युत सुरक्षा आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला.

# आश्रमशाळा शिक्षकांना एकस्तर पदोन्नती योजना सुरू

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या पाठपुराव्याला यश

■ **महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. ५ :** राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या अनुदानित विजाभज आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता सुरू करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधीद्वारे मागणी केली होती. अखेर शासनाने दखल घेऊन सदर मागणी मंजूर करून त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक ४ जून २०२५ रोजी निर्गमित केला त्यामुळे राज्यातील अनुदानित विजाभज आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



आदिवासी नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या विजाभज आश्रमशाळा कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती ही योजना सामाजिक न्याय विभागाचा शासननिर्णय ३ डिसेंबर २००७ नुसार सुरू केली. मात्र दिनांक १३ मार्च २०२० ला विभागाने शासननिर्णय काढून हे कर्मचारी या लाभास पात्र नाही म्हणून ही योजना बंद करून घेतलेल्या लाभाची वसूली करण्याचे आदेश दिले. या आदेशाविरोधात राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी संताप व्यक्त करत या आदेशाविरोधात उच्च न्यायालय नागपुर/औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केल्या.

याचिकेचा निर्णय कर्मचाऱ्यांच्या बाजूने देऊन विभागीय अधिकाऱ्यांनी सहा महिन्याच्या आत निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना लाभ देण्याचे निर्देशित केले. मात्र, दोन वर्षाचा कालावधी होऊनही शासन आपणास हे लाभ मंजुर करत नाही हे लक्षात आल्यावर व्यथित होऊन शिक्षक संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार सुधाकर अडबाले यांची भेट घेऊन न्याय मिळवून देण्याची मागणी केली.

जिल्हा स्तरापासून तर मंत्रालय स्तरापर्यंत याबाबत पाठपुरावा केला. मात्र, या विभागाचा अनागोंदी कारभार लक्षात आल्यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबत लक्षवेधी लावली. विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी सकारात्मक उत्तर देऊन अधिकाऱ्यांना तात्काळ आदेश निर्गमित करण्याच्या सूचना दिल्या. अखेर शासननिर्णय निर्गमित करून आदिवासी नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या सर्व पात्र विजाभज आश्रमशाळा कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नतीचे लाभ मंजूर करण्यात आले. त्यामुळे आश्रमशाळा कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

# ब्रह्मकुमारी राजयोगिनी डॉ. दामिनी अहमदाबादहून पहिल्यांदाच नागपुरात

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ५ :** प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करत आहे. या निमित्ताने बी.के. राजयोगिनी डॉ. दामिनी दीदी पहिल्यांदाच नागपूर संत्रा नगरीत येत आहेत. डॉ. ब्रह्मकुमारी राजयोगिनी दामिनी दीदी गेल्या पंचवीस वर्षांपासून अहमदाबाद, गुजरात येथून ब्रह्मकुमारी विद्यापीठात सेवा देत आहेत. राजयोग शिक्षिका असण्याव्यतिरिक्त, त्या एक चांगल्या गायिका, गीतकार, संगीतकार, फिजिओथेरपिस्ट, संगीत उपचारक देखील आहेत. त्यांनी बॉलीवूडमधील दिग्गज गायक उदित नारायण, सुरेश वाडकर यांच्यासोबत अनेक आध्यात्मिक गाणी गायली आहेत आणि स्वतःच्या गाण्यांचे अल्बम देखील बनवले आहेत. त्यांनी गुजराती, हिंदी, तेलुगू, इंग्रजी, मल्याळम, भोजपुरी गाणी देखील गायली आहेत. त्यांच्या अनेक गाण्यांचे अल्बम अवेकनिंग आणि पीस ऑफ माइंड चॅनेलवर प्रसारित होत राहतात. आजचे पालक आपल्या मुलांचे संगोपन करण्याबाबत अधिक जागरूक आणि जागरूक झाले आहेत. आता त्यांनी मुलांच्या मानसिक



आरोग्याला पूर्वीपेक्षा जास्त महत्त्व देण्यास सुरुवात केली आहे. मुलांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या छंदांना आणि प्रतिभेलाही प्रोत्साहन दिले जाते. तथापि, तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे पालकत्वातही बदल झाला आहे. या उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर, २२ जून रोजी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत ब्रह्मकुमारीज वसंतनगर कॅम्पसमध्ये एक कार्यक्रम आयोजित केला जाईल. बीके दामिनी दीदी यांनी सेवा केंद्रात 'सुंदर बंधनासाठी पालकत्वाची साधने' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. हा कार्यक्रम खास पालकांसाठी आहे. आज तुमच्यातील शक्ती ओळखण्याची, तुमच्या स्वप्नांना पंख देण्याची आणि राष्ट्र उभारणीच्या दिशेने तरुणांना पुढे नेण्याची वेळ आली आहे. या संदर्भात, दुसऱ्या दिवशी, २३ जून रोजी संध्याकाळी ६ वा. 'युवा भविष्य सजवा' या विषयावर तरुणांसाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम वसंत नगर येथील सेवा केंद्रात देखील होणार आहे. या कार्यक्रमात, ज्यांचे वय १६ ते ३० वर्षे आहे त्यांना प्राधान्य दिले जाईल. ब्रह्मकुमारीज नागपूर विभागाच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्मकुमारी रजनी दीदी यांनी जास्तीत जास्त तरुणांना आणि पालकांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. या दोन्ही कार्यक्रमांसाठी नोंदणी मोफत आहे पण अनिवार्य आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ऑनलाइन नोंदणीची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी ९९६०३८५०३८ या फोन नंबरवर संपर्क साधता येईल. आध्यात्मिक योद्धा ब्रह्मकुमारींच्या पहिल्या मुख्य प्रशासक आई जगदंबा सरस्वती यांच्या पुण्यतिथीनिमित्त, २४ जून रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत सुरेश भट सभागृह, रेशमबाग, नागपूर येथे 'शौर्य सुरो मे रंगा.... दिल में प्यारा तिरंगा' या देशभक्तीपर प्रेरणादायी गीतांसह एक संगीतमय संध्याकाळ आयोजित करण्यात आली आहे. याचाही सर्वांना लाभ घेता येईल. असे आव्हान ब्रह्माकुमारी संचालिका रजनीदीदी संचालिका-ब्रह्माकुमारीजब, नागपूर यांनी केले आहे.

# भगवान बुद्धांच्या जीवनावर भिक्खू लामा यांचे मार्गदर्शन

**कन्हान :** सत्रापुर येथील पंचशील बुद्ध विहारात के. सी. एस. लामा ट्रस्टच्या वतीने २ जून रोजी सायंकाळी ५ वाजता धम्मदेशनेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात रमाई बुद्ध विहार, पंचशील नगर येथे त्रिशरण आणि पंचशील घेऊन करण्यात आली. धम्मदेशनेत भदंत आर्य के. सी. एस. लामा यांनी भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवनावरील विचार मांडले. बुद्धांच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाणापर्यंतच्या घटनांचा आढावा घेत त्यांचे मानवी जीवनातील योगदान विशद केले. त्याग, करुणा, मैत्री, समता आणि अहिंसा यांसारख्या मूलभूत मानवी मूल्यांवर आधारित आर्य अष्टांगिक मार्ग स्पष्ट करण्यात आला. भिक्खू लामांनी उपस्थित उपासक-उपासिकांना गौतम बुद्धांच्या शिकवणी आत्मसात करण्याचे आवाहन केले. धम्म ही केवळ धार्मिक प्रणाली नसून मानवी जीवनाला दिशा देणारी अमूल्य शिकवण आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात सत्रापुर परिसरातील अनेक उपासकांनी सहभाग घेतला. या धम्मदेशनेचे आयोजन के. सी. एस. लामा ट्रस्ट व पंचशील बुद्ध विहार यांनी संयुक्तरित्या केले होते.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

**वाडी :** येथील खडगाव मार्गावरील शिवतीर्थ छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात ,हिंदू साम्राज्य दिन उत्सव समिती तर्फे अखंड हिंदुस्थानाचे आराध्य, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त सोमवार ९ जून रोजी हिंदू साम्राज्य दिन उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात रविवार ८ जून रोजी सायंकाळी सायंकाळी ७ वाजता गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ८ वाजता प्रसिद्ध वक्ते लक्ष्मीकांत कारींगवार यांचे जाहीर व्याख्यान होणार आहे. सोमवार ९ जून रोजी सकाळी ५.३० वाजता जलाभिषेक व दुग्धाभिषेक आणि सकाळी ६.०० वाजता शिवस्तुती व पुजन पार पडणार आहे. कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वाडी नगर, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, वाडी, तसेच दैनंदिन नित्यपुजन समिती यांचे सहकार्य लाभले आहे. सदर कार्यक्रमास सर्व शिवप्रेमींनी उपस्थित राहून शिवराज्याभिषेक दिनाचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभागात पर्यावरण जागरुकता कार्यक्रम

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ५ :** ५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आपली भूमिका जबाबदारीने बजावण्यासाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक -श्री दीपक कुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे पर्यावरण संरक्षण जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भारतीय रेल्वे पर्यावरण संरक्षणातही महत्त्वाची भूमिका बजावते. पर्यावरण संवर्धनाच्या उपाययोजनांना प्रोत्साहन दिले जाते. या वर्षी पर्यावरण दिन जमीन पुनर्संचयित करण्याच्या मुद्द्यांना समर्पित आहे, वाळवंटीकरणाशी लढणे आणि दुष्काळाची जबाबदारी निर्माण करणे या थीम अंतर्गत हा दिवस साजरा केला जात आहे.

यानिमित्ताने, आज ५ जून रोजी नागपूर विभागातील विविध रेल्वे स्थानके आणि रेल्वे परिसरात पोस्टर्स आणि बॅनर वाटण्यात आले. रेल्वे प्रवाशांना पर्यावरण जागरूकतेचा संदेश देऊन आणि प्रदर्शित करून पर्यावरणाबद्दल जागरूक करण्यासाठी सर्वतोपरी



प्रयत्न केले जातात. सर्व शक्य प्रयत्न केले गेले. या दरम्यान रेल्वे स्काउट अँड गाईडच्या स्वयंसेवकांनी धरती करेल पुकार या थीमवर पथनाट्य आयोजित केले.

एक नाट्य सादर करण्यात आले. स्थानकांवर घोषणा देऊन प्रवाशांना एकदा वापरता येणाऱ्या प्लास्टिकवर बहिष्कार घालण्याचे आवाहन करण्यात आले. संदेश देण्यात आला. रेल्वे स्थानके, रेल्वे परिसर आणि गाड्यांमध्ये स्वच्छता आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यावर भर देण्यात आला.

संवर्धन जागरूकतेचा संदेश देण्यात आला. स्थानकांवर ओल्या आणि सुक्या कचऱ्यासाठी स्वतंत्र कचराकुंड्या निश्चित करण्यात आल्या. परिसर/प्लॅटफॉर्म, गाड्या आणि रेल्वे ट्रॅक घाणीपासून मुक्त ठेवणे आणि पर्यावरण स्वच्छ ठेवणे आणि हरित विकासाला प्रोत्साहन देणे विभागातून जाणाऱ्या रेल्वेला प्रोत्साहन देण्यासाठी आग्नेय मध्य रेल्वेकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

१००% जैव-शौचालयेही सर्व गाड्यांचा एक महत्त्वाचा भाग आहेत. स्वच्छ रेल्वे -स्वच्छ पर्यावरणासाठी आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभागाने नेहमीच आघाडीची भूमिका बजावली आहे. त्याच क्रमाने, नागपूर विभागातील विभागीय अधिकारी, रेल्वे खेळाडू, रेल्वे कर्मचारी आणि रेल्वे स्काउट आणि गाईड स्वयंसेवकांनी सहभाग घेतला आणि पर्यावरण वाचवण्यासाठी रेल्वे परिसरातील रहिवाशांना विविध पोस्टर्स/बॅनर वाटले.

लोकांसह रॅली काढून पर्यावरण जागृतीचा संदेश देण्यात आला. विभागीय कार्यालय परिसरात अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांची भेट घेण्यात आली.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री श्रीकांत प्री. चंद्रिकापुरे यांनी सर्वांना पर्यावरण रक्षणाची शपथ दिली.


# कन्हान पोलीसांचा रुट मार्च



■ **महासागर प्रतिनिधी,**
**कन्हान, दि. ५ :** बकरी ईद निमित्याने कायदा व सुव्यवस्था राखण्याचा दृष्टीकोणातुन कन्हान पोलीस ठाण्याच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संतोष गायकवाड , पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात मंगळवार (दि.३) जुन रोजी सायंकाळी ६ वाजता च्या दरम्यान रुट मार्च काढण्यात आला . सदर रुट मार्च हा कन्हान पोलीस स्टेशन येथुन काढुन महामार्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक होत पांधन मार्गाने अशोक नगर , धरमनगर , छत्रपती शिवाजी महाराज चौक , दुर्गा माता मंदीर पिपरी चौक , सुन्नी रजा मस्जिद पटेल नगर पिपरी , गांधी चौक होऊन कन्हान पोलीस स्टेशन येथे रुट मार्च चे समापन करण्यात आले . यावेळी सण उत्सव शांततेत पार पाडावेत असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे . या प्रसंगी सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान , सहायक पोलीस निरीक्षक रोशन बावनकर, पोलीस उपनिरीक्षक एकनाथ राठोड यांचा सह १८ अंमलदार आणि २० आर.सी.पी. पथक चे अंमलदार उपस्थित होते .

# सिराजुल मोमिनिल संस्थेच्या इमारतीचा पायाभरणी कार्यक्रम संपन्न

**कामठी :** कामठी शहरातील वारिसपुरा या परिसरात असणाऱ्या सामाजीक संस्थे ( सिराजुल मोमिनिल ) ची जुनी इमारत (शिकस्त ) जीर्ण झाली आहे . या ठिकाणी नविन इमारतीचा पाया (स्थापन ) भरणी पंजाब चे शाही इमाम हजरत मौलाना उस्मान रहमानी लुधियानबी साहेब यांच्या शुभ हस्ते नुकताच करण्यात आला . याप्रसंगी त्याच दिवशी संध्याकाळी रहमाणी साहेबांनी आपल्या प्रवचनात संस्थेच्या सामाजिक , धार्मिक , शैक्षणिक उद्दिष्टांवर सविस्तरपणे माहिती सांगीतली .या कार्यक्रमात इश्वर / अल्लाहचे शेवटचे प्रेषित मोहम्मद सल्लम हे आहेत .यांच्या नंतर कोणतेही प्रेषित येणार नाहीत .




त्यांनी मानवाने जीवन कशा प्रकारे जगावे अशी शिकवण दिली इस्लाम धर्म शांती , संयम व मानवाला जोडण्याची व एकतेची शिकवण दिली .

आई वडील , भाऊ बहीण , शेजारी तसेच प्रत्येक जाती जमातीच्या जनते सोबत आचरण कसे असावे याबाबत प्रेषित मोहम्मद सल्लम ने संदेश दिले .सर्वांसोबत आदर , मान व दर्जा याविषयीची माहिती देत समाजात जागृती निर्माण केली .इस्लाम मधे महिला /स्त्रीचा कसा असावा याविषयी उपदेश केला. आजच्या धावत्या युगात तरूण पिढीला धार्मिक सामाजीक शिक्षणासोबत शासनाच्या आधुनिक शिक्षण पद्धती च्या अंमलबजावणी व समाज सुशिक्षीत सक्षम होण्याकरिता सिराजुल मोमिनिल ही संस्था सर्वांकरिता सर्वतोपरी कार्य करते असेही सांगीतले.

या कार्यक्रमात कामठी शहरातील व ग्रामीण भागातील पुष्कळ नागरिक बहुसंख्येने उपस्थीत होते .या संस्थेचा सन १९१७ पासुन च्या कारकिर्दीचा अहवाल वाचण्यास आला . अशी माहिती संस्थाध्यक्ष , संस्था सचिव आणि शकील अहमद अंसारी यांनी दिली .

# नियुक्ती अभावी विदर्भातील माथाडी कामगारांवर अन्याय, सुरक्षा रक्षक, बांधकाम कामगार मंडळांचा कारभार ठप्प

■ **महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. ५ :** विदभार्तील अप्पर कामगार आयुक्त कार्यालयाकडे सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष असून अनेक पदे रिक्त आहेत. मात्र, सरकारकडून ते भरली जात नाही. तसेच बदली झालेल्या रिक्त जागेवर अधिकारी येण्यास इच्छुक नसल्याची चर्चाही आहे. विदभार्तील अप्पर कामगार आयुक्त कार्यालयातील अनेक पदे रिक्त आहेत. ती भरली जात नाही आणि बदली होऊ रिक्त जागेवर कोणताही अधिकारी येण्यास तयार नाही. चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर या जिल्ह्यांतील बांधकाम कामगार मंडळ, माथाडी मंडळ, सुरक्षा रक्षक मंडळ आणि घरेलू कामगार मंडळ हे मंडळ अप्पर कामगार आयुक्तांच्या अधिपत्याखाली येतात. कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्याकरिता या मंडळाची निर्मिती करण्यात आली. माथाडी कामगार मंडळातील सचिव, आणि सुरक्षा मंडळातील सचिव हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या ठिकाणी कोणाचीही नियुक्ती करण्यात आली. तसेच अधिका?यांकडे प्रभारीही दिला नाही. त्यामुळे या मंडळांची कामे ठप्प आहेत. यामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. चंद्रपूर येथे कामगार साहाय्यक आयुक्त भरले आहे. तर भंडारा येथील रिक्त पद आहे. दुसरीकडे चंद्रपूर येथे दोन साहाय्यक कामगार आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. माथाडी आणि सुरक्षा मंडळाची जबाबदारी ही साहाय्यक कामगार आयुक्तांकडे असते. भंडारा येथील पद रिक्त ठेवण्यात आले. मात्र, चंद्रपुरात दोन साहाय्यक कामगार आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. यातून विदर्भावर अन्याय होताना दिसून येते. तेच तेच अधिकारी या पदावर दिसून येत असून याकडे सरकारचेही दुर्लक्ष आहे. महत्त्वाचे म्हणजे, येथील अधिकारी दुसरीकडे बदली करून घेत नागपूरचा प्रभार मागून घेतात, असेही आरोप डॉ. हरीश धुरट यांनी केला आहे. नागपूर येथे चार साहाय्यक कामगार आयुक्तांची पदे असताना त्यापैकी तीन पदे रिक्त आहेत. तसेच १९ सरकारी कामगार अधिकारी पदांपैकी तब्बल १३ पदे रिक्त आहेत. हेच काही अधिकारी गेल्या अनेक वर्षांपासून विदर्भातच बदली करून काम करत असून, ते मंडळांवर कायम आहेत. विशेष म्हणजे, बांधकाम कामगार मंडळावर सचिवच नाही. अप्पर कामगार आयुक्तांनी अतिरिक्त कारभार देण्यासाठी प्रस्ताव पाठविला असला तरी, आजपर्यंत सचिवाची नेमणूक झालेली नाही.शासनाचे हे दुर्लक्ष कामगारांच्या हक्कांवर गदा आणत असून, अनेक गरजू कामगार योजनांपासून वंचित राहत आहेत. कामगारांच्या हितासाठी रिक्त पदांची तत्काळ भरती, कारभारात पारदर्शकता आणि जबाबदार अधिका?यांची नियुक्ती करणे गरजेचे आहे, असेही डॉ. हरीश धुरट यांनी सांगितले.

### कामगारांच्या योजना ठप्प

बांधकाम कामगार कल्याण मंडळावर गेल्या अनेक वर्षांपासून सचिवाची नेमणूकच झालेली नाही. अप्पर कामगार आयुक्त कार्यालयाने या पदावर अतिरिक्त जबाबदारी देण्याबाबत प्रस्ताव पाठविलेला असला तरी, प्रत्यक्षात कोणतीही कृती झालेली नाही. परिणामी, हजारो बांधकाम कामगारांचे नोंदणी, विमा योजना, आरोग्य व शैक्षणिक लाभ रखडले आहेत.

हे सगळे असताना, संबंधित विभाग आणि मंत्रालयाने या रिक्त पदांच्या भरतीसाठी ठोस पावले उचललेली नाहीत. नियमितपणे विभागाची फेरतपासणी होणे, तक्रारींची दखल घेणे आणि मंडळांना जबाबदार अधिकारी देणे अत्यावश्यक आहे. कामगार संघटनांनी आणि नागरी संघटनांनी ही बाब वेळोवेळी मांडूनही शासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, हे अधिक चिंताजनक आहे.

**डॉ. हरीश धुरट, नेते, माथाडी कामगार, नागपूर**

# वाडी नगर परिषदेत जागतिक पर्यावरण दिन साजरा

## १०५ विद्यार्थ्यांचा सहभाग; उद्यानांमध्ये ११० वृक्षारोपण



■ **महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. ५ :** वातावरणातील समतोल राखण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे काळाची गरज आहे. याच उद्देशाने वाडी नगर परिषद आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर नगर बाल उद्यान, रमाबाई चौक उद्यान व आदर्श नगर उद्यानामध्ये एकूण ११० वृक्षारोपण करण्यात आले. मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पर्यावरण जनजागृतीसाठी टाटा स्ट्राईव्हचे १०५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. या उपक्रमात उपमुख्याधिकारी गौरव गाडगे, स्वच्छता अभियंता सुषमा भालेकर, बांधकाम विभागाचे नितेश घोरमाडे, मोहिनी वैद्य, आकांक्षा पाटील, सिद्धार्थ शार्दूल, स्वच्छता ब्रँड अ?म्बेसेडर नरेशकुमार चव्हाण, स्वच्छता निरीक्षक धनंजय गोतमारे व मुकेश महातो, शहर समन्वयक आशिष गुंडुकवार, गोदरेज फीडबॅक फाउंडेशनचे व्यवस्थापक आदर्श तंवर, लेखापरीक्षक अतुल सरदार व लेखाधिकारी अमोल सोनसरे यांची उपस्थिती होती. वृक्षारोपणाच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी पोस्टर मेकिंग स्पर्धा, जागरूकता नाटिका स्पर्धा आणि भाषण स्पर्धेत भाग घेऊन पर्यावरणाचे महत्त्व प्रभावीपणे सादर केले. 'एक पेड मेरे नाम' या संदेशासह पर्यावरणाचे संवर्धन करण्याचा निर्धार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये टाटा स्ट्राईव्ह नागपूरचे केंद्रप्रमुख योगेश खिराळे यांच्यासह चैताली भोयर, काजल भरतवाडे, आकांक्षा गुप्ता, रिया अग्रवाल, सरिता गजभिये, अंकिता रंदे, वर्षा आठले, गणेश कोहळे, अंकित वासनिक, पायल जनबंधु आणि रिंकू पाटील यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमाचा समारोप पर्यावरण संवर्धनाची सामूहिक प्रतिज्ञा घेऊन उत्साही वातावरणात करण्यात आला.

# पर्यावरण दिनानिमित्त 'शहाणपण नको शिकवू' पथनाट्याचे आयोजन



■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ५ :** राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिका आणि कृष्णम क्रिएशन नाट्य कलामंच यांच्या संयुक्त विद्यमाने व सेंटर फॉर सस्टेनेबल डेवलपमेंट यांच्या सहकार्याने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गुरूवार ५ जून रोजी 'शहाणपण नको शिकवू' या पथनाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. हे पथनाट्य महाराजबाग प्राणी संग्रहालय येथे दुपारी ४ वाजता सादर केले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसूमना पंत, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. अतिरिक्त आयुक्त श्री. अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पथनाट्याचा मुख्य उद्देश पर्यावरणाबाबत समाजात जनजागृती करणे असून, पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्व आणि त्यासाठी करावयाचे उपाय यावर या पथनाट्याच्या माध्यमातून प्रकाश टाकला जाणार आहे. या सामाजिक उपक्रमात नागपूरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती लीना बुधे यांनी केले आहे. या पथनाट्य साठी सर्वांसाठी प्रवेश खुला आहे. पर्यावरणाच्या रक्षणाचा संदेश या पथनाट्याच्या माध्यमातून घेऊन, प्रत्येकाने आपल्या स्तरावर पर्यावरणाच्या संवर्धनासाठी योगदान द्यावे, असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

# पृथ्वीला प्लास्टिकमुळे उद्धवणारा धोका दर्शविणाऱ्या शिल्पाचे मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते अनावरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

नागपूर महानगरपालिका आणि युसीएन केबल नेटवर्क यांचा संयुक्त विद्यमाने महेश चौक, ट्रॅफिक पार्क जवळ प्लास्टिक पासून पृथ्वीला होणारा धोका यासंकल्पनेवर आधारित पृथ्वी शिल्प उभारण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे शिल्प टाकाऊ प्लास्टिक बाटलीं पासून तयार करण्यात आले आहे. बॉटल च्या आकाराचे हे शिल्प नागरिकांना पृथ्वीला प्लास्टिकमुळे उद्धवणाऱ्या धोक्यापासून सावध राहण्याची गरज दर्शविते. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्यसाधून नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते या शिल्पाचे अनावरण करण्यात आले.



याप्रसंगी यूसीएनचे संचालक आशुतोष काणे, जगदीश पलिया, अजय खामणकर यांच्यासह सुप्रसिद्ध कलाकार विवेक रानडे, युसीएनचे संपादकराजेश सिंह, दिव्येश द्विवेदी प्रामुख्याने उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मनपाद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी घेण्यात आलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, मनपातर्फे पर्यावरण पूरक ई-बसेस चालविण्यात येत आहे. तसेच मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येत आहे. घनकचऱ्यावर प्रक्रियाकरून त्याचा माध्यमाने विविध उत्पादन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आयुक्त पुढे म्हणले की, विकासासोबत पर्यावरण संरक्षण आवश्यक असून, याकरिता नागरिकांचा सक्रिय सहभाग गरजेचे आहे. नागरिकांनी पृथ्वीला प्लास्टिक प्रदूषणापासून मुक्त करण्यासाठी प्लास्टिकचा वापर कमी करावा, कचऱ्याचे योग्य विलगीकरण करावे तसेच कचऱ्याला जाळू नका, आपल्या शहराला स्वच्छ सुंदर, आणि हरित राखण्यासाठी मनपाला मदत करा असे, आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले. या शिल्पाची निर्मिती कलाकार निखिल बोन्डे यांनी केली आहे. यावेळी मनपा आयुक्तांच्या हस्ते त्यांच्या सत्कार करण्यात आला. पर्यावरणासंदर्भात यूसीएनतर्फे ७० शाळांच्या १५००० विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली होती. विद्यार्थ्यांपासून जमा केलेल्या प्लास्टिक बाटलीला पृथ्वीचा आकार सोलर इंडस्ट्रीजच्या सहकार्याने देऊन हे शिल्प तयार करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संचालन अंकित अग्रवाल यांनी केले.

# आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिनानिमित्त विशेष सुरक्षा मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिनानिमित्त, आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागाने रस्ते वापरकर्त्यांना लेव्हल क्रॉसिंग सुरक्षितपणे ओलांडण्यासाठी खबरदारी घेण्याचे शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. आणि नियमांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी, ०३ जून ते ०९ जून २०२५ पर्यंत विशेष संरक्षण मोहीम राबविली जात आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली या मोहिमेअंतर्गत सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या. विभाग दररोज सुरक्षा सल्लागार, नागरी संरक्षण स्वयंसेवक, स्काउट-गाईड्स आणि विविधांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करतो. विभागांचे पर्यवेक्षक आणि रेल्वे संरक्षण दलाचे सदस्य विभागातील विविध लेव्हल क्रॉसिंगवर उपस्थित असतात. ते सर्वसामान्यांना सुरक्षिततेच्या नियमांबाबत पत्रके वाटत आहेत आणि त्यांना सुरक्षित राहण्यास मदत करत आहेत. ते लोकांना गेट ओलांडण्यासाठी सतर्क करत आहेत आणि प्रेरित करत आहेत. ०५ जून २०२५ रोजी 'आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिनानिमित्त' विशेष या मोहिमेअंतर्गत, अनेक लेव्हल क्रॉसिंगवर प्रवाशांना आणि रस्ता वापरकर्त्यांना जागरूक करण्यात आले. "आधी पहा, नंतर चाला" अशा संदेशांद्वारे त्यांना सुरक्षिततेच्या नियमांबद्दल माहिती देऊन.



दक्षता आणि नियमांचे पालन करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. हा उपक्रम नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आहे आणि अपघात रोखण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. लोकांमध्ये सुरक्षिततेबद्दलचा संदेश पसरवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि संप्रेषण माध्यमे. जसे की टीव्ही, वृत्तपत्रे, स्थानकांवर उपलब्ध असलेले विविध सीसीटीव्ही, पोस्टर्स आणि इतर माध्यमांद्वारे लोकांना जागरूक करण्यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत.

# ममता-एचआयएमसीतर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :

नागपूर येथील ममता हेल्थ इन्स्टिट्यूट फॉर मदर अँड चाइल्डने जागतिक पर्यावरण दिन साजरा, पर्यावरण संरक्षण आणि सामुदायिक जागरूकता याप्रती त्यांची दृढ वचनबद्धता दिसून आली. ५ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या या दिवशी निरोगी ग्रहासाठी शिक्षित आणि कृती करण्यास प्रेरणा देण्यासाठी डिझाइन केलेल्या आकर्षक उपक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली.




दिवसाच्या कार्यक्रमांची सुरुवात पर्यावरणासाठी उत्साही रॅलीने झाली, जिथे कर्मचारी आणि समुदाय सदस्यांनी एकत्रितपणे पर्यावरणीय संदेश असलेले फलक घेऊन आणि पर्यावरणीय समस्यांकडे लोकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर अर्थपूर्ण वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली, हिंगणा येथील नगरपरिषद मैदानावर झाडे लावण्यात आली, ज्यामुळे हिरवळ आणि जैवविविधता वाढली आहे. प्रदूषणावरील प्रभावी माहितीपटाच्या प्रदर्शनासाठी गर्दी झाली होती.

या चित्रपटात विविध प्रकारच्या प्रदूषणाचे विनाशकारी परिणाम अधोरेखित झाले आणि शाश्वत पद्धतींची तातडीची गरज अधोरेखित झाली. मंजुषा नासरे आणि योगेश राठोड यांच्या नेतृत्वाखालील एका अंतर्दृष्टीपूर्ण जागरूकता सत्राने दिवसाचा समारोप झाला.

सुप्रसिद्ध पर्यावरण कार्यकर्ते प्रजित भांडारकर यांनीही त्यांचे कामाचे अनुभव आणि समुदायातील सदस्यांना आपली पृथ्वीला वाचवण्यासाठी प्लास्टिकचा वापर बंद करा नाही म्हणण्याचे आवाहन सांगितले.

या कार्यक्रमाला आयसीडीएसपर्यवेक्षक आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी , कविता अहिर (सीडीपीओ), सुचिता चामाटे आणि छाया भोस्कर नगर पंचायत हिंगणा, वॉर्ड सदस्य यांनी जोरदार पाठिंबा दिला, त्यांनी पर्यावरण कल्याणासाठी एकत्रित प्रयत्नांवर प्रकाश टाकला.

"आमचा असा विश्वास आहे की, विशेषतः आपल्या समुदायांमध्ये पर्यावरणीय जागरूकता वाढवणे, शाश्वत भविष्य घडविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे," असे ममता-एचआयएमसीच्या वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक पल्लवी भांडारकर म्हणाल्या. आजचा उत्साही सहभाग आपल्या ग्रहाचे रक्षण करण्याच्या सामूहिक इच्छेला अधोरेखित करत आणि स्थानिक अधिकारी आणि समुदाय नेत्यांकडून मिळालेल्या पाठिंब्याबद्दल आभार व्यक्त केले.

## गोंडवाना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात रमाई

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :

विख्यात नाटककार प्रभाकर दुपारे यांचे गाजलेले नाटक रमाई हे गोंडवाना विद्यापीठाच्या बी.ए.मराठी वाङ्मय (सत्र तीन) अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहे. यापूर्वी हे नाटक राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातही अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले होते. रमाई या नाटकाचे राज्यभरात हजारो प्रयोग झाले असून या नाटकाने लोकप्रियतेचा नवा आयाम घडविला आहे. या नाटकाचे हिंदीसह इतरही भाषांमध्ये अनुवाद झाले असून एकपात्री रमाईचे इंग्लंड व मलेशिया या देशातही प्रयोग झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रसंग प्रभाकर दुपारे यांनी समोर आणले असून या नाटकाची मालिका दूरदर्शनवर दाखविण्यात आली आहे.

## ९ वर्षांपासून फरार अत्याचाराच्या आरोपीला अखेर बेड्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

लैंगिक अत्याचार प्रकरणात गत ९ वर्षांपासून फरार आरोपीला कळमना पोलिसांनी शोधून काढत अटक केली. धनराज धुर्वे (४५) रा. भेंडाळा, सावनेर असे आरोपीचे नाव आहे. अमरविरुद्ध २०१५ साली एका महिलेने कळमना ठाण्यात लैंगिक अत्याचाराची तक्रार केली होती. पोलिसांनी गुन्हा नोंदवून त्याला अटकही केली होती. न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत तुरुंगात रवानगी केली. त्यानंतर आरोपीला न्यायालयीन प्रक्रियेत सहकार्य करणे आणि हजर राहण्याच्या अटीवर जामीन देण्यात आला, मात्र अमर पुन्हा कधी न्यायालयात हजरच झाला नाही. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी त्याच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी केले.

मात्र पोलिस जेव्हाही त्याला अटक करण्यासाठी जात होते तो गुंगारा देत पळून जात होता. गत ९ वर्षांपासून अमर फरार होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रविण काळे यांच्या मार्गदर्शनात सफौ. गोपाल वैद्य, पोहवा. नरेश मोडक, रंजीत बावणे आणि दीपक मेश्राम यांनी आपल्या खबऱ्यांना कामावर लावले. पोलिसांना अमर त्याच्या घरी असल्याची माहिती मिळाली.

# मध्य रेल्वे नागपूर विभागात विश्व पर्यावरण दिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

प्लास्टिक प्रदूषण समाप्त करा या जागतिक संकल्पनेशी सुसंगतपणे, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने शाश्वतता आणि पर्यावरणीय जबाबदारीला प्रोत्साहन देणाऱ्या विविध प्रभावी उपक्रमांच्या माध्यमातून विश्व पर्यावरण दिन २०२५ साजरा केला.

या दिवसाचा मुख्य आकर्षण म्हणजे सकाळी ०९:३० वाजता अजनी फुटबॉल मैदानापासून सुरु झालेली एक रंगतदार रॅली होती. यामध्ये स्काउट्स अँड गाइड्स, रेल्वे अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



रॅलीने फुटबॉल मैदान क्रॉस रोड अजनी स्टेशन सक्युर्लेटिंग क्षेत्र पुन्हा मैदान असा मार्ग घेतला. सहभागी मंडळींनी प्लास्टिक हटाओ धरती बचाओ! आणि आपली बाटली आणा प्लास्टिकचा वापर टाळा! असे प्रभावी नारे देत प्लास्टिक प्रदूषणाविरुद्ध जागरूकतेचा संदेश दिला. डीआरएम कार्यालय नागपूर, नागपूर स्टेशन, अजनी सक्युर्लेटिंग क्षेत्र, मंडल फुटबॉल मैदान आणि अन्य प्रमुख स्थानकांवर वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली.

अधिकाऱ्यांनी आणि स्वयंसेवकांनी स्वतः झाडे लावून हरित भविष्य निर्माण करण्याची वचनबद्धता दर्शवली. प्रवाशांशी थेट संवाद साधण्यासाठी, एकल-वापर प्लास्टिक टाळण्याबाबत आणि जोडशे डस्टबिन्स, वैयक्तिक पाण्याच्या बाटल्यांच्या वापराबाबत सार्वजनिक सूचना करण्यात आल्या. स्वयंसेवकांनी प्रवाशांशी संवाद साधून शाश्वत सवयींविषयी जागरूकता निर्माण केली.

## एअर मार्शल घुरतिया, चौधरी यांना एव्हीएसएम राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आले सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :

सैन्याच्या तिन्ही दलात उल्लेखनिय कार्य करणाना अधिकाऱ्यांना बुधवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सैन्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये शहरातील भारतीय हवाई दलाच्या देखभाल कमांड मुख्यालयात तैनात असलेल्या 2 अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. एअर मार्शल संजीव घुरतिया आणि एअर व्हाइस मार्शल वेनिगल्ला श्रीनिवास चौधरी यांना बुधवारी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात आयोजित औपचारिक समारंभात अति विशिष्ट सेवा पदक (एव्हीएसएम) प्रदान करण्यात आले. एअर मार्शल घुरतिया हे मेंटेनन्स कमांडचे वरिष्ठ देखभाल अधिकारी आहेत. तर चौधरी हे एक वैमानिक आणि वरिष्ठ हवाई आणि प्रशासकीय अधिकारी आहेत. दोन्ही अधिकाऱ्यांना यापूर्वी विशिष्ट सेवा पदक देण्यात आले आहे.

## आपुलकी सहारा बेघरतर्फे पर्यावरणदिनी वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

महानगरपालिका नागपूर समाज कल्याण विभाग संचालित बोधिसत्व आणि आपुलकी अर्बन बेघर निवारा इंदोरा तर्फे पर्यावरण दिनानिमित्त स्थानिक परिसरात वृक्षारोपन करण्यात आली. यांनी संयुक्तपणे या झाडांची काळजी घेण्याची जबाबदारी घेतली आहे.



यावेळी परमात्मा एक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा रुपाली पराते, प्रीती इंदूरकर, लक्ष्मीकांत अंडरसहारे, तसेच सहारा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र गाडे, मोनिका फुलमाळी, नरेंद्र शरणागत, तसेच सोनू वानखेडे, अमर गोरखडे, सुबोध साखरे, गृह विभागाचे अधिकारी व नागरिक उपस्थित होते. बोधिसत्व आणि आपुलकी अर्बन बेघर निवारा इंदोरा उपस्थित होते.

## बार्टीचे दोन विद्यार्थी वनसेवेत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या भारतीय वनसेवा परीक्षेचा निकाल मे महिन्यात जाहीर करण्यात आला. यावर्षी महाराष्ट्रातील १८ मराठी उमेदवारांनी ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांत बार्टीच्या प्रदीप बाबासो भंडारे - रँक अभिजय पगारे रँक १२३ या दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण दिले जाते, तसेच मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणी पात्र झालेल्या उमेदवारांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

यूपीएससी भारतीय वनसेवा-२०२४ च्या मुख्य परीक्षेकरिता ४० विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य देण्यात आले होते. ४ विद्यार्थ्यांनी मुलाखत चाचणी परीक्षेकरिता आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतला होता. त्यातील २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# केंद्रीयमंत्री नड्डा यांच्या हस्ते डॉ. अभिषेक खोब्रागडे यांना सुवर्णपदक



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

शहरातील होनहार डॉक्टर अभिषेक खोब्रागडे यांना डीएम कार्डिओलॉजी पदवीसह सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी कुलगुरू आणि संसदीय कार्यमंत्री प्रल्हाद जोशी विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. अभिषेक खोब्रागडे हे शहरातील प्रसिद्ध मधुमेह डॉक्टर डॉ. शंकर खोब्रागडे यांचे पुत्र आहेत.

एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत त्यांनी प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक मिळवून विद्यापीठात सर्वाधिक गुण मिळवले. ही परीक्षा जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज आणि डॉ. प्रभाकर कोरे हॉस्पिटल, बेळगाव यांनी घेतली होती.

# तारांगन २०२५ नृत्य स्पर्धेत सरताज डान्स अकादमीचे विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ५ :

दार्जिलिंग शहरात पार पडलेल्या "तारांगन २०२५" या राष्ट्रीयस्तरीय नृत्य स्पर्धा व कला संमेलनात दत्तवाडी येथील सरताज डान्स अकादमीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने सर्वांचे लक्ष वेधले आणि विविध पारितोषिके पटकावत वाडीचे नाव उज्वल केले.

ही स्पर्धा कथक रॉकर्स दुर्ग (छत्तीसगड) यांच्या वतीने ३० मे ते २ जून या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. २०१८ पासून कथक रॉकर्स दरवर्षी दोन वेळा "तारांगन" आणि "नाट्यनर्तन" या नावाने या स्पर्धा आयोजित करतात. यावर्षी देशभरातील ३५ संघांचे सुमारे ८०० स्पर्धक सहभागी झाले होते.या कला संमेलनात नृत्य, संगीत, चित्रकला यांसारख्या विविध क्षेत्रातील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी क्लासिकल, फोक, वेस्टर्न डान्स अशा अनेक प्रकारांमध्ये भरघोस सहभाग पाहायला मिळाला.



संयुक्त नृत्य स्पर्धेत सरताज डान्स अकादमीचे आरोही सचिन कालबांडे, रिंजेन आशीष गजभिये, तृप्ती महेंद्र सुखदेवे, हार्वी कमलेश भुरे,तन्वी अजय तायवाडे,निवार्णी अक्षय चव्हाण,रेणुका पाटील या विद्यार्थ्यांना प्रथम व द्वितीय पारितोषिकांनी सन्मानित केले. मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या यशाबद्दल सरताज डान्स अकादमीचे संचालक व नृत्य प्रशिक्षक राहुल बडोले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्द यांच्या जोरावर हे यश मिळवले आहे.

# महाराष्ट्राच्या ऊर्जेचे शिल्पकार

## महावितरणची २० वर्षांची गौरवशाली वाटचाल

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) आपल्या स्थापनेची 6 जून 2025 रोजी 20 वर्षे पूर्ण करत आहे. केवळ दोन दशकांच्या या अविश्वसनीय प्रवासात, महावितरणने महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रात खऱ्या अर्थाने क्रांती घडवून आणली आहे. ही केवळ एक सरकारी कंपनी नाही, तर महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक विकासाला गती देणारे एक अखंड ऊर्जा जाळे आहे. प्रत्येक घरात प्रकाश पोहोचवणारे, उद्योगांना नवी ऊर्जा देणारे आणि शेतीला संजीवनी देणारे हे विशाल ऊर्जा जाळे राज्याच्या विकासाचे एक महत्त्वाचे इंजिन बनले आहे.

महावितरण 20 वा वर्धापन दिन विद्युत सुरक्षा अभियान २०२५ प्रकाशित महाराष्ट्र, सुरक्षित महाराष्ट्र

### इतिहास आणि स्थापनेचा प्रवास

2005 साली, तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या (MSEB) ऐतिहासिक पुनर्रचनेतून महावितरणचा जन्म झाला. 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा' (MERC) च्या शिफारशीनुसार, वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण या तीन महत्त्वाच्या विभागांचे विभाजन करून अधिक कार्यक्षमतेने काम करण्यासाठी तीन स्वतंत्र कंपन्यांची स्थापना करण्यात आली. यापैकीच एक म्हणजे महावितरण. वीज वितरण प्रणाली अधिक कार्यक्षम करणे, ग्राहकांना अखंडित आणि दर्जेदार सेवा प्रदान करणे, तसेच तांत्रिक आणि व्यावसायिक तोटा कमी करणे ही महावितरणच्या स्थापनेमागील प्रमुख उद्दिष्टे होती. या दूरगामी बदलामुळे महाराष्ट्राच्या वीज क्षेत्राला एक नवी दिशा मिळाली आणि विकासाची कवाडे खुली झाली.

### आव्हाने आणि त्यावर केलेली मात

गेल्या 20 वर्षांच्या वाटचालीत महावितरणला अनेक मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागला. महाराष्ट्राची वाढती लोकसंख्या आणि वेगाने होणारे औद्योगिकीकरण यामुळे विजेची मागणी सातत्याने वाढत होती. जुनी आणि कालबाह्य झालेली वितरण व्यवस्था हे एक मोठे आव्हान होते, ज्यामुळे वीज गळती आणि बिघाडांचे प्रमाण जास्त होते. तांत्रिक अडचणी, उपकरणांची कमतरता, आणि विशेषतः वीज चोरीसारख्या समस्यांमुळे कंपनीला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये वीज पोहोचवणे हे एक मोठे भौगोलिक आव्हान होते, जिथे पायाभूत सुविधांचा अभाव होता. याशिवाय, नैसर्गिक आपत्त्या, वादळे आणि अतिवृष्टीमुळे होणारे वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकारही वारंवार घडत होते, ज्यामुळे ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या सर्व आव्हानांवर मात करत, महावितरणने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कंपनीने आपल्या वितरण व्यवस्थेत क्रांती घडवून आणली आहे. स्मार्ट मीटरिंग, ऑटोमेशन (SCADA प्रणाली) आणि नवीन वितरण तंत्रज्ञानाचा अवलंब करून वीज गळती कमी करण्यात आणि कार्यक्षमता वाढवण्यात यश मिळाले आहे. पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक करून नवीन उपकेंद्रे, ट्रान्सफॉर्मर आणि वीजवाहिन्यांचे जाळे विस्तारण्यात आले आहे.

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' आणि 'एकात्मिक ऊर्जा विकास योजना' (IPDS) यांसारख्या केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत वीजपुरवठा अधिक मजबूत करण्यात आला आहे. ग्राहक सेवा सुधारण्यासाठी 'एक खिडकी योजना', ऑनलाइन बिल भरण्याची सुविधा, 24 तास तक्रार निवारण केंद्रे आणि मोबाईल ॲप्स यांसारखे अनेक अभिनव उपक्रम राबवण्यात आले आहेत, ज्यामुळे ग्राहकांचे जीवन अधिक सुकर झाले आहे. ऊर्जा बचतीसाठी जनजागृती मोहिम आणि अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांना (उदा. सौर ऊर्जा) प्रोत्साहन देऊन महावितरणने पर्यावरणाचे रक्षण आणि शाश्वत विकासालाही हातभार लावला आहे.

### महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल

महावितरणच्या या 20 वर्षांच्या प्रवासात, महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये अविस्मरणीय योगदान दिले आहे. उद्योगांना 24 तास अखंडित वीज मिळाल्याने उत्पादन वाढले, नवीन उद्योगांना चालना मिळाली आणि रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. शेतीला वीज मिळाल्याने सिंचन सोपे झाले, ज्यामुळे कृषी उत्पादन वाढले आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले. ग्रामीण भागात विजेमुळे अनेक नवीन व्यवसाय सुरू झाले, शिक्षण आणि आरोग्य सेवांमध्ये सुधारणा झाली आणि एकूणच जीवनमान उंचावले. या सर्व बदलांमुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अधिक मजबूत झाली आहे आणि राज्याने विकासाच्या नव्या उंची गाठल्या आहेत.

### सामाजिक दायित्व आणि महिला सक्षमीकरण

महावितरण केवळ वीज वितरण कंपनी नसून, ती आपल्या सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवून कार्यरत आहे. विशेषतः, महावितरण तांत्रिक कर्मचाऱ्यांमध्ये महिलांना सामावून घेत असून, त्या सर्व प्रकारची तांत्रिक कामे सक्षमतेने पार पाडतात. प्रचलित शासन निर्णयानुसार प्रत्येक भरतीत महिला आरक्षण देणारी महावितरण ही भारतातील पहिली वीज कंपनी आहे. शासनाच्या प्रचलित नियमांनुसार, सरळसेवा भरतीमध्ये महावितरणमध्ये महिलांना 30 टक्के आरक्षण सर्व स्तरांवर देण्यात येते. आजच्या घडीस महावितरणमध्ये तब्बल 3 हजार 377 महिला कर्मचारी यंत्रचालक आणि वीजतंत्री या पदांवर कार्यरत आहेत, जे महिला सक्षमीकरणाचे एक उत्तम उदाहरण आहे. याशिवाय, आजवर महावितरणने मृत वीज कर्मचाऱ्यांच्या एकूण 8 हजार 519 वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे, जो त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा पुरावा आहे.

### भविष्याची दृष्टी

राज्याचे मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महावितरणने अनेक योजना यशस्वीरित्या पुर्ण केल्या आहेत. त्यांच्या दुरदृष्टीमुळे सद्या सुरु असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजनेमुळे राज्यातील शेतक-यांचे दिवसा वीजेचे स्वप्न लवकरच पुर्णत्वास येत आहे. महावितरणचा हा 20 वा वर्धापन दिन केवळ एका कंपनीचा वाढदिवस नाही, तर महाराष्ट्राच्या उज्वल भविष्याच्या दिशेने टाकलेल्या प्रत्येक पावलाचा तो उत्सव आहे. 'शून्य अपघात महावितरण... शून्य अपघात महाराष्ट्र...' या संकल्पनेवर आधारित सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करून, महावितरणने आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणची पुढील वाटचाल ही अधिक तंत्रज्ञान-आधारित, पर्यावरणपूरक, ग्राहक-केंद्रित आणि शाश्वत ऊर्जा पुरवठ्याच्या दिशेने असेल, यात शंका नाही. महावितरण, विकासाचा एक अविभाज्य घटक म्हणून, नेहमीच आपल्यासोबत राहील आणि राज्याला ऊर्जावान ठेवण्यासाठी कटिबद्ध असेल.

**योगेश विटनकर**
उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,
प्रादेशिक संचालक कार्यालय,नागपूर

# मानेवाडा व नंदनवन यूपीएचसीला राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन प्रमाणीकरण प्राप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

नागपूर महानगरपालिकेच्या मानेवाडा आणि नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना (यूपीएचसी) राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन प्रमाणिकरण (NQAS) प्राप्त झाले आहे. २८ एप्रिल ते ३ मे दरम्यान नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र मानेवाडा, नंदनवन व कपिल नगर यांचे राष्ट्रीय मूल्यांकन राष्ट्रीय स्तरावरील मूल्यांकन अधिकारी यांचे द्वारे करण्यात आले होते. त्यात मानेवाडा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राला ८९.९५ टक्के व नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राला ८८ टक्के गुण प्राप्त करून राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता आश्वासन प्रमाणिकरण (ठदअर) प्राप्त झाले आहे. कपिल नगर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचा निकाल प्रतीक्षेत आहे.




या यशाबद्दल मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी व अतिरिक्त आयुक्त (शहर) वसुमना पंत यांनी दोन्ही यूपीएचसी चे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

विशेष म्हणजे, २०२३ मध्ये मनपाचे इंदोरा व शांतीनगर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता आश्वासन प्रमाणिकरण (ठदअर) प्राप्त झालेले महाराष्ट्रातील पहिले केंद्र ठरले होते.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन प्रमाणिकरण (ठदअर) तपासणी सूची नुसार १२ थीमॅटिक एरिया नुसार अंमलबजावणी केली जाते. ज्यामध्ये माता व बाल संगोपन सेवा, बाह्यरुग्ण सेवा, लसीकरण, बाह्यसत्र, आपत्कालीन व ड्रेसिंग सेवा, कुटुंब कल्याण, प्रयोगशाळा, औषधी, संसर्गजन्य रोग नियंत्रण तसेच असंसर्गजन्य रोग नियंत्रण आणि सामान्य प्रशासन (ज्यामध्ये ईमारत स्थिती, वस्त्र, आहार, रुग्ण कल्याण समिती इत्यादी) यांचे दिलेल्या पूर्वनिर्धारित निकषानुसार मूल्यांकन केले जाते.

NQAS प्रमाणीकरण हे ३ वर्षाकरिता वैध आहे. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रतिवर्ष रक्कम दोन लक्ष रुपये अनुदान पारितोषिक म्हणून मिळेल. प्रथम वर्ष अनुदान हे निकालाच्या अनुषंगाने, द्वितीय व तृतीय वर्ष मध्ये राज्यस्तरीय पुनर्मुल्यांकन मध्ये उत्तीर्ण असल्यास देय राहील. सदर अनुदान हे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये रुग्णांना सेवा उपलब्ध करून देणेकरीता वापरण्यात येईल.

पुरस्कार विजेत्या मानेवाडा व नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार व माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सरला लाड यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. मानेवाडा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मीनल पटले व नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रेयस खेमका यांच्या नेतृत्वात दोन्ही केंद्रामधील आरोग्य चमूने उत्कृष्ट कामगिरी बजावली.

शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अश्विनी निकम, शहर लेखा व्यवस्थापक निलेश बाभरे, शहर गुणवत्ता आश्वासन समन्वयक डॉ. राजेश गं. बुरे, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक डॉ. शुभांगी कुंभारे आणि डॉ. दिव्या बनकर यांनी सर्व बाबींबाबत योग्य ते समन्वय व मार्गदर्शन यूपीएचसी ला दिले.

# शेकडो व्यवसायी पोलिसांच्या रडारवर

## १५५ कोटींच्या घोटाळा प्रकरणात होणार चौकशी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

बनावट कंपन्या स्थापन करून १५५ कोटी रुपयांचा घोटाळा प्रकरणात पोलिसांना ११३ व्यापाऱ्यांच्या सहभागाची माहिती मिळाली आहे.

या सर्व व्यावसायिकांनी टोळीचा म्होरक्या संतोष उर्फ बंटी रामपाल शाहू आणि इतरांशी आर्थिक व्यवहार केला आहे. आता पोलिस या सर्वांची चौकशी करणार आहेत. बंटीच्या टोळीतील इतर आरोपींची नावेही पुढे आली आहेत, मात्र सर्व अटकेपासून वाचण्यासाठी इकडे-तिकडे पळत आहेत.

पोलिसांनी बिस्वजित रायच्या तक्रारीवरून बंटी शाहू (रा. लघु औद्योगिक परिसर), जयेश रामपाल शाहू (३६) रा. कपिल हाईट्स, इमामवाडा, ब्रिजकिशोर रामविलास मनियार (५९) रा. शंकरनगर, ऋषी हितेश लाखानी (२१) रा. शास्त्रीनगर आणि आनंद विनोद हरडे (३३) रा. सूर्यनगर, कळमना यांना अटक केली होती.

या प्रकरणात राजेश शाहू, अविनाश शाहू आणि अंशूल मिश्रा फरार आहे. पोलिसांनी अंशूल मिश्राविरुद्ध लुट आऊट सर्क्युलरही जारी केले आहे. आता या प्रकरणात गोविंद तन्ना, रियाज अली, संकेत शाहू आणि बंटी शर्मा यांची नावेही पुढे आली आहे. प्रकरणाशी संबंधित लोकांवर छापेमारी सुरू झाल्यामुळे सर्व फरार झाले आहेत. ३ आरोपी विदेशात पळून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्यांच्याविरुद्धही लुक आऊट सर्क्युलर जारी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान पोलिसांनी अवध आणि क्षीतिज एंटरप्रायझेसच्या सर्व आर्थिक व्यवहार तपासले आहेत. यामध्ये ११३ व्यापाऱ्यांनी बंटी आणि त्याच्या टोळीशी आर्थिक व्यवहार केल्याचे पुढे आले आहे. बंटीने त्यांना लोखंड आणि सीमेंट आदी माल विक्रीची बिले दिली आहेत. ज्या वाहनांतून मालाचा पुरवठा करण्यात आला त्यांची बिले तपासली असता दुचाकी वाहनांचे रजिस्ट्रेशन नंबर पोलिसांना मिळाले आहेत.

यावरून मालाची देवाण-घेवाण झालीच नसल्याचे स्पष्ट आहे. केवळ कागदांवर हे सर्व व्यवहार झाले होते. बंटी आणि त्याचे साथीदार केवळ बिल देत होते. त्यासाठी १८ टक्क्यांपर्यंत कमिशन घेत होते.

आता त्या व्यापाऱ्यांनी ती बिले जीएसटी पुढे सादर केली किंवा नाही, सब्सिडीचा किती लाभ घेण्यात आला, याचा तपास करण्यासाठी सर्व व्यापाऱ्यांची चौकशी केली जाणार आहे. पोलिस आर्थिक व्यवहार करणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांना चौकशीसाठी हजर राहण्याची नोटीस जारी करीत आहेत. पोलिसांनी जीएसटीच्या अधिकाऱ्यांशी प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे. ही माहिती मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल.

# राजे छत्रपती प्रतिष्ठान तर्फे शिवराज्याभिषेक सोहळा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ५ :

राजे छत्रपती प्रतिष्ठान तर्फे"३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा आणि महानाट्य : गाथा राजयोगाची या कार्यक्रमाचे आयोजन ६ जून रोजी करण्यात आले आहे. याबरोबर व्याख्यान : शिव-संवाद वर्तमान भारत में शिवाजी की रणनीति दि. ६जून २०२५ वेळ : सायं ५ ते १० पर्यंत स्थळ लक्ष्मी नारायण मंदिर परिसर, सक्करदरा तलाव समोर, नागपूर येथे होणार आहे.

भगवा ध्वजा रोहन (भगवा म्हणजे परंपरा संस्कृती, भगवा म्हणजे साक्षात छत्रपती) आखाडा प्रत्यक्षिका नृत्य व पारंपारिक कला सादर करण्यात येणार आहेत.या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती



श्रीमंत. राजे डॉ. मुधोजी महाराज भोसले (महाराज ऑफ नागपूर) आमदार,मोहनभाऊ मते (आमदार, द.नागपुर) हे राहणार आहेत. आयोजक स्वप्निल वासुदेवराव कुंदेलवार ,पायल स्वप्निल कुंदेलवार आपणास नम्र विनंती आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या उत्सवात हजर राहून या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षिदार व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आठवडी बाजारात प्लास्टिक जप्तीची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. ५ :

विक्रिला बंदी असल्यानंतरही बिनादिक्कत प्लास्टिक विकणाऱ्या दुकानावर नगर परिषद कन्हान आरोग्य विभागाकडून छापा टाकत दंडात्मक कारवाई केल्याने अनेक दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत. पाच हजार रुपये दंड वसूल करण्यात आला असून मुदेमाल जप्त करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाने 'प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट'ने जारी केलेल्या नियमानुसार प्लास्टिक पिशव्या वापरण्यास बंदी घातली आहे.

आरोग्याला घातक तसेच पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे सखल भागात पाणी साचण्याला कारणीभूत ठरणाऱ्या ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर काही वर्षांपूर्वी बंदी घालण्यात आली होती. परंतु महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने महाराष्ट्र प्लास्टिक व थमाकोल विघटनशील वस्तूंच्या उत्पादन वापर विक्री वाहतूक हाताळणी व तद्वंतर वेळोवेळी केलेला सुधारणा अधिसूचना २०१८ संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आल्या आहेत.केंद्र सरकारच्या




पर्यावरण विभागाने ३० सप्टेंबर २०२१ पासून ७५मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या य आणि ३१ डिसेंबर २०२२पासून १२० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी करण्यात आली आहे. या नियम व अधिसूचनेची कटू अंमलबजावणी शहरांमध्ये सुरू न करण्यात आली आहे. परंतु अनेक ठिकाणी प्लास्टिक पिशव्यांचा विक्री व खरेदी होत आहे. त्यामुळे सरकारने ठरवून दिलेल्या प्लास्टिक पिशव्यांबाबत नियमांचे पालन करण्याचे आवाहन मुख्याधिकारी दीपक घोडके यांनी केले आहे. प्लास्टिक बंदी करून जनजागृती व दंड करूनही शहरात प्लास्टिकची विक्री करणाऱ्यांचा वापरही वाढलेला आहे. याकरिता नगर परिषद कन्हान-पिपरी च्या वतीने शुक्रवारी (ता.३०) आठवडी बाजार तसेच विविध दुकानात भेटी देऊन प्लास्टिक बंदी करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान लेखापाल नितेश तपासे,शहर समन्वयक मयूर डफरे, लिपिक देवीलाल ठाकूर, लिपिक आकाश ठमके, स्वप्निल बेलेकर, राष्ट्रपाल नितनवरे, बंटी खिचर, गौरव गिरडकर, आकाश गिरडकर, पियुष नितनवरे, गुलशन कटकवार इत्यादी अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# स्वरांकित संगीत संस्थेची आज स्वरसंध्या

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ५ :

स्वरांकित संगीत संस्था प्रस्तुत निवडक मराठी आणि हिंदी गाण्यांचा कार्यक्रम स्वरसंध्या शुक्रवार, 6 रोजी लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात संध्याकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची संकल्पना अनुजा सावजी यांची असून संगीत संयोजन परिमल जोशी यांचे आहे.

कार्यक्रमात स्वाती मोहनी, आरती बुटी, मनीषा चन्ने, डॉ. अमृता परोळकर, लता राईरकर, संगीता भगत, मधुलिका देशमुख, दीपक राईरकर, अविनाश चन्ने, शशीकांत वाघमारे, विश्वास ताग्रपवार, विजय पुराणिक हे गायक निवडक मराठी व हिंदी गाणी सादर करणार आहेत. या कलाकारांना परिमल जोशी, पंकज यादव, अक्षय हरले आणि ऋग्वेद पांडे हे वाद्यवृंद साथ देणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन धनश्री सेवलकर झा करतील. या निःशुल्क संगीतमय कार्यक्रमाचा आनंद रसिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# एचएसआरपी नसल्यास २ हजार रुपये दंड

## ऑनलाईन नोंदणीची ३० जून शेवटची मुदत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ५ :

प्रत्येक वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेटची (एचएसआरपी) लावणे अनिवार्य करण्यात आले असून येत्या 30 जून नंतर किमान ऑनलाईन नोंदणी केल्याची पावती असल्यास दंडात्मक कारवाईतून सूट दिल्या जाणार आहे. अन्यथा प्रत्येक वाहनाला प्राथमिक स्वरुपात दोन हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येणार आहे. त्यानंतरही एचएसआरपीची नोंदणी नसल्यास दंडाची रक्कम वाढविण्यात येणार आहे.

शहरातील एचएसआरपी कायदा व सुव्यवस्थेसह वाहतूक व्यवस्था अबाधित राखण्यासाठी 1 एप्रिल 2019 पूर्वीच्या सर्वच जुन्या वाहनांना एचएसआरपी बसवून घेणे परिवहन विभागाने बंधनकारक केले आहे. त्यामुळे अनेक वाहनचालक आता ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी धावपळ करीत आहेत. प्रादेशिक परिवहन विभागाने आता तिसऱ्यांदा मुदत वाढ केली असून 30 जूनपर्यंत प्रत्येक वाहनाधारकाने किमान ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अन्यथा मुदत संपल्यानंतर वाहनचालकांना दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. एचएसआरपी नसल्यास वाहन चालकांकडून दोन हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात येणार आहे. परिवहन विभागाकडून 1 जानेवारी पासून सुरवात झालेल्या या प्रक्रियेला आता पाच महिन्यांचा कालावधी होत आहे. याकरिता आधी 31 मार्च नंतर 30 एप्रिल आणि आता 30 जून 2025 अशी तीनदा मुदत वाढवून दिली. तरीही एचएसआरपी ऑनलाईन नोंदणी करण्यास वाहनचालकांचा अल्प प्रतिसाद मिळताना दिसून येत आहे.

एचएसआरपीची ल्रफ्ढ ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी जेमतेम 26 दिवसांचा कालावधी बाकी आहे. शहरात नोंदणी असलेल्या 26 लाख 93 हजार 375 जुन्या वाहनांपैकी केवळ 1 लाख 30 हजारांवर वाहनांनीच नवीन नंबर प्लेट बदलविली आहे. हे प्रमाण केवळ 20 टक्केच आहे. त्यामुळे येत्या 226 दिवसांत एवढ्या वाहनांची नोंदणी किंवा नवीन नंबर प्लेट बसविणे अशक्य आहे. त्यामुळे वाहनधारक आणि प्रशासनापुढे पेच पडला आहे. अनेकांकडील ल्रफ्ढ वाहनांची कागदपत्रे गहाळ झाली किंवा खराब झाली आहेत. तसेच एचएसआरपी ऑनलाईन नोंदणी करायची असल्यास इंश्युरन्स, पीयूसी आणि आरसी बुक अपडेट करावे लागणार का, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. त्याबाबत परिवहनाने विभागाने कोणतेही स्पष्ट निर्देश दिले नाहीत. शहर प्रादेशिक परिवहन कार्यालयात 14 लाख 54 हजार 231 वाहने तर पूर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयात (एमएच-49) 6 लाख 76 हजार 434 वाहनांची नोंदणी आहे. तर नागपूर ग्रामीण प्रादेशिक परिवहन कार्यालयात 5 लाख 62 हजार 710 वाहनांची नोंद आहे. दंडांची रक्कम वाचविण्यासाठी अनेक जण आता वाहनांची कागदपत्रे तयार करण्यासाठी आरटीओ कार्यालयाच्या चकरा मारत असल्याचे समोर आले आहे. नियमानुसार एचएसआरपी नंबर प्लेट लावणे अनिवार्य आहे. शहरात सध्या 99 फिटमेंट सेंटर असून त्यातून 4 हजार 830 वाहनांना रोज एचएसआरपी देण्याची क्षमता आहे. वाहनधारकांनी प्रशासनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन ऑनलाईन नोंदणी करावी.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विविध विषयावर व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ५ :

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था श्रद्धानंद पेठ नागपूर, दि. 6 जून रोजी, सकाळी 10 वा. महाराष्ट्रामधील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्याअंतर्गत येणाऱ्या सर्वच शासकीय औद्योगिक प्रशिक्षणामध्ये शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने संत जगनाडे महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागपूर येथे शिवराज्याभिषेक सोहळ्या निमित्त विविध विषयावर व्याख्यान आयोजित केलेले आहे. यामध्ये सामाजिक समस्या, नागरिक कर्तव्य व शिष्टाचार, स्वदेशी विचाराचा प्रसार पर्यावरण संरक्षण कुटुंब प्रबोधन या विषयाचा समावेश आहे. या सोहळ्या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्हिडिओ (डाऊनलोड) भाषण द्वारे संपूर्ण महाराष्ट्रात औद्योगिक प्रशिक्षणातील प्रशिक्षणात त्यांना संबोधित करणार आहे. ही संकल्पना खात्याचे मा. मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य, संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागपूर येथील नागरी कर्तव्य शिष्टाचार या विषयावर प्रा. गिरीश देशमुख माजी अधिव्याख्याता धरमपेठ कॉलेज नागपूर यांच्या व्याख्यानाला तर कुटुंब प्रबोधन या विषयासाठी डॉ. संजय भक्ते माजी सहाय्यक संचालक आकाशवाणी नागपूर यांचे व्याख्यान आयोजित केलेले आहे. या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती संदीप जोशी विधान परिषद सदस्य अतुल जिचकार आयएमसी अध्यक्ष शिवानी दानी आमंत्रित आयएमसी सदस्य तथा विभागाचे उपसंचालक किरण मोटघरे उपस्थित राहणार आहे.

# बकरी ईदच्या सणाबद्दल शांतता समितीची बैठक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ५ :

पोलिस उपायुक्त झोन क्रमांक ३ लकडगंज यांच्या क्लब हाऊस येथे झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत अतिरिक्त पोलिस आयुक्त राजेंद्र दाभाडे यांनी संबोधित केले. सहाय्यक पोलिस आयुक्त श्वेता खाडे, सहाय्यक पोलिस आयुक्त अनिता मोरे, भरत कोराडे कोतवाली, मच्छिंद्र पंडित गणेशपेठ, हेमंत चाडेवार लकडगंज यांच्यासह विविध पोलिस ठाण्यांचे पोलिस अधिकारी यांनीही आपले विचार व्यक्त केले. त्याचप्रमाणे शांतता समितीच्या सदस्यांमध्ये ॲड. अब्दुल अमानी कुरेशी, डॉ. नाईक, इर्शाद अली, नूतन रेवतकर आणि इतर अनेक सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.शांती समितीचे सदस्य अमजद खान इब्राहिम खान यांनी अतिरिक्त पोलिस आयुक्त राजेंद्र दाभाडे यांना त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन केले आणि त्यांना कवी ॲड. अब्दुल अमानी कुरेशी यांनी लिहिलेले "मम का दिल" हे पुस्तक भेट दिले.

# वयोश्री योजना मोफत वस्तू शिबीर संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ५ :

मध्य नागपूर हा झोपडपट्टी भाग असल्याने येथे ज्येष्ठ नागरिक आणि अपंग नागरिक मोठ्या संख्येने राहतात. येथे बहुतेक सामान्य लोक राहतात. त्यामुळे व्हीलचेअर, बेल्ट आणि इतर वस्तू खरेदी करण्याची व्यवस्था नाही.

त्यामुळे या भागात मोफत जीवनावश्यक वस्तू शिबिर आयोजित करावे अशी मागणी लोकांनी केली. म्हणूनच, स्थानिक आमदार प्रवीण दटके यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक भास्कर पराते यांनी मध्य नागपुरातील



समाज भवन लाडपुरा नंदगिरी रोड येथे भव्य राष्ट्रीय वयोश्री योजना मोफत वस्तू नोंदणीचे आयोजन केले.

या शिबिरात डझनभर ज्येष्ठ नागरिक आणि अपंग नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. लवकरच केंद्र सरकारकडून या लाभार्थ्यांना आवश्यक वस्तूंचे वाटप केले जाईल. या शिबिरात सीआरसीचे आकाश यादव आणि संपूर्ण टीम उपस्थित होती. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेवक भास्कर पराते, कैलास हेडाऊ, पुष्पा पाठराबे, सुमन खापरे, प्रभाकर पराते, देवेंद्र भिसीकर, रवी पारवे, शेखर कडवे, दीपक पराते, जय पराते, दिलीप धकाते, प्रवीण शिरपूरकर, यश पांडे, श्रीकांत ठाकरे, दयानेश्वर बारापात्रे ,मंगेश काबळी , मोहन कुंभारे, घनश्याम निनावे, संजय शेंडे, लक्ष्मण पांडे, चंदू सहारकर, गणपती निमजे, नितेश मांडवकर, प्रवीण सोनकुसरे, रमेश मोहाडीकर, सक्षम पराते, रुपाली पराते, रुपाली भानारकर, कादंबरी कुंभारे, भारती गोसेवाडे यांनी परिश्रम घेतले.

# सावरगावला नगर पंचायतीचा दर्जा द्या

## सलील देशमुख यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ५ :

आगामी काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समीतीचे सिमांकण होण्याची प्रक्रिया सुध्दा होणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सिमांकनापुर्वी सावरगावला नगर पंचायतीचा दर्जा द्यावा अशी मागणी राष्टवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पक्षाचे नेते सलील देशमुख यांनी उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देवून केली आहे.



सावरगाव ही ग्राम पंचायत बहू लोकसंख्येची असून तालुक्यातील सर्वात मोठी असल्याने येथील विकास कामासाठी निधी देतांना अनेक अडचणी निर्माण होत होत्या. ग्राम पंचायतीचे रुपांतर नगर पंचायत मध्ये केले तर याचा फायदा हा गावातील विकाम कामे करतांना होतो. यामुळे सावरगावला नगर पंचायत करण्याची मागणी समोर आली होती.

यासाठी सलील देशमुख यांनी पुढाकार घेत राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असतांना नरखेड तालुक्यातील सर्वात मोठी असलेल्या सावरगाव ग्राम पंचायतीला नगर पंचायत करण्याच्या संदर्भात प्रस्ताव तयार करून सातत्याने पाठपुरावा केला होता. सावरगाव सोबतच कोंढाळी ग्राम पंचायतीला सुध्दा नगर पंचायत करण्यासाठी सलील देशमुख यांनी पुढाकार घेवून त्याचाही प्रस्ताव तयार केला होता.

सलील देशमुख यांनी ग्राम पंचायत ते मंत्रालयपर्यत सतत पाठपुरावा केला. याला यश येत कोंढाळी ग्राम पंचायतीला नगर पंचायतीचा दर्जा देण्यात आला परंतु सावरगावच्या प्रस्तावामध्ये काही त्रुटया असल्याने हा प्रस्ताव मागे पडला अशी माहिती सलील देशमुख यांनी दिली.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सिमांकन कामाला सुरुवात होणार आहे. यापुर्वी सावरगावला नगर पंचायतीच्या दर्जा देणे आवश्यक असल्याचे सलील देशमुख यांनी नमूद केले असून, उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन सादर केले आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त इतवारी स्थानकावर जनजागृती मोहीम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभागाने जागतिक पर्यावरण दिनाच्या आदल्या दिवशी बुधवारी नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी रेल्वे स्थानकावर एक विशेष जागरूकता कार्यक्रम आयोजित केला. या वर्षीर्च थीम प्लास्टिक प्रदूषण कमी करा अंतर्गत प्रवासी आणि स्थानके कर्मचाऱ्यांना प्लास्टिकचे हानिकारक परिणाम आणि त्याचे पर्याय स्वीकारण्यास जागरूक करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान, विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकदा वापरता येणारे प्लास्टिक टाळणे आणि पर्यावरणाप्रती जबाबदार नागरिक बनणे याविषयी स्टेशन परिसरात पोस्टर्स, बॅनर आणि घोषणांद्वारे संदेश पसरवण्यात आला. यासोबतच पर्यावरण संरक्षणात रेल्वेची भूमिका देखील अधोरेखित करण्यात आली. याप्रसंगी रेल्वे या



मोहिमेत कर्मचारी, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी एकत्रितपणे सहभाग घेतला . त्यांच्या दैनंदिन जीवनात प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा निर्धार रेल्वे कर्मचाऱ्यांनी केला. वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंग म्हणाले की नागपूर विभाग पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे . भविष्यातही अशी जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.